# अनुक्रमणिका

संचालक
हेमन्त टकले
---
संपादक
डॉ. सुधीर भोंगळे
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
कला निर्देशन
धनंजय सस्तकर
मांडणी सहाय्य
दिलीप रोडे
फोटो
मयूर बोराडे
---
वर्गणीचे दर-
वार्षिक रु. ५००/-
वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध
---
मुद्रक, प्रकाशक
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने मीडिया आर अँण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३, आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

4 अध्यक्षीय- जयंत पाटील- शिवरायांच्या पुतळ्यातही युती सरकारचा भ्रष्टाचार

5 संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे- उद्‌घाटनजीवि पंतप्रधान

8 मराठा आरक्षणप्रश्नी आमची भूमिका समन्वयाची- शरद पवार

14 मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची पत्रकार परिषद
१) समाजातील वाढत्या कटुतेला राज्य सरकारच जबाबदार- सुप्रिया सुळे-१४
२) विधानसभेला सत्तेत महाविकास आघाडीच येणार- जयंत पाटील-१७

20 महाविकास आघाडीचे 'जोडे मारो आंदोलन', मुंबई, भाषणे-
१) भ्रष्टाचारामुळे पुतळा कोसळला- शरद पवार-२०
२) महाराष्ट्र शिवद्रोहींना माफ करणार नाही- उद्धव ठाकरे-२२

26 विपर्यास व असत्याचा कथाकार- अनंत बागाईतकर

32 चार राज्यातील विधानसभा निकालांनी नवी समीकरणे- व्यंकटेश केसरी

38 मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची शिवस्वराज्य यात्रा,भाषणे
१) रयतेचे राज्य आणण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा- जयंत पाटील-३८
२) महाराष्ट्रात लवकरच सत्तेवर आपलंच सरकार- सुप्रिया सुळे-४४
३) महाराष्ट्राच्या मातीत गद्दारांना जागा नाही- डॉ. अमोल कोल्हे-४७

50 महाविकास आघाडी मेळावा, मुंबई, भाषणे...
१) लोकशाहीला अजूनही धोका त्यासाठी एकजुटीने लढा- शरद पवार-५०
२) महाराष्ट्राला झुकविणाऱ्याला गाडून इतिहासाची पुनरावृत्ती करा- उद्धव ठाकरे-५४
३) बाळासाहेब थोरात-५७, ४) जयंत पाटील-५९, ५) सुप्रिया सुळे-६१

64 महिलांना सत्तेपेक्षा स्वाभिमान जास्त महत्वाचा- सुप्रिया सुळे

68 बांगलादेशातील परिस्थिती चिंताजनक- जतीन देसाई

76 काम देणाऱ्यांची पिढी तयार करण्यासाठी सहकार्य करूया- शरद पवार

80 धर्मांधांनी सदा बलात्कारीत भूमीचे रक्तलांछीत आत्मवृत्त- प्रभाकर खोले

84 राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष वरूड (अमरावती) मेळावा, भाषणे
१) रोहित पवार- ८४, २) हर्षवर्धन देशमुख- ८७

88 लाडकी बहीण योजना निवडणुकीपर्यंतच- प्रा. नीरज हातेकर

90 कानोकानी- घंटाकर्ण (हलके-फुलके राजकीय किस्से)

98 वाढते बलात्कार समाजाच्या मूल्य प्रणालीतील अपयश- मनाली भिलारे

102 शेवटचे पान- हेमन्त टकले- बुद्धी देवतेला साजेसे होईल असेच वागा

अध्यक्षीय



# शिवरायांच्या पुतळ्यातही युती सरकारचा भ्रष्टाचार

मालवण राजकोट किनारी उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळल्याची बातमी अतिशय धक्कादायक आहे. यामुळे राज्यातील तमाम शिवप्रेमी दुखावले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनवताना काळजी घेतली गेली नाही. केवळ पंतप्रधान यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करायचे हेच सत्ताधाऱ्यांचे ध्येय होते. त्यामुळे या निर्माण कार्याच्या दर्जाची, गुणवत्तेची काळजी घेतली गेली नाही. हे इव्हेंटजीवी सरकार आहे. त्यांना कामाच्या दर्जाचं घेणं देणं नाही. कमीशन घ्यायचे आणि कंत्राटे वाटायची एवढंच काम निष्ठेने सुरू आहे.

राज्यभर सुरू असलेली रस्त्याची कामे देखील सुमार दर्जाची आहेत. महाराजांचा पुतळा बनवताना देखील असाच घोटाळा केला असणार. त्यामुळेच तेथील भौगोलिक परिस्थितीत पुतळा उभा राहू शकला नाही. ही सर्वस्वी महाराष्ट्र सरकारची जबाबदारी आहे. केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचं नाव वापरायचं. त्यांचे आचार, विचार, कृतीचा सन्मान होतोय का याबाबत सरकारला घेणेदेणे नाही.

फक्त आठ महिन्यांपूर्वी बांधलेला राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडला. हा पुतळा पडला नसून महाराष्ट्राचा स्वाभिमान पडला आहे. मुख्यमंत्री म्हणतात प्रचंड वेगाने वारे वाहत होते. त्यामुळे पुतळा पडला. तसं असतं तर दोन-तीन झाड पडली असती पण तसं न होता फक्त पुतळा पडला याचा अर्थ पुतळ्याच काम सदोष होतं. अपरिपक्व माणसाला पुतळ्याचे काम दिले. दीड - दोन फुटांचे पुतळे तयार करणाऱ्या व्यक्तीला ३५ फुटाच्या पुतळ्याचे काम दिले. सरकार म्हणतंय पुतळा नेव्हीने बांधला आहे. सरकारला हात झटकून चालणार नाही, यात जबाबदारी ही सरकारची आहे. नेव्हीच्या लोकांनी फक्त पुतळा तिथे बसवला. हा शिल्पकार आपटे कोणी शोधला? कोणी नेव्हीला त्याची माहिती दिली? तो कल्याणचाच कसा? या पुतळ्याचे टेंडर काढले गेले नाही मग त्यालाच कसे कंत्राट मिळाले? या सर्व गोष्टींची चौकशी व्हायला पाहिजे.




सरकारने कोणतीही शहानिशा न करता गुन्हा कसा दाखल केला? गुन्हा दाखल करणे म्हणजे आपण काही तरी करतोय हे दाखवण्याचा केविलवाणा खटाटोप सरकार करत आहे अशी टीका असताना सरकारला तोंड दाखवायला जागा राहिली नाही. सरकार काम फक्त टेंडर काढणे, जवळच्या लोकांना कंत्राट देणे, त्या कामाचा इव्हेंट करणे त्यापलीकडे सरकार काहीच करायला तयार नाही. त्यामुळे आता सरकारने राज्यभरातील शिवप्रेमींची माफी मागावी.

दरम्यान या प्रकरणाची जर सरकारला खरंच चौकशी करायची असेल तर दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्षनेते आणि मुख्यमंत्र्यांनी बसून उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची निवड करावी आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी करावी.

स्थानिक मंत्री सांगतायत की, 'या वाईटातून काहीतरी चागलं होईल'. मला अशा मंत्र्यांच्या बुध्दीची कीव वाटते. मंत्री महोदय नक्कीच चांगलं होणार, शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणारे हे सरकार जाईल आणि रयतेचे राज्य येईल. ज्यांना २८ फुटाचा व्यवस्थित पुतळा उभारता आला नाही ते आता १०० फुटाची चर्चा करतायत, हा केवढा मोठा विनोद आहे.

भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाला महाराजांनी कधीच माफी दिली नव्हती. आमचा महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी दाखवलेल्या वाटेवर चालतो. त्यामुळे महाराष्ट्र या चुकीला माफी देऊ शकणार नाही.प्रायश्चित अटळ आहे.



**संपादकीय**

# उद्घाटनजीवि पंतप्रधान



मालवणजवळ राजकोट येथे समुद्रकिनारी उभारण्यात आलेल्या छत्रपति शिवाजी महाराजांचा पुतळा आकस्मिकपणे कोसळला. ही घटना खेदजनक होती. महाराष्ट्राचे दैवतच नव्हे तर प्रत्येक मराठी माणसाची प्रेरणा असणाऱ्या शिवरायांचा पुतळा अशा रीतीने कोसळावा हे मराठी मनाला सहन न होणारे होते. या प्रकरणी सामान्यातला सामान्य माणूस देखील हळहळला. प्रत्येक मराठी माणसाच्या मनात एकच प्रश्न निर्माण झाला की हे असे कसे झाले ? या प्रकरणाचे तपशील जसे उजेडात येत गेले त्यानंतर मराठी माणूस संतप्त झाला कारण पुतळ्याच्या निर्मितीपासून, पुतळा उभारणी, त्यानंतरची त्याची देखभाल या सर्वच बाबतीत अक्षम्य असा ढिसाळपणा, हलगर्जीपणा झाल्याचे मराठी माणसाच्या लक्षात आले आणि खऱ्या अर्थाने मराठी माणसांच्या भावना याबाबत तीव्र होत गेल्या. शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. महाराष्ट्रातील सर्व अठरापगड जातीसमूहांना बरोबर घेऊन त्या सर्वांना समान स्थान देऊन त्यांनी रयतेच्या मनात कधीही पुसले न जाणारे स्थान मिळविले. ते जाणता राजा म्हणून ओळखले जातातच परंतु हा जाणता राजा जनतेचा राजा होता हेही वास्तव विसरुन चालणार नाही. म्हणूनच महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या महाराजांच्या पुतळ्याची अशी स्थिती होणे महाराष्ट्राला पटले नाही व महाराष्ट्रात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटणे अत्यंत नैसर्गिक आणि स्वाभाविक होते.

हा पुतळा तयार करण्यासाठी नामांकित शिल्पकारास नियुक्त करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात एका नवख्या, अननुभवी अशा शिल्पकाराऐवजी लहान मूर्ति तयार करणाऱ्या कलाकाराला पुतळा निर्मितीची जबाबदारी देण्यात आली. सर्वसाधारणपणे ज्या पुतळ्यासाठी तीन वर्षे लागतात तो पुतळा तीन महिन्यात तयार करण्यात आला. आता मिळत असलेल्या माहितीनुसार केवळ सहाफुटी पुतळा तयार करण्यासाठी या शिल्पकाराला सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात तो पस्तीस फुटांचा तयार करण्यात आला. या पुतळ्याच्या निर्मितीमागील अतिघाईचे कारण अद्याप प्रकाशात आलेले नाही. परंतु डिसेंबर २०२३ मध्ये या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. यानंतर लगेचच लोकसभेच्या निवडणुका होणार होत्या त्यामुळे महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपतींच्या पुतळ्याच्या अनावरणाचा हा घाट अतिघाईने घालण्यात आला होता काय अशी शंका मनात आल्याखेरीज रहात नाही. मराठी माणसांच्या मतांसाठी जेजे काही करणे शक्य आहे ते करण्याच्या राज्यकर्त्यांच्या आगतिकतेमधून बहुधा हा प्रकार घडला असावा असे अनुमान कुणी काढल्यास ते वावगे ठरु नये. म्हणजेच केवळ मतांच्या राजकारणासाठी हा प्रकार नको एवढ्या घाईने करण्यात आला असे म्हणावे लागेल. ही झाली पुतळ्याच्या उभारणीपर्यंतची कहाणी. आता पुतळा उभारल्यानंतर त्याच्या देखभालीची जबाबदारी कुणाची असा स्वाभाविक प्रश्न निर्माण झाल्याखेरीज रहात नाही. त्याबाबतच्या माहितीनुसार पुतळ्याच्या देखभालीची जबाबदारी भारतीय नौदलाकडे असल्याचे समजते. पुतळा कोसळल्यानंतर जे अनेक प्रश्न विचारले गेले आहेत आणि ज्यांची समाधानकारक उत्तरे मिळू शकलेली नाहीत त्यामध्ये पुतळा निर्मिती केली कुणी, त्यासंबंधीचे कंत्राट दिले कुणाला, शिल्पकाराची निवड केली कुणी, पुतळ्याच्या उभारणीची जागा कुणी निश्चित केली, या जागेवर एवढा मोठा पुतळा उभारत असताना तेथील वातावरण, हवामान, वाऱ्यांची गति हे सर्व पैलू विचारात घेतले होते का आणि त्यानुसार पुतळ्याची निर्मिती करण्यात आली होती काय, पुतळ्याच्या देखभालीची जबाबदारी निश्चित कुणाकडे होती आणि त्यामध्ये हयगय झाली काय असे अनेक प्रश्न यासंदर्भात निर्माण झालेले आहेत. याला मिळालेली उत्तरे किंवा याबाबत झालेले खुलासे संदेहास्पद आहेत. या प्रकरणी एसआयटीची स्थापना केली म्हणून जनतेला पडलेल्या प्रश्नांची उत्तरेच द्यायची नाहीत असे होऊ शकत नाही. परंतु आतापर्यंत जी काही थोडीफार माहिती पुढे आली आहे त्यातील पुतळ्याच्या निर्मितीबद्दल, त्याच्या शिल्पकाराच्या अनुभवाबद्दल माहिती वर दिलेली आहे. परंतु मूळ प्रश्न आहे तो हा की या अशा अननुभवी मूर्तिकाराला एवढ्या मोठया पुतळ्याच्या निर्मितीची जबाबदारी दिली कुणी आणि मग या निर्णयप्रक्रियेत कुणाचा समावेश होता असा त्याला संलग्न असा प्रश्न निर्माण होतो. सर्वप्रथम पुतळा निर्मितीची जबाबदारीच राज्य सरकार झटकू पहात आहे हे लक्षात घ्यावे लागेल. हा पुतळा नौदलातर्फे तयार करण्यात आला आणि उभारण्यात आला असे सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात या प्रक्रियेत राज्य सरकार म्हणजेच राज्य सरकारचा सार्वजनिक बांधकाम विभाग सहभागी होता ही माहितीही पुढे येत आहे म्हणजेच हा पुतळा नौदलाने उभारला असे म्हणून राज्य सरकार हात झटकू शकणार नाही. पुतळ्याच्या अनावरण समारंभात प्रामुख्याने सर्व राजकीय

नेत्यांचाच सहभाग होता ही बाब दुर्लक्षिता येणार नाही. आता पुतळा कोसळण्याच्या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विलक्षण शाहजोगपणे किंवा मानभावीपणे पुतळा नौदलाने उभारल्याचे म्हटले होते. प्रत्यक्षात पुढे येणाऱ्या माहितीनुसार त्यात राज्य सरकारचा सहभाग असल्याचे सिध्द झाले आहे. फडणवीस हे स्वतःला फार तज्ञ समजत असल्याचा आव आणून त्यांच्या नेहमीच्या आपण त्या गावचेच नाही अशा शैलीत हातवारे करीत जे बोलले त्यानुसार पुतळा उभारला त्या जागी नेहमीच सोसाट्याचे वारे वहातात आणि कोसळल्याच्या दिवशी म्हणे वाऱ्याचा वेग फारच तीव्र होता आणि त्यामुळे पुतळा पडला असावा. त्याचप्रमाणे समुद्रकिनाऱ्यामुळे पुतळ्याचा धातु गंजण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होते आणि ती बाबही पुतळा कोसळण्यास कारणीभूत ठरली असावी. फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार जर त्यादिवशी वाऱ्याचा वेग काहीसा जास्त होता तर मग पुतळ्याच्या परिसरातील नागरिकांनाही त्याचा अनुभव येणे अपेक्षित होते. जर एवढा मोठा पुतळा पडू शकतो तर त्या परिसरातील झाडे देखील उन्मळण्याचे प्रकार घडायला हवे होते. मग आपण फार मोठे तज्ञ असल्याचा आव आणून बोलणाऱ्या फडणवीसांनी या प्रश्नांची उत्तरेही द्यावीत. आपण काहीतरी महत्वपूर्ण माहिती देत असतो अशी भावमुद्रा करीत बोलण्याची फडणवीसांना सवय आहे. पण यासंदर्भात त्यांनी जेजे सांगण्याचा प्रयत्न केला आहे त्यात त्यांची लंगडी बाजू उघड झाली आणि त्यांचा शाहजोगपणाही उघड झाला आहे.

पुतळा कोसळण्याच्या प्रकरणी ती विशेष तपास तुकडी(एसआयटी) नेमलेली आहे तिचा अहवाल जेव्हा यायचा तेव्हा येईल परंतु या प्रकरणातील राज्य सरकारची भूमिका ही वादग्रस्त आहे. स्वतःच नेमलेल्या तपास समितीकडून स्वतःला क्लीन चिट मिळविण्यातही हे राज्य सरकार यशस्वी होईल परंतु जनतेकडून आणि शिवप्रेमी लोकांकडून त्यांना क्लीन चिट मिळण्याची शक्यता दिसून येत नाही. कारण या प्रकरणात आपली काही चूकच नाही असा जो कोडगेपणाचा पवित्रा घेतला जात आहे तो जनता मान्य करणार नाही. हे प्रकरण झाल्यानंतरच्या तीव्र भावना लक्षात घेऊन सर्वप्रथम उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माफी मागितली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माफी मागितली आणि त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागितली. परंतु स्वतःला फार मोठे आणि महान समजणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र माफी मागितल्याचे वाचनात आले नाही. कदाचित त्यांच्या दृष्टीने ही एखादी किरकोळ  नेहमीसारखी घडणारी घटना असावी. अल्पयशाने स्वतःला महान व सर्वज्ञ समजू लागणाऱ्या पण प्रत्यक्षात सुमारबुध्दी असलेल्या खुज्या लोकांमध्ये ही अशी आपण सोडून इतरांना तुच्छ लेखण्याची मनोवृत्ती आढळून येत असते.

ज्या नेत्यांनी या प्रकरणी महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली त्याबद्दल त्यांचे आभार, परंतु माफी मागितली म्हणून त्यांच्या अपराधाचे गांभीर्य कमी होते असे नाही तसेच माफी मागितली म्हणजे त्यांनी महाराष्ट्रावर उपकारही केलेले नाहीत. या प्रकरणातील सर्व दोषींवर जेव्हा कारवाई होईल आणि ती मराठी जनतेला पटणारी व मान्य असणारी असेल तेव्हाच या मंडळींची माफी खरी होती का खोटी होती याचा निर्णय होईल. या सत्ताधाऱ्यांना या पापक्षालनासाठी स्वतःच्या चुका आणि खरेपणा सिध्द करावाच लागेल. अन्यथा महाराष्ट्रातली शिवप्रेमी जनता त्यांना माफी देणार नाही. विरोधी पक्षांनी या प्रकरणी जनतेच्या तीव्र भावनांना वाचा फोडण्यासाठी आंदोलन केले असता स्वघोषित महान सर्वज्ञ नेते देवेंद्र फडणवीस यांनी तसेच त्यांचे गंडाबंद शागिर्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे आंदोलन राजकारणाने प्रेरित, राजकीय स्वरुपाचे असल्याची टीका करण्यास सुरुवात केली. विरोधी पक्षांनी आंदोलन केले की ते राजकीय हेतुने केलेले आणि मग त्यांचेच सहकारी असलेल्या अजित पवार यांच्या गटाने केलेले आंदोलन अतिउदात्त भावनेने केले होते असे मानायचे काय असे महान सर्वज्ञ फडणवीसांना विचारावेसे वाटते.

याप्रकरणी राजकारण कुणी केले असेल तर ते पंतप्रधानांनी केले. स्वघोषित दैवी अंश असलेले अवतारी पुरुष यांनी पुतळा प्रकरणी माफी मागितली. परंतु ती मागता मागता त्याला एक लहानशी  पुस्ती जोडली. जी मंडळी वीर सावरकरांवर वाट्टेल ते आरोप करतात ते मात्र माफी मागत नाहीत. परंतु आमची संस्कृती वेगळी आहे असे त्यांनी उच्चरवाने सांगितले. मुळात सावरकरांची छत्रपति शिवाजी महाराजांशी बरोबरी करणे ही बाबच किती भयंकर आहे हे लक्षात घ्यावे लागेल. छत्रपति शिवाजी महाराज हे निरंतर लढवय्ये होते. औरंगजेबाने त्यांना बंदिवान बनविल्यानंतर देखील त्यांनी  शिताफीने ओरंगजेबाच्या कैदेतून सुटका करवून घेतली होती. शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची माफी मागितली नव्हती. महाराजांना औरंगजेबाचे मांडलिकत्व पत्करुन स्वतःसाठी ऐषोआरामाची सोय करता आली असती परंतु महाराजांनी ते नाकारले आणि महाराष्ट्रासाठी जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत औरंगजेबासारख्या जुलमी सत्ताधाऱ्याच्या विरोधात त्यांनी लढा उभारला. म्हणून माफीखोर मंडळींना महाराजांच्या बरोबरीत बसवून पंतप्रधानांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राचा, मराठी माणसांचा, छत्रपति शिवराय ज्या रयतेचे अनभिषिक्त राजे होते त्या रयतेचा त्यांनी अपमान केला आहे. या अपमानची किंमत त्यांना चुकवावी लागेल. पंतप्रधानांनी छत्रपतींच्या पंक्तीत सावरकरांना बसवून अक्षम्य अपराध केला आहे. यामध्ये केवळ राजकारण नाही तर यामागे छत्रपतींबद्दल

त्यांच्या मनात असलेली आकसाची तीव्र भावना प्रतीत होते. त्यामुळेच त्यांनी मागितलेली माफी हे निव्वळ ढोंग होते आणि महाराष्ट्रातील जनता अशी माफी कधीच स्वीकारणार नाही. या त्यांच्या अपराधाची सजा त्यांना जनता देईल.

या प्रकरणाने वर्तमान राज्यकर्त्यांच्या आणखी एका क्षुद्र मनोवृत्तीवर प्रकाश पडतो. दिल्लीपासून गल्लीपर्यंत ही भावना दिसून येते. कोणत्याही निवडणुका आल्या की दिल्लीतले सत्ताधारी असोत की महाराष्ट्रातील असोत, त्यांना अचानक अनेक प्रकल्प, कार्यक्रम, योजना यांची आठवण येते. त्याच्या मोठ्यामोठ्या घोषणा केल्या जाऊ लागतात. भूमिपूजने, शिलान्यासांची मालिका सुरु होते. वंदे भारत रेल्वेगाड्यांची उद्घाटने व त्यांना हिरवे निशाण दाखविण्याचे कार्यक्रम सुरु होतात. रस्त्यांच्या प्रकल्पांच्या घोषणा होतात. तसेच काही अर्धवट पूर्ण झालेल्या योजना, प्रकल्प यांचीही उद्घाटने जबरदस्तीने केली जाऊ लागतात. हा असला अर्धवटपणा गेल्या दहा वर्षात विशेषत्वाने भारतात घडताना आढळतो. दिल्लीहून मेरठला जाण्यासाठी द्रुतगति मार्गाची निर्मिती केली जात होती. या रस्त्याचे केवळ सात किलोमीटरचेच काम पूर्ण झाले होते. परंतु उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणुका असल्याने देशाचे महान नेते उर्फ स्वघोषित दैवी अंश असलेले अवतारी पुरुष, उर्फ पंतप्रधानांनी त्या अर्धवट रस्त्याचे उद्घाटन केले. त्यासाठी त्यांनी भर कडक उन्हात लोकांना उभे करुन उघड्या मोटारीतून त्या अर्धवट रस्त्यावरुन हात हलवीत यात्रा केली होती. केवढी ही केविलवाणी धडपड आणि अट्टाहास. याच साहेबांनी बिहारमध्ये अनेक पुलांचे उद्घाटन केले होते. परंतु पावसाळ्याच्या सुरुवातीला बिहारमध्ये पंधरा दिवसांमध्ये तेरा पूल कोसळल्याची बातमी सर्वत्र प्रसिध्द झाली. याच पंतप्रधानांनी उज्जैनच्या महांकालेश्वर मंदिर परिसरात भक्तांच्या सोयीसाठी एका कॉरिडॉरची उभारणी करायला लावली. त्या परिसरात देवीदेवतांचे अनेक पुतळे उभारण्यात आले होते. याला स्थानिक लोकांचा विरोध होता परंतु पंतप्रधानांचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून तो विरोध मोडून काढण्यात आला. एका वर्षात या ठिकाणी एक मोठे वादळ झाले आणि हे सर्व पुतळे आणि हा कॉरिडॉर उद्ध्वस्त झाला. आता याला काय म्हणायचे असा प्रश्न आहे. काही सश्रध्द मंडळी याला अपशकुन म्हणतील आणि अपशकुनी हातांमुळे असे घडले असेही बोल लावतील. त्यांची श्रध्दा त्यांच्यापाशी. यामागील खरे कारण हेच आहे की आपल्याच हाताने सर्व उद्घाटने व्हावीत आणि त्यासाठी संबंधित प्रकल्पाचे काम दर्जेदार झाले नाही तरी चालेल अशी जी अट्टाहासाची दुराग्रही भावना किंवा लालसा हे आहे. त्यामुळेच मग अशी शिक्षा मिळते. वर काही मोजकी उदाहरणे दिलेली आहेत. परंतु केवळ लोकांसमोर प्रदर्शन करण्यासाठी हा असा उद्घाटनांचा सपाटा लावणे आणि त्यासाठी काम कितीही निकृष्ट दर्ज्याचे झालेले असले तरी त्याची पर्वा करायची नाही ही एक नवी राजकीय विकृती किंवा विकृत मनोवृत्ती प्रभावी होताना दिसून येत आहे. परंतु यामुळे जनसामान्यांचे नुकसान होऊ शकते किंवा निकृष्ट दर्ज्याच्या रस्त्यांची घाईघाईने उद्घाटने करण्याने ते रस्ते जीवघेणे ठरु शकतात याचे भान या उद्घाटनजीवि मंडळींना राहिलेले नाही.

महाराष्ट्रातला तथाकथित समृध्दी मार्ग हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. या मार्गाने आतापर्यंत किती बळी घेतले आहेत याची आकडेवारी अंगावर काटे आणणारी आहे. केवळ श्रेयवादाच्या गलिच्छ स्पर्धेत लोकांच्या जिवाशी आपण खेळत आहोत याचे भान राज्यकर्त्यांना उरलेले नाही. मुंबईच्या अटलसेतु मार्गाला तडे जाणे, रस्त्याला भेगा पडणे ही या निकृष्ट दर्ज्याच्या बांधकामांची आणखी उदाहरणे आहेत आणि यामुळे लोकांचा जीव धोक्यात आल्यास याला जबाबदार कोण या प्रश्नाचे उत्तर हे उद्घाटनजीवि देतील काय किंवा ते या बळींची जबाबदारी घेतील काय याचेही उत्तर देण्याची तयारी त्यांनी ठेवली पाहिजे.

दिल्लीत झालेल्या प्रदीर्घ शेतकरी आंदोलनाची अत्यंत घाणेरड्या पध्दतीने हेटाळणी व टिंगल करताना पंतप्रधानांनी त्यांना उद्देशुन ''आंदोलनजीवि'' अशी उपरोधिक संज्ञा वापरली होती. त्याच धर्तीवर आता पंतप्रधानांना जर कुणी ''उद्घाटनजीवि'' अशी उपाधी दिली तर कसे वाटेल याचा विचार त्यांनी आणि त्यांचे अनुकरण करणाऱ्या अनुयायांनी केला पाहिजे. वर्तमान पंतप्रधान हे त्यांच्या कारकिर्दीत विकास व प्रगतीची व्याप्ती आणि गति याबद्दल फार फुशारक्या मारत असतात. परंतु एखादा प्रकल्प किती वेगाने होतो यापेक्षा तो किती टिकाऊ असतो यावर त्याच्या यशाचे मोजमाप होते. अल्पावधीत परंतु निकृष्ट दर्ज्यांचे काम करुन वेगाने कामे होत असल्याची फुशारकी मारणे ही सुमारबुध्दी झाली. देशात रस्त्यांची बांधकामे फार वेगाने होत आहेत आणि रस्त्यांमुळे दळणवळणात, संपर्कात क्रांति झाल्याचे दावेही केले जात आहेत. परंतु या प्रक्रियेत पर्यावरणाची किती अपरिमित हानि व नुकसान होत आहे याकडे कुणी लक्ष देताना आढळत नाही. यातून पर्यावरणीय असमतोल आणि त्यातून नैसर्गिक आपत्तींची वाढती मालिका यांना निमंत्रण दिले जात आहे. चारधाम यात्रेसाठी विशेष द्रुतगति मार्गांची निर्मिती करण्याच्या नादात जोशीमठ नावाचे गाव नकाशावरुन पुसले गेले आहे याची दखल कितीजणांनी घेतली हे तपासावे लागेल. यामुळेच अतिवेगाची ही विकृती येथेच थांबायला हवी. अन्यथा दुर्घटना आणि आपत्तींना तोंड द्यावे लागण्याची स्थिती वारंवार लोकांवर आल्याखेरीज राहणार नाही.



# मराठा आरक्षणप्रश्नी आमची भूमिका समन्वयाची

**शरद पवार**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी ऑगस्ट महिन्यात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदेत तसेच प्रसार माध्यमांशी बोलताना मराठा आरक्षणासह विविध विषयांवर आपली भूमिका मांडली...**

आज मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या लोकांनी माझी भेट घेतली. त्यांनी माझ्यासमोर आरक्षणाचा प्रश्न मांडला आणि आरक्षणाला सगळ्यांनी सहकार्य करावं अशा प्रकारची भूमिका त्यांनी मांडली. त्याच्यामध्ये माझ्या मते आज महाराष्ट्राचं सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्यासंबंधीची काळजी ही सगळ्यांनी पहिल्यांदा घेतली पाहिजे. दोन समाजामध्ये कटुता होणार नाही यादृष्टीनं पावलं टाकली पाहिजेत. आज वातावरण वेळीच जर काळजी घेतली नाही, तर काय राहील हे सांगता येणार नाही. पर्याय काय हा विषय आहे.

आणि पर्याय त्याच्यामध्ये, मी त्यांना असं सुचवलंय, की यापूर्वी माझी आणि मुख्यमंत्र्यांची यासंबंधी थोडी चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये आणि आत्ता तुमच्यामार्फत मी असं सुचवू इच्छितो, की मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलवावी. त्या बैठकीमध्ये त्यांनी राज्यातले त्यांना योग्य वाटतायंत, त्या लोकांना निमंत्रित करावं. आम्ही विरोधी पक्षाच्यावतीनं त्याठिकाणी हजर राहू आणि आमची भूमिका सहकार्याची राहील, असं त्यांना सुचवलेलं आहे.

अपेक्षा अशी आहे, की मुख्यमंत्री यासंबंधीची बैठक बोलवतील. त्या बैठकीमध्ये महत्त्वाचे राजकीय पक्ष जे त्यांना वाटतात, त्यांच्या प्रमुखांना बोलवावं. त्याशिवाय हा प्रश्न मांडण्याच्याबद्दल प्रकर्षानं गेले काही महिने ज्यांनी कष्ट घेतले, ते श्रीयुत जरांगे यांनाही निमंत्रित करावं. याशिवाय दुसरा जो वर्ग आहे ओबीसीच्या संदर्भातला, त्या ओबीसींचं नेतृत्व करणारे जे कुणी घटक असतील, मग त्याच्यात छगन भुजबळ असोत, त्यांचे अन्य सहकारी असोत, त्यांनाही निमंत्रित करावं. आणि त्या संयुक्त बैठकीमध्ये आपण चर्चा करुन यातनं मार्ग काढण्याच्यासंबंधीची भूमिका घ्यावी.

एक कदाचित त्याच्यामध्ये अडचण येण्याची शक्यता आहे, की आज ५० टक्क्याच्यापेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही असा निर्णय यापूर्वी न्यायालयानी घेतलेला आहे. त्या निर्णयाबद्दलचा इश्यू जर आला, तर महाराष्ट्रातल्या आम्ही सगळ्यांनी मिळून केंद्र सरकारमध्ये आग्रहाची भूमिका त्याठिकाणी मांडावी, की तामिळनाडूमध्ये ७६ टक्क्याच्या आसपास आरक्षण यापूर्वी दिलेलं होतं. आणि तो निर्णय कोर्टात टिकला होता. पण, त्यानंतरचे जे जे निकाल कोर्टाच्यापुढे गेले, ते निकाल

तामिळनाडूसारखे नाहीत. ते पन्नास टक्क्याच्या वर जाऊ नयेत अशा प्रकारचेच आहेत. याचा अर्थ असा आहे, की हा निर्णय, हे धोरण बदललं पाहिजे आणि पन्नास टक्क्याच्या वर आरक्षण द्यायचं हा अधिकार हा केंद्र सरकारनं घेतला पाहिजे. आम्ही महाराष्ट्रातले घटक याबाबतीत कुठल्याही प्रकारचे राजकीय मतभेद न घेता, केंद्र सरकारनं याच्यामध्ये पुढाकार घ्यायची तयारी ठेवली, तर आमचं पूर्ण सहकार्य हा जो काय बदल करायचा आहे त्यासाठी त्यांना राहील. सरकारच्या बाजूनं आम्ही समन्वयाची, सहकार्याची आम्ही भूमिका घ्यायला तयार आहोत. आणि या पद्धतीनं आपण प्रयत्न करून यातनं मार्ग काढू.

मला एक गोष्ट, कटुता कमी होण्याच्या दृष्टिनं माझ्या वाचनात आली आणि ही योग्य आहे असं मला वाटतं. श्रीयुत जरांगेंनी मराठा आरक्षणाचा प्रश्न जसा मांडला, तसंच त्यांनी धनगर आरक्षण, लिंगायत समाजाला आरक्षण, मुस्लिम समाजाला आरक्षण याबद्दलची सुद्धा भूमिका मांडली. याचा परिणाम इतर समाजाला जी चिंता वाटते, भीती वाटते, ती कमी होण्यास मदत होईल आणि हे सामंजस्य असंच प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सगळ्यांनी शिकावं अशा प्रकारचा आग्रह मी त्यांना केला. त्यांनी एक प्रश्नसुद्धा मला विचारला नाही. त्यांना मी जे काही बोललो, ते पटलं का नाही, मला माहीत नाही. पण, मी सांगितल्याच्यानंतर त्यांनी माझ्या हातात निवेदन दिलं. त्याचा मी स्वीकार केला आणि ही बैठक संपली.

उद्धव ठाकरेंच्या गाडीवर शेण फेकले, त्यासाठी हे कारण होतं असं मला वाटत नाही. त्याच्यामध्ये दुसरं कारण असावं असं दिसतंय. तिथं राजकीय मतभेदाचा विषय असावा असं मला वाटतं. पण, आरक्षणाचा प्रश्न आज जरांगे आणि त्यांचे सहकारी मांडतायंत ही वस्तुस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांना मी सुचवलंय, की तुम्ही ही सर्वपक्षीय बैठक बोलवा. कधी बोलवाल त्यावेळी मी हजर राहीन. या बैठकीत आपण एकमतानं निर्णय घेऊ. एकवाक्यता आपल्यात ठेऊ आणि ती एकवाक्यता ठेवण्याच्यासाठी आमचं सहकार्य मुख्यमंत्र्यांना असेल.

एकदा मुख्यमंत्र्यांच्याबरोबर बैठक झाल्याच्यानंतर ओबीसीतून आरक्षणासह सगळे प्रश्न त्याठिकाणी मांडता येतील. द्यायचं, कशातनं द्यायचं, ज्यातून सामंजस्य टिकायला मदत होईल असा काय मार्ग आहे, आज खरंच पन्नास टक्क्याचं बंधन आहे, ते बदलायची आवश्यकता मला वाटते, ते जर बदलायचं असेल तर कसं बदलता येईल या सगळ्या गोष्टीचा निकाल त्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत होईल अशी मला खात्री आहे.

राज ठाकरेंनी दोन- तीन वेळा माझं नाव का घेतलं हे मला कळलेलं नाही. कारण मी या रस्त्याने कधीच जात नाही. मला माझा महाराष्ट्र थोडासा ओळखतो. माझी अशी पार्श्वभूमी नाही, मी कधीही आग्रह केलेला नाही आणि करणार नाही. त्यांनी कारण नसताना माझं नाव घेतलं आहे. मी पण आज महाराष्ट्रात फिरत आहे. माझ्या पण गाड्या अडवल्या आहेत. मलाही निवेदन दिले. आता हे पण पवारांनी सांगितलय का मला अडवा? मी काय कुणाच्या हेतूबद्दलची शंका घेणार नाही. कारण, माझ्याकडे त्यासंबंधी काय पुरावा नाही. मणिपूरचा प्रश्न वेगळा आहे. हातभार लावण्याचा प्रश्न कुठे येतो. मी बोललो हे हातभाराचे लक्षण आहे की सौजन्याचे लक्षण आहे?

आरक्षणाच्या प्रश्नावर एकमेकाला दोष देण्याची ही वेळ नाही. यातनं मार्ग कसा निघेल हे पाहिलं पाहिजे. सत्ताधारी पक्षानं त्यावेळी केलं नसेल, तर आम्ही सांगू की चला आपण जाऊया. आज हा वाद आम्हाला वाढवायचा नाही. हा प्रश्न सोडवायला हातभार लावायचांय. जरांगे निवडणूक लढविण्यासंदर्भात



बोलत असतील, तर लोकशाहीमध्ये निवडणूक लढवण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, निर्णय घ्यायचा, लोक उभे करायचा. उभे करतील. कुणाला विरोध करायचा, कुणाला समर्थन द्यायचं. त्याच्यात काय चुकीचं आहे? माझाही पक्ष काही जागा लढवणार आहे.

परमबीर सिंग यांनी केलेले आरोप अत्यंत बेजबाबदारपणाचे आहेत. त्यांचं वागणं, त्यांचं कार्य हे योग्य नसल्यानं सरकारनं त्यांच्यावर ॲक्शन घेतली होती. ते आता निवृत्त झालेले आहेत. आज तीन वर्षाच्यानंतर त्यांना का जाग आली? किती गोष्टी सांगता येतील त्यांच्याबद्दलच्या. पण, ठीक आहे. निवृत्त अधिकारी आहेत. उगीच त्यांच्याबद्दल आपण जास्त बोलणं योग्य नाही.


महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावर अजिबात म्हणजे अजिबात मतभेद नाहीत. आम्ही कोणत्याही पदाची अपेक्षा केलेली नाही. आता त्याच्यात जर कोणी असेल, तरी मी नाही. ज्या पक्षाचे जास्त आमदार त्या पक्षाचा मुख्यमंत्री असं पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितलं असलं तरी ठीक आहे. ते जबाबदार घटक आहेत आमच्या आघाडीतले. त्यांचं मत हे दुर्लक्षित करण्यासारखं नाही.

वक्फ कायदा बदलण्यासंबंधीचा ड्राफ्ट आत्ताच माझ्या हाती आला आहे. आम्ही तो वाचणार आहोत. आमची इच्छा अशी होती, की सुप्रिया सुळेंनी पार्लमेंटमध्ये असं सुचवलंय, की याबद्दल निर्णय घ्यायला आत्ता लोकसभेत चर्चा न करता लोकसभेची सर्वपक्षीय कमिटी नेमावी, त्या प्रमाणं कमिटी नेमली, त्या कमिटीत आमच्या पक्षातनं दोन नावं दिली होती, त्यातलं एक नाव सरकारनं घेतलेलं आहे. आता ती कमिटी येत्या सहा महिन्याच्या आत विचार करून याबद्दलचा निर्णय घेईल आणि तो पार्लमेंटमध्ये येईल.

राज्यकर्त्यांनी, राज्य सरकारनं लाडकी बहिणचा निर्णय घेतलांय. सरकारनं नक्कीच विचार केलेला असेल. नक्कीच त्यांच्याकडे पुरेसे पैसे असतील. कदाचित इतकी रक्कम शिल्लक आहे सरकारकडे, तर आणखी चार निर्णयसुद्धा घेतील.

बांगलादेशच्या स्थितीबद्दल बोलायचं झालं, तर महंमद युनूस हे उत्तम पद्धतीचे शिक्षण घेतलेले आहेत. ते कधीही समाजामध्ये, धर्मियांच्यामध्ये, भाषिकांच्यामध्ये अंतर वाढावं अशा प्रकारचं काम करणार नाहीत. त्यामुळं एक बॅलन्स भूमिका घेणारं नेतृत्व ही बांगलादेशची आज गरज होती. असं वाटतंय, की परिस्थितीत सुधार होईल आणि भारत सरकार त्यांना सहकार्य करील. बांगलादेशमधील आरक्षणाचा प्रश्न आणि महाराष्ट्रातला आरक्षणाचा प्रश्न याच्यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे.

अजित पवारांनी पंतप्रधान मोदींना माझ्यावर टीका केल्याचा फटका लोकसभेला बसल्यामुळे अशा प्रकारची टीका करू नका असे सांगितल्याबद्दल मला काय माहिती नाही. त्यांच्यात काय चर्चा झाली माहिती नाही. पण माझी एकच इच्छा आहे, की लोकसभेला अठरा सभा घेतल्या प्रधानमंत्र्यांनी. चौदा ठिकाणी आमचे उमेदवार निवडून आले. येणाऱ्या विधानसभा








निवडणुकीत त्यांनी अधिक सभा घ्याव्यात, महाराष्ट्राच्या जनतेला संबोधित करावं. म्हणजे एक स्थिर सरकार आम्ही तुम्हाला देऊ.

गुजरातला स्पोर्टस् सिटी नेली असली तरी राज्याराज्यामध्ये कुटता निर्माण करण्यासंबंधी माझ्यासारख्यानं भाष्य करू नये असं मला वाटतं. जसं क्रीडा क्षेत्रात हरियानाचं महत्त्व आहे, तसं आज बालेवाडी, आज बालेवाडीला इतकं इन्फ्रास्ट्रक्चर आहे, देशात कुठल्याही राज्यात कुणाकडेही नाही. ठीक आहे, असं आहे की मोदी साहेबांना गुजरात हा यादृष्टिनं नवीन खेळाडू तयार करायला अतिशय महत्त्वाचं राज्य वाटत असेल, तर प्रधानमंत्र्यांचे यापूर्वीचे अनेक निर्णय पाहिले, तर हे गुजरातच्या संबंधीची आस्था हे आपल्याला बघायला मिळते ही चांगली गोष्ट आहे. एकेकाळी तोही आपला भाग होता.

सध्याच्या सरकारची शेतीमालाच्या निर्यातीची जी भूमिका आहे, ती शेतकऱ्यांच्या हिताच्या सक्त विरोधी आहे. उत्पादन खर्चाचा विचार केला जात नाही आणि त्यांना अधिक प्रोत्साहित करायच्या भाषणांशिवाय दुसरं या सरकारकडून काही होत नाही. आणि त्याचा परिणाम शेती अर्थव्यवस्थेवर आज होतोय आणि शेती अर्थव्यवस्था संकटात आली तर देशाची अर्थव्यवस्थासुद्धा संकटात येऊ शकते. ५४ टक्के लोकांची क्रयशक्ती ही कमकुवत झाली तर त्याचा परिणाम बाकीच्या सगळ्या गोष्टीवर होईल.

बांगलादेशमध्ये सत्तांतर झाले. यासाठी तरुण पिढीने उठाव केला होता. त्यातून काही गोष्टी घडल्या. पण दुर्दैवाने त्याची प्रतिक्रिया भारतात काही ठिकाणी उमटली. प्रामुख्याने बांगलादेशच्या सीमेवरील पश्चिम बंगाल आणि इतर राज्यात परिस्थिती अधिक गंभीर होती. पण तिथे काही घडले त्याचे परिणाम महाराष्ट्रात उमटतील, असे कधी वाटले नव्हते. याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पण आज समाजातील सर्व घटकांमध्ये एकवाक्यता आणि सामंजस्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात जे काही घडले, ते राज्याच्या हिताचे नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करायची असेल तर समाजकारण आणि राजकारणातील व्यक्तींनी संयमाचा पुरस्कार करावा आणि शांतता कशी राहिल, याबद्दलची खबरदारी घ्यावी, एवढेच मी सांगू इच्छितो.

शासनाचे धोरण, शासनाची कारवाई, गृहखात्याची जबाबदारी यावर भाष्य करता येईल. मात्र आज मला शांतता आणि सौहार्द याचे जास्त महत्त्व वाटते. म्हणून मी अन्य बाबींवर भाष्य करू इच्छित नाही. शांतता कशी प्रस्थापित होईल, याबाबत मी अधिक आग्रही आहे. अन्य काही देशात घडणाऱ्या गोष्टींसाठी आपल्या राज्यातील लोकांचे जीवन संकटात येईल, असे काही करू नये.

लाडकी बहीण योजनेमुळे निवडणुका पुढे ढकलल्या का हे मला माहिती नाही. निवडणूक आयोगाला हा प्रश्न विचारायला हवा. आम्ही त्याबाबत काय बोलणार? भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करत असताना संबंध देशाच्या निवडणुका एकत्र व्हाव्यात, अशी भूमिका मांडली. ती भूमिका मांडून १२ तास होत नाहीत, तोवरच चार राज्यांची निवडणूक वेगवेगळी जाहीर झाल्याचे पाहायला मिळाले. याचा अर्थ पंतप्रधानांच्या म्हणण्याला आता फारसं काही महत्त्व द्यायचं कारण नाही. कारण पंतप्रधान बोलतात एक आणि निर्णय दुसराच होतो याची प्रचिती आपल्याला आली.संबंध देशाची निवडणूक एकत्र घेण्याची भूमिका मांडत असताना त्यांनी झारखंड व महाराष्ट्रात निवडणूक जाहीर केली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धोरणात

विसंगती दिसत आहे, एवढेच याप्रसंगी बोलू शकतो.

काल माझ्याकडे एका शिक्षण संस्थेची बैठक होती. आज सकाळीही रयत शिक्षण संस्थेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची माझ्याबरोबर बैठक होती. या सगळ्यांचं म्हणणं होतं की राज्य सरकारकडून येणाऱ्या स्कॉलरशिपच्या रकमा मोठ्या प्रमाणावर थकलेल्या आहेत. राज्य सरकारच्या इतर अनेक योजना, छोट्या घटकांना दिलेल्या सुविधा यासाठी लागणाऱ्या रकमेची तरतूद आज नाहीये. असं असताना आणखी नवीन आर्थिक बोजा वाढवायला नको. शेवटी मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी यावर भूमिका मांडतील.

येत्या काळात जम्मू-काश्मीर वगळता झारखंड, हरियाणा व महाराष्ट्र या तीन राज्यांमध्ये आपण उमेदवार देणार आहोत. अजित पवार यांनी बारामतीमधून निवडणूक लढविण्यात रस नसल्याचं म्हटलं असलं, तरी सार्वजनिक जीवनात किंवा राजकीय जीवनात निवडणुका लढवलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांचा निर्णय घेण्याचा अधिकार असतो. जिथे अनुकूल वातावरण असतं, तिथे त्याप्रमाणे निर्णय घेतले जातात. पण आता यांच्या मनात नक्की काय आहे, हे मला माहिती नाही.

मला काही माहिती नाही, गृहखात्याचे अधिकारी माझ्याकडे आले आणि त्यांनी सांगितलं, की ३ लोकांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ती तीन लोकं म्हणजे मी, आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) सरसंघचालक मोहन भागवत आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह. मला सुरक्षा कशासाठी दिली ते माहीत नाही. पण निवडणुका डोळ्यासमोर आहेत, म्हणून सुरक्षा दिली असावी. माझ्या दौऱ्याची खात्रीलायक माहिती मिळवण्याची व्यवस्था असू शकते. यासंदर्भात पण गृहमंत्रालयातील जबाबदार व्यक्तीशी संवाद साधणार आहे, त्यांच्याशी बोलून माहिती मिळाली की पुढे काय निर्णय घ्यायचा, काय करायचं ते ठरवणार.

मी माझ्या पक्षापुरतं सीमित सांगू इच्छितो की, आमच्याकडून कुणालाही मुख्यमंत्रिपदाबाबत रस नाही. आम्हाला कोणालाही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून प्रोजेक्ट करायचं नाही. आम्हाला फक्त महाराष्ट्रातील सत्तेत परिवर्तन हवं आहे. महाराष्ट्राच्या सत्तेत परिवर्तन करून एका विचाराने राज्यातील जनतेला उत्तम प्रशासन द्यायचं हीच आमची इच्छा आहे. त्यामुळे कोण असावं आणि कोण नसावं? हा प्रश्न नाही. आम्ही कोणीही असणार नाही. तसेच माझा तर प्रश्नच नाही.

बदलापूरमध्ये दोन अजाण बालिकांवर शैक्षणिक संस्थेच्या आवारात अत्याचार होतो ही गोष्ट प्रचंड धक्कादायक आहे. साहजिकच त्याची प्रतिक्रिया उमटलेली आपण पाहिली. बदलापूरमध्ये झालेला प्रकार धक्कादायक आहे. त्या प्रकरणात कठोर कारवाई केली पाहिजे. राज्य सरकारने अशा प्रसंगांना सामोरं जाण्यासाठी सतर्क राहिलं पाहिजे.

बदलापूरसारखी घटना घडते तेव्हा गृहखात्याच्या यंत्रणेने अतिशय कठोर भूमिका घेतली पाहिजे. तसंच या प्रकरणात जे काही बोलण्यात आलं ते बदलापूरपुरतं सीमित नव्हतं. मागच्या तीन ते चार दिवसात अशा घटना समोर आल्या आहेत. बालिकांवर अत्याचार, मुलींवर अत्याचार हे चित्र आपल्या राज्यामध्ये दुर्दैवाने दिवसेंदिवस वाढतं आहे हे पाहण्यास मिळतं आहे. या प्रकरणांतून लोकांचा उद्रेक होतो आहे, राग व्यक्त केला जातो आहे.



बदलापूरमध्ये लोक कमी होते, आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित होतं असं मुख्यमंत्री म्हणाले. पण हे राजकीय होतं म्हणणं योग्य नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असं बोलले नसते तर बरं झालं असतं. मला सांगा तिथे कुठला राजकीय

पक्ष होता? हा प्रश्न आपल्या संवेदना व्यक्त करण्याचा आणि भावना मांडण्यासाठीचा आहे. इथे कुणीही राजकारण आणलेलं नाही. आम्हा लोकांच्या मनातही नाही की अशा प्रकारे राजकीय हेतूने काहीतरी करावं. लोकांच्या तीव्र भावना व्यक्त करणं हाच हेतू आहे. माझी मुख्यमंत्र्यांना आग्रहाची विनंती आहे की याकडे तुम्ही जसं पाहता आहात तसं पाहू नये. अत्याचाराच्या घटना थांबत नाही, वाढत आहेत असं दिसतं आहे. त्यासाठी समाजाला जागृत करावं लागेल, कुटुंबांना जागृत करावं लागेल. हे प्रकार घडू नयेत म्हणून जे जे करावं लागेल. त्यासाठी शांततेच्या चौकटीत राहून आपण सगळ्यांनी जे करता येईल ते केलं पाहिजे.

एका अस्वस्थ करणाऱ्या प्रसंगाच्या निमित्ताने आज आपण आंदोलनासाठ एकत्र आलो आहोत. बदलापूरला बालिकेवर जो अत्याचार झाला, त्यामुळे सबंध देशात महाराष्ट्राच्या नावलौकिकाला प्रचंड धक्का बसला. महिलांच्या रक्षणाची जबाबदारी आजच्या राज्यकर्त्यांवर आहे. पण त्याची जाण राज्यकर्त्यांना राहिलेली नाही. त्यामुळे बदलापूरचा प्रकार झाल्याचा निषेध होत असताना आणखी काही ठिकाणी अशाच दुर्दैवी घटना घडल्या.

एक दिवस महाराष्ट्रात असा जात नाही. कुठे ना कुठे भगिनींवरच्या अत्याचाराची बातमी वाचायला मिळते. हे राज्य शिवछत्रपतींचं आहे. त्यांनी आपल्या राजवटीत एका महिलेवर अत्याचार झाल्याची तक्रार आल्यानंतर त्या आरोपीचे हात कलम करण्याची शिक्षा दिली होती. आजच्या स्थितीत जे घडलं त्याची गांभीर्यानं नोंद सरकारनं घेतली पाहिजे. संवेदनशील भूमिका घेतली पाहिजे. मला एका गोष्टीचं दुःख होतंय की राज्यकर्ते, राज्याचे प्रमुख आणि त्यांचे काही सहकारी म्हणतायत की बदलापूरच्या प्रकरणात विरोधक राजकारण आणतायत. मुलीबाळींवरील अत्याचाराबाबत कुणी आवाज उठवला तर त्याला राजकारण म्हणायचं हा निष्कर्ष राज्यकर्ते काढत असतील तर राज्यकर्ते किती असंवेदनशील आहेत, भगिनींकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन किती चमत्कारिक आहे याची प्रचिती आपल्या सगळ्यांना येते.

मी आंदोलनाला उपस्थित सर्वांना महिला सुरक्षेची शपथ देतो, की मी स्त्रियांवर होणारा हिंसाचार कधीही खपवून घेणार नाही. माझे घर, माझा परिसर, माझे गाव, माझे कार्यालय अशा कोणत्याही ठिकाणी जर महिलांची छेडछाड किंवा अत्याचार होत असेल, तर त्यास मी विरोध करून त्याबद्दल



आवाज उठवीन. मी मुलगा आणि मुलगी असा भेदभाव कधीही करणार नाही. महिलांचा सन्मान राखीन आणि या पुण्यनगरीत, महाराष्ट्रात आणि देशात महिलांसाठी अधिकाधिक सुरक्षित व भयमुक्त स्थिती बनवण्यासाठी प्रयत्न करीन. जय हिंद!



# समाजातील वाढत्या कटुतेला राज्य सरकारच जबाबदार सुप्रिया सुळे

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी ऑगस्ट महिन्यात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केलेली मते...**

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवताना ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सरकारने तो आधी सोडवला पाहिजे. मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारसमोर आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हा कळीचा मुद्दा आहे, जो केंद्र सरकार व संसदेच्या अखत्यारित आहे. त्यामुळे या मुद्द्यावर सर्वांनी संसदेत बोलायला हवं. मी प्रत्येक अधिवेशनावेळी हा मुद्दा संसदेत मांडते. त्याचबरोबर महाराष्ट्रातील इतर महत्त्वाचे प्रश्न देखील मी संसदेत मांडत असते.

सरकार एक सांगते, मंत्री दुसरेच काहीतरी सांगतात, त्यामुळे जो विस्कळीतपणा झालाय, समाजात हा प्रश्न वाढत चाललाय, जी कटुता वाढत चालली आहे. याला पूर्णपणे राज्य सरकारच जबाबदार आहे. गेल्या काही महिन्यांपासून राज्यात काय सुरू आहे. मंत्री एक बोलतात, मुख्यमंत्री दुसरेच

बोलतात. याचा अर्थ काय काढायचा?

शरद पवार ज्येष्ठ नेते आहेत. मराठा समाजाच्या त्यांच्याकडून अपेक्षा आहेत, हे खरे आहे. आमची पहिल्यापासून पारदर्शक भूमिका आहे. मराठा, धनगर, लिंगायत, मुस्लिम आणि भटक्या विमुक्त जमातीच्या आरक्षणाच्या संदर्भात आमची पूर्णपणे सहकार्याची भूमिका आहे. यावर चर्चा करून मार्ग काढायची तयारी आम्ही पहिल्या दिवसापासून दाखवली आहे. गेली १० वर्षे मी आणि अमोल कोल्हे संसदेत खासदार आहेत, आम्ही याबाबतील संसदेत अनेकदा बोललो आहोत. हे सर्व करण्यासाठी घटनादुरुस्ती करावी लागेल. राज्य सरकारला याबाबत आम्ही अनेकदा विनंती केली आहे. आम्ही चर्चेला तयार आहोत तुम्ही प्रस्ताव आणा, आम्ही पूर्ण ताकदीने उभे राहू, दिल्लीमध्ये जेव्हा ही घटनादुरुस्ती येईल तेव्हा कोणाचेही सरकार असले तरी आम्ही सहकार्य करू.

संसद हे असे प्रश्न मांडण्यासाठीचं महत्त्वाचं व योग्य व्यासपीठ आहे आणि मी त्या व्यासपीठाचा पुरेपूर वापर करते. आम्ही दडपशाहीवाले लोक नाही. कोणीतरी विरोधात बोललं म्हणून आम्ही त्यांना आयकर विभागाची नोटीस पाठवत नाही. केंद्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो व सक्तवसुली संचालनालयाची पथकं त्याच्यामागे लावत नाही.

भाजपवाले आमचा ७० वर्षांचा हिशेब मागतात. अशा पद्धतीचं गलिच्छ राजकारण आम्ही केलं नाही. भविष्यात सत्तेवर आल्यानंतरही आम्ही असं राजकारण करणार नाही. मी जेव्हा जेव्हा संसदेत सरकारविरोधात बोलते, प्रश्न मांडते तेव्हा तेव्हा माझ्या पतीच्या विरोधात नोटीस निघते. कालच एक नोटीस माझ्या कुटुंबाला मिळाली आहे. त्यानंतर मी परत काही प्रश्न मांडले, मी सरकार विरोधात बोलले. आता अजून एक लव्ह लेटर येईल. आम्ही त्याला नोटीस म्हणत नाही, आम्ही त्या नोटिशींना प्रेमपत्रं म्हणतो. सरकारला प्रश्न विचारला की अशी प्रेमपत्रं येत असतात.

आज समाजात प्रचंड अस्वस्थता आहे, ही अस्वस्थता वाढवण्याचे पाप जर कोणी केले असेल तर महाराष्ट्राच्या या निष्क्रिय ट्रिपल इंजिन खोके सरकारने केले आहे. कारण, त्यांच्या कोणत्याही निर्णय प्रक्रियेत सातत्य नाही. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीनंतर सरकार बदलणार आहे. आम्ही मुख्यमंत्रीपदाबाबत अडकलो नाही. आम्ही सेवा करण्यासाठी राज्य सरकार आणणार आहोत.

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याच्या योजनेस केंद्र सरकारने नकार दिला असताना महाराष्ट्र सरकारची वेगळी भूमिका आहे. केंद्र आणि राज्य सरकारमध्ये याविषयी विसंवाद असणे ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रातील नोकऱ्या इतर राज्यात गेल्या, तसे महाराष्ट्राचे पाणी घालवू नये.

गृहमंत्र्यांना आपल्या नागपूरमध्ये काय घडतेय त्याची माहिती नसते. सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांना धमक्या दिल्याशिवाय काही करता येत नाही. आम्हाला मतदान न केल्यास योजना बंद होईल, अशा धमक्या ते मतदारांना देत आहेत. एकतर महायुतीचे सरकार येणार नाही आणि लाडकी बहीण योजनाही बंद होणार नाही. आम्ही त्यात सुधारणा करू.

पुरेसे सुरक्षा दल उपलब्ध नसल्याचे कारण देत महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक लांबणीवर टाकणे हास्यास्पद असून ही पळवाट, रडीचा डाव आहे. लोकसभा निवडणुकीआधी बहीण लाडकी नव्हती. निकालानंतर ती लाडकी झाली. लाडकी बहीण योजनेशिवाय हे विधानसभेत उत्तीर्ण होऊ शकत नसतील तर, महायुती सरकारचे हेच अपयश आहे. कितीही निवडणूक पुढे ढकलली तरी निकाल बदलणार नाही.

लाडकी बहीण योजनेत विरोधक चुकीचे अर्ज भरत असल्याचा आरोप करणारे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात चौकशी करावी. सरकारची संगणकीय आज्ञावली काय करत आहे? फडणवीस यांनी कुठेही चर्चेसाठी यावे.





राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

एखादी घटना घडली तर नुसत्या बदल्या करुन प्रश्न सुटणार नाही. गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांना याचं उत्तर द्यावं लागेल. जी घटना बदलापूरमध्ये घडली त्याचा मी जाहीर निषेध करते. अशा गोष्टी या फार संवेदनशील पद्धतीने हाताळायच्या असतात. त्यामुळे माध्यमांना आणि सगळ्याच जबाबदार लोकांना विनंती आहे की त्या मुलींची ओळख जाहीर करु नये. सरकारने हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात नेलं पाहिजे आणि या प्रकरणातल्या व्यक्तीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. बलात्कार करणाऱ्याला फाशी झाली तरच असं कृत्य करणाऱ्यांच्या मनात भीती बसेल. आज खाकी वर्दीची भीती उरलेली नाही, असं चित्र दिसतं. पोर्शे कार प्रकरण झालं त्यातही काय काय घडलं ते पाहिलं तर कळतं.

महाराष्ट्राच्या पोलिसांचा मानसन्मान होतो, देशातले सर्वात चांगले पोलीस म्हणजे महाराष्ट्र पोलीस आहेत. आता काय घडतंय याचं उत्तर हे गृहमंत्र्यांना द्यावं लागेल. बलात्काराच्या घटना घडत आहेत, महिलांविरोधातले अत्याचार वाढले आहेत. लाडकी बहीण योजना राबवून महिलांना सरकार १५०० रुपये देतं आहे. त्या योजनेचं स्वागत करते, पण महिलेची सुरक्षितता ही पण सरकारची जबाबदारी आहे.

आज पोलिसांच्या विरोधात आणि जी घटना घडली त्याविरोधात जनक्षोभ का उसळला आहे? कारण ज्यांच्यावर अत्याचार झाला त्या मुलींचे पालक १२ तास वणवण फिरत होते. पण एकाही पोलीस स्टेशननी दखल घेतली नाही. छत्रपतींच्या महाराष्ट्रात हा न्याय आहे का? शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात हा न्याय आहे का? जर सरकार लेकींना न्याय देऊ शकत नसेल तर या असल्या सरकारने राजीनामा दिला पाहिजे. शाळा कुणाचीही असो, जर लेकींच्या विरोधात असा काही प्रकार घडत असेल तर कारवाई झाली पाहिजे. ज्यांनी या आरोपीला वाचवण्याचा निर्णय घेतला असेल त्यांचे राजीनामे घ्या. बहिणींच्या सुरक्षेसाठी तुम्ही काय करत आहात? याचं उत्तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी द्यावं.




बदलापूरची घटना अतिशय संवेदनशील आहे. पण, ज्या पद्धतीनं तो विषय हाताळला गेला ते दुर्दैवी आहे. महिला आणि नागरी सुरक्षितता हा अतिशय गंभीर विषय झाला आहे. महाविकास आघाडीनं आणलेल्या शक्ती कायद्याचं पुढं काय झालं? गेल्या आठवडाभरात अशा सात घटना घडल्या आहेत. गुन्हेगारांवर कायद्याचा धाक का नाही? शिक्षण संस्थेची तक्रार जेव्हा आली होती, तेव्हाच शिक्षण मंत्रालयानं कारवाई का केली नाही? संस्थाचालकांनी लावलेला उशिर, शिक्षण खात्यानं केलेलं दुर्लक्ष व पोलिस यंत्रणेनं केलेलं दुर्लक्ष याची पारदर्शकपणे चौकशी झाली पाहिजे. पोलिसांच्या बदल्या करून प्रश्न सुटणार नाहीत. गृहमंत्र्यांनी याची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे.

महिलांना सरकारकडून दीड हजार रूपये नको, तर सुरक्षितता हवी आहे. महिलांवरील अत्याचाराविरोधात आंदोलन करणं हा जर गुन्हा असेल तर मला तो मान्य आहे. सरकारनं मला फाशीची शिक्षा द्यावी. जोपर्यंत राज्यातील महिला सुरक्षित नाही, तापेर्यंत आम्ही आंदोलन करत राहणार. माझ्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेसाठी मोठी पोलिस यंत्रणा वापरली जात आहे. आमची सुरक्षा काढून घ्यावी व जनतेच्या सुरक्षेसाठी नियुक्त करावी. सरकार पक्ष आणि घरे फोडण्यात इतके व्यस्त आहे, की राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी त्यांना वेळ नाही. हे खुर्ची प्रिय सरकार आहे.

■■



# विधानसभेला महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता येणारच

**जयंत पाटील**

महाराष्ट्रातील हे सरकार जाणं हीच जनतेची भावना असून लोकसभेपेक्षा आता विधानसभेला जनतेची आणि कार्यकर्त्यांची भावना याबाबत अधिक तीव्र आहे आणि आम्हाला खात्री आहे की महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता येईल. आमची यात्रा साधी आहे. आमच्याकडे फार पैसे नाही. आमच्याकडे काही अर्थ खातं नाही. आमचा कोणताही इव्हेंट नाही. जनतेच्या मनातील प्रश्न आम्ही मांडत आहोत. त्यासाठी कोणता विशिष्ट रंग देण्याची गरज नाही. त्यामुळं आमच्या यात्रेला जनसामान्यांचा पाठिंबा आहे.

अजित पवार व त्यांचे सहकारी गुलाबी बसेस सोबत घेऊन व गुलाबी कपडे घालून जरी प्रचार करत असले तरी आम्ही जनतेचा रंग सोबत घेऊन प्रामाणिकपणे काम करीत आहोत. महाविकास आघाडीच्या घटक पक्ष असलेल्या शिवसेनेचे प्रमुख दिल्लीला जाऊन विविध नेत्यांना भेटत आहेत. आम्ही एकत्रित राहून महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीची सत्ता आणू व सगळ्यांच्या सहमतीने कोणाला मुख्यमंत्री करायचे ते ठरवू.

महाविकास आघाडीच्या जागा वाटपासंदर्भात या अगोदर एक बैठक झालेली आहे. लोकसभेचे अधिवेशन संपल्यानंतर जागा वाटपाचा अंतिम निर्णय होऊ शकतो. कोणत्या मतदारसंघात कोण उमेदवार असणार व ती जागा कोणत्या घटक पक्षाला सुटणार? हे आमच्या महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीतच ठरेल. अद्याप कोणती जागा कोणाला दिली व कोणत्या जागेवर कोण उभे राहणार असे काहीही अंतिम झालेले नाही.

दरम्यान जुन्नरचे आमदार अतुल बेनके पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात येणार असल्याचे मी ऐकले आहे तथापि ते अद्याप मला भेटले नाही. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेकजण आमच्या संपर्कात आहेत. पण ते आमच्याबरोबर येतील असा गैरसमज मी करणार नाही. कारण त्यांचं तिकडे व्यवस्थित सुरु आहे. त्यामुळे त्यांना आता इकडे येणं योग्य वाटत नसेल असं मला वाटतं. त्यामध्ये ईडीची

टांगती तलवार आहे, त्यामुळे आमच्याकडे येण्यास जास्त कोणी उत्सुक नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार हे महाविकास आघाडीत असते तर नक्कीच मुख्यमंत्री झाले असते.

अजित पवारांनी नाशिक येथे शेतकऱ्यांची माफी मागितली. पण, जो बुंद से गयी वो, हौदसे नहीं आती. आता माफी मागून काय फायदा आहे? तुम्ही केंद्र सरकारच्या विरोधी भूमिका घ्यायला हवी होती. कांदा उत्पादकांना न्याय द्यायला पाहिजे होता. हे सगळे दिल्लीला जातात ते केवळ स्वतःची खुर्ची वाचवण्यासाठी जातात. कांदा उत्पादकांसाठी कुणीच गेलं नाही. कांदा उत्पादकांसाठी गुजरातला न्याय मिळाला. त्यावेळी महाराष्ट्र गप्पच होता. त्यानंतर महाराष्ट्रात हळूहळू कांदा निर्यात सुरू झाली. कांद्याला दर मिळवून आणला असता तर ही वेळ आली नसती. कांदा निर्यातीत अक्षम्य अपराध झालेला आहे. कांदा उत्पादक शेतकरी याचे प्रायश्चित्त सरकारला निश्चितच देतील. या सरकारकडून शेतकरी विरोधी धोरणे राबवली जात आहेत. तरूणांच्या हाताला काम मिळत नाही, बेरोजगारी वाढली आहे. महागाईही प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यातून जनतेच्या मनात निर्माण झालेल्या खदखदीतून महायुतीचे सरकार गडगडल्याशिवाय राहणार नाही आणि महाविकास आघाडीचेच सरकार सत्तेवर येईल, याबाबत माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राहिलेली नाही. त्यामुळं कोणताही गुन्हा केला, तरी आपण सहज निसटून जाऊ अशी गुन्हेगारांची धारणा झालेली आहे. बदलापूर अत्याचार प्रकरणात पोलिस आणि शाळांबाबत सरकारने ताबडतोब ठोस कारवाई करावी अशी आमची मागणी आहे. अशा घटना घडताना पोलिसांकडून कृती झाली नाही, याचा जाबही विचारायला हवा. ठाण्यामध्ये गुन्हेगारीचं राजकीयकरण झाले आहे. त्यामुळे दिरंगाईने कारवाई करणं हा ठाण्यातील पोलिस



अधिकाऱ्यांचा ट्रेंड झालांय.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्राकडं पाहण्यासाठी वेळ नाही. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्था पाहण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नाही. याबाबत त्यांना फारसं सोयरसुतक नाही. फक्त सत्ता कशी आणायची? याकडे त्यांचं सर्व लक्ष आहे. देवेंद्र फडणवीस यांची जबाबदारी मोठी आहे, कारण त्यांच्या भरवशावर दोन पक्ष अवलंबून आहेत. त्यामुळे त्यांच्यात आणि यांच्यामध्ये जास्त काही ताळमेळ नाही. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्ली वाऱ्या वाढल्या








असून महाराष्ट्रातील प्रश्न आणि बदलापूर सारख्या गंभीर घटनांकडे बघण्यासाठी त्यांच्याकडे वेळ राहिला नाही, असं मला दिसत आहे.

महाराष्ट्रातील महिलांचं देखील असं म्हणणं आहे, की राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्हाला देण्यात येणार असलेले १५०० रुपये नको. मात्र, आम्हाला सुरक्षितता द्या. पण महिलांना सुरक्षितता देत असताना राज्यातील कायदा व सुव्यस्था राखण्यास हे महायुतीचं सरकार अपयशी ठरत आहे.

भारतीय जनता पक्षाचं काहीच खरं नसतं. एकदा त्यांनी ७० हजार कोटींचा आरोप केला. पुढे त्याच लोकांबरोबर सरकार स्थापन केलं. आता नवाब मलिक यांच्यावर भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी अतिशय गंभीर आरोप केले होते. आता त्याच नवाब मलिक यांना महायुतीत एक जागा देतील अशी परिस्थिती आहे. हे देवेंद्र फडणवीस यांना आणि भाजपालाही मान्य असेल, असं गृहीत धरता येईल. कारण नवाब मलिक यांच्या मतदारसंघात काल मोठा कार्यक्रम पार पडला.

बदलापूरच्या शाळेतील संस्थाचालकांना वाचवण्याचा सरकार प्रयत्न करतंय. महाराष्ट्रात आमच्या भगिनी सुरक्षित नाहीत, हे बदलापूरच्या घटनेनं पुढं आलं. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसवण्यात आली आहे. राज्याचं गृह खातं कायदा व सुव्यवस्था राखू शकत नाही हे वारंवार सिद्ध होतंय. बदलापूरच्या घटनेत गुन्हा नोंद करायला उशिर झाला, त्यामुळं पोलिस यंत्रणा कुचकामी ठरली आहे. महाराष्ट्रात महिला सुरक्षित नाहीत, त्यांच्यावरील अत्याचारांच्या गुन्ह्यात वाढ होतेय. बालकांवरील गुन्ह्यांत तिप्पट वाढ झालीय. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेवर सरकारचं नियंत्रण नाही. गुन्ह्यांवर जरब बसेल अशी कोणतीही कारवाई ते करत नाहीत. सरकारी पक्षाकडून पोलिसांच्या कामात हस्तक्षेप होतोय. त्यामुळं महाराष्ट्रात लाडक्या बहिणी सुरक्षित नाही, हे आमच्या भगिनींना जाणवतंय. लाडक्या बहिणींना सुरक्षिततेची गरज आहे अशी आग्रही मागणी गृहिणी करतायंत. बदलापूरची संस्था सत्ताधारी पक्षाशी संबंधित पदाधिकाऱ्याची आहे. त्यामुळं त्या संस्थाचालकांना वाचवण्याचा प्रयत्न होईल अशी शंका लोकांच्या मनात आहे. कुठलीही बाजू नसणारा वकील हा सरकारनं द्यावा.

■■







'छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवराय, शिवद्रोह्यांना करू गपगार, माफी नाही हद्दपार' अशा घोषणांनी रविवार, १ सप्टेंबर २०२४ रोजी फोर्टचा परिसर दुमदुमला. मालवणच्या राजकोटीवरील शिवरायांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने मिंधे–भाजप सरकारविरुद्ध 'जोडे मारा' आंदोलन केले. महाराष्ट्राच्या दैवताचा अपमान सहन केला जाणार नाही, असे ठणकावत या आंदोलनात हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते आणि शिवप्रेमी जनता सहभागी झाली होती. भगवे झेंडे तसेच मिंधे सरकार आणि भारतीय जनता पक्षाच्या निषेधाचे फलकही अनेकांनी हाती घेतले होते. 'खाऊन खाऊन खाणार कोण, भाजपाशिवाय आहेच कोण', 'शिवद्रोह्यांना करू गपगार, माफी नाही हद्दपार, शिवद्रोह्यांना नाही थारा, गद्दारांना जोडे मारा, शिवद्रोही मिंधे–भाजपला जाब विचारायला आलोय, आमच्या दैवताचा केलेल्या अपमानाचा, महाराष्ट्राच्या दुखाविलेल्या स्वाभिमानाचा', असे फलक या वेळी कार्यकर्त्यांनी झळकावले.

गेटवे ऑफ इंडियाजवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ मोर्चा पोहोचताच गेटवेचा परिसर शिवरायांच्या गगनभेदी घोषणांनी दुमदुमून गेला. गेटवेजवळ मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. त्यानंतर प्रमुख नेत्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. शिवद्रोही सरकारला पुन्हा महाराष्ट्रात येऊ द्यायचे नाही, असा निर्धार व्यक्त केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वअजित पवार यांच्या फलकावरील प्रतिमेला जोडे मारून आंदोलनाची सांगता झाली.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, आ. अनिल देशमुख, राजेश टोपे, मुंबई राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षा राखी जाधव, आदिती नलावडे व अन्य हजारो शिवप्रेमी कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# भ्रष्टाचारामुळे पुतळा कोसळला

## शरद पवार



**मालवण येथील शिवशिल्पाच्या अवमानाविरोधात महाविकास आघाडीमार्फत असंख्य शिवप्रेमींनी १ सप्टेंबर रोजी मुंबईत हुतात्मा स्मारक ते गेट वे ऑफ इंडिया असं निषेध आंदोलन केलं. त्या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उपस्थित शिवप्रेमींना केलेले संबोधन....**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करण्याची भूमिका आजच्या राज्यकर्त्यांनी घेतली. पुतळा कोसळण्याची ही घटना म्हणजे भ्रष्टाचाराचा नमुना आहे. मालवणजवळ शिवछत्रपतींचा पुतळा वाऱ्याने उध्वस्त झाला असं विधान राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केलं. आज आपण 'गेट वे ऑफ इंडिया'ला उभे आहोत, याही ठिकाणी शिवछत्रपतींचा पुतळा आहे. हे शिल्पही सागरी किनाऱ्याजवळच आहे. तरीही गेली ५० वर्ष हे शिवछत्रपतींचं शिल्प लोकांना प्रेरणा देत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये असे अनेक पुतळे आहेत पण मालवणच्या भागात उभा केलेला पुतळा हा एक भ्रष्टाचाराचा नमुना होता. त्याच्या उभारणीमध्ये भ्रष्टाचार झाला. असा जनमानसांमध्ये समज आहे आणि हा शिवछत्रपतींचा अपमान आहे. त्याचबरोबर संपूर्ण देशातल्या शिवप्रेमी जनतेचा अपमान आहे. हा अपमान ज्यांनी केला त्यांचा सक्त निषेध करण्यासाठी आजची ही मोहीम होती, तुम्ही या मोहिमेत सामील झालात याबद्दल धन्यवाद!

### मोदींचा हात लागेल तिथे उलटसुलट होतंय!

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याची घटना अस्वस्थ करणारी आहे. १९६० मध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर बसवलेल्या पुतळ्याला अजून काही झालेले नाही. मात्र सहा महिन्यांपूर्वी उभारलेला पुतळा कोसळला. या पुतळ्याच्या उद्घाटनाला आले कोण होते, तर नरेंद्र मोदी. त्यांचा हात लागतोय, तिथे काही ना काही उलटसुलट होतेय. पुतळा कोसळल्याबद्दल मोदींनी माफी मागितली आणि लगेच सांगितले की सावरकर यांची माफी मागण्यात आली नाही. विषय काय आणि हे बोलतात काय? असाही टोला शरद पवार यांनी मोदींना लगावला.



# महाराष्ट्र शिवद्रोहींना माफ करणार नाही

## उद्धव ठाकरे

पुतळा कोसळणे हा शिवछत्रपतींचा अवमान आहे. या घटनेला महायुतीचे सरकार जबाबदार आहे. हे सरकार शिवद्रोही आहे. मोदी तुम्ही आला. निवडणुकीसाठी आला होताच. आम्हाला अभिमान वाटला होता. नौदल दिन महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर होतोय याचा आनंद वाटला. तेव्हा घाईत महाराजांचा पुतळा बसवण्याची गरज नव्हती. निवडणुकीच्या वेळी मोदी म्हणत होते मोदी गॅरंटी आहे. हीच ती मोदी गॅरंटी जिथे हात लावीन तिथे सत्यानाश होईल. माफी तुम्ही कुणाकुणाची मागणार. भ्रष्टाचाराने पुतळा कोसळला त्याची माफी मागणार, राममंदिर गळतंय त्याची माफी मागणार, की घाई गडबडीने बांधलेलं संसद गळतंय म्हणून माफी मागणार की दिल्लीच्या विमानतळाचे छत कोसळलेय, पूल कोसळताहेत त्यासाठी माफी मागणार?

महाविकास आघाडीच्या आंदोलनानिमित्त भारतीय जनता पक्ष आणि मिंधे सरकारचे लोक आज रस्त्यावर उतरले. महाविकास आघाडी शिवपुतळा दुर्घटनेचे राजकारण करतेय असे ते म्हणतात. पण महाराष्ट्रात आज जे वातावरण चाललं आहे, त्याला मी राजकारण म्हणायला तयार नाही. पत्रकारांनी आम्हाला प्रश्न विचारला. शिवद्रोही मंडळी तुमच्या विरोधात रस्त्यावर उतरले. तुम्ही राजकारण करत आहात असा आरोप आहे. मी म्हणेन, की ते करतात ते राजकारण नाही. गजकरण आहे. खाजवत बसत आहे. खाजवू द्या त्यांना. चुकीला माफी नाही. हा शिवप्रेमी महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राच्या आत्म्याचा अपमान आहे. महाराष्ट्र



धर्माचा अपमान आहे. महाराष्ट्र शिवद्रोहींना कधी माफ करत नाही. करणार नाही. हे दाखवून देण्यासाठी जमलो आहोत. ही जाग आली आहे ती कायम ठेवा. या महाराष्ट्रद्रोह्यांना गेट आऊट ऑफ इंडिया करून दाखवल्याशिवाय राहू नका.

आपल्या मनातला संताप व्यक्त करण्यासाठी आपण गेट-वे-ऑफ इंडिया हे ठिकाण निवडले. इथे छत्रपती शिवाजी महाराज आहेत आणि गेट वे ऑफ इंडिया म्हणजे आपल्या देशाचे प्रवेशद्वार आहे. राज्यात घटनाबाह्य पद्धतीने बसलेल्या शिवद्रोही सरकारला आज आपण सांगु या... गेट आऊट ऑफ इंडिया, गेट आऊट.

छत्रपतींचा पुतळा कोसळल्याने देशभरातील शिवप्रेमींच्या भावना संतप्त आहेत. मात्र या घटनेची माफी मागताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चेहऱ्यावर मग्रुरी दिसत होती. चेहऱ्यावर मग्रुरी ठेवून मागितलेली माफी जनतेला मान्य कशी होईल? पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात आले होते. त्यांनी माफी मगितली. माफी मागितली नसती तर त्यांना महाराष्ट्राने शिल्लक तरी ठेवले असते काय? पण ती माफी मागताना मोदींच्या चेहऱ्यावर जी मग्रुरी होती ती मग्रुरी तुम्हांला पसंत आहे का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी करताच, उपस्थित तमाम शिवप्रेमींनी 'नाही, अजिबात नाही...' असा गगनभेदी प्रतिसाद दिला. मोदीजी, माफी मागताना नतमस्तक हे केवळ शब्दात आम्हांला मंजूर नाही. मग्रुरी माफी तर आम्हांला अजिबातच मान्य नाही.




स्टेजवर मुख्यमंत्री बसले होते. सोबत दीड शहाणे, दोन शहाणे होते. एक फूल दोन हाफ होते. एक हाफ तर नाचत होता. मोदींनी माफी कशासाठी मागितली. नरेंद्र मोदींनी पुतळा पडला म्हणून माफी मागितली की पुतळा बसवताना भ्रष्टाचार झाला म्हणून मागितली? भ्रष्टाचाऱ्यांवर पांघरूण घालण्यासाठी मागितली? देशाचे प्रवेशद्वार गेट वे ऑफ इंडिया हे असून त्याच्या साक्षीने या शिवद्रोह्यांना गेट आऊट ऑफ इंडिया केल्याशिवाय गप्प बसू नका.

## संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान: शाहू महाराज



छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याने जनतेत संताप आहे. हा महाराजांचा व संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान आहे. ज्यांनी हे कृत्य केले, त्यांना माफी नाही. जे लोक याप्रकरणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा मान राखला गेला पाहिजे. ज्याने तो पुतळा बसवला त्याची चौकशी झाली पाहिजे.



## कमिशनखोरीने शिवरायांचा अवमान : नाना पटोले

भाजप सरकारने कमिशनखोरी व भ्रष्टाचार करून छत्रपती शिवरायांचा अवमान केल्याचा आरोप केला. मालवणमधील घटनेने फक्त शिवरायांचा पुतळाच पडला नाही, तर या भ्रष्टाचारी सरकारच्या नाकर्तेपणामुळे महाराष्ट्र धर्मही पायदळी तुडवला गेला आहे.

राज्यात आणि देशात शिवद्रोही सरकार आले आहे. महाराजांच्या नावाने राजकारण करणे आणि पेशवाईसारखा महाराजांचा अपमान करणे सुरु आहे. कमिशन खोरी आणि भ्रष्टाचारामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे अवमान करण्याचे पाप या सरकारने केले आहे. मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रतिमा पडला. ती फक्त महाराजांची प्रतिमा नसून तर महाराष्ट्राचा धर्म आणि महाराष्ट्राचा अवमान राज्य आणि केंद्र सरकारने केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या सरकारच्या विरोधात आज आपण एकवटलो आहोत.

या आंदोलनाला शरद पवार साहेब आणि खासदार शाहू महाराज तब्येत बरी नसतानाही उपस्थित राहिले. वयाचे कुठलेही बंधन न ठेवता शिवद्रोही सरकारच्या विरोधात महाराजांच्या अपमानाचा निषेध करण्यासाठी हे दोघेही उपस्थित झाले आहेत. पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी माफी मागितली आणि आम्ही राजकारण करतोय असे विचारले जात आहे. ज्या दिवशी महाराजांचा अवमान या लोकांनी केला त्या दिवशीच महाराष्ट्राच्या जनतेने माफी मागितली की, आम्ही चुकून या सरकारला देशात आणि राज्यात आणले. त्यांनी आमच्या महाराजांचा अपमान केला म्हणून पुढच्या काळात शिवद्रोही सरकार महाराष्ट्रात येऊ देणार नाही, याची शपथ आम्ही घेतली आहे.

जे माफीवीर लोकं आहेत, मोदी असो की शिंदे असो, हे केवळ निवडणुकीसाठी माफी मागत आहेत. या माफीवीरांना घरचा रस्ता दाखवायचा आहे. हा फुले शाहू, आंबेडकर आणि शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र घडवायचा आहे. आपल्याला या शिवद्रोही सरकारला चलेजावचा नारा देणार आहोत.



## शिवछत्रपतींचा अपमान सहन करणार नाही : सुप्रिया सुळे

निवडणुका आल्या, की भाजपला छत्रपती शिवाजी महाराज आठवतात. सत्ताधारी पक्षच आमच्या विरोधात आंदोलन करत आहेत, हे हास्यास्पद आहे. याचा अर्थ ते घाबरलेले आहेत. शिवछत्रपती हे आमच्यासाठी दैवत आहेत. त्यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या गृहमंत्री आणि शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे होता. ज्या पद्धतीनं केसरकरांनी स्टेटमेंट केलं, त्याबद्दल मला धक्का बसला. आम्ही कित्येक वर्षे एकत्र काम केलंय. त्यावेळी ते असे नव्हते. पण त्यांना काय झालंय कळत नाही. भारतीय जनता पक्षाबरोबर गेलं, की या लोकांना काय होतं कळत नाही. त्यांचं स्टेटमेंट धक्कादायक होतं. पुतळा कोसळणे हे शुभसंकेत असल्याचं त्यांनी म्हटलं. त्याचा जाहीर निषेध झाला पाहिजे. मला विचाराल, तर अशा माणसाला एमएलएचा फॉर्म पण भरू दिला नाही पाहिजे. तुम्ही आमचं दैवत असलेल्या शिवछत्रपतींचा अपमान करतांय आणि मुख्यमंत्री हे सहन करतायंत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान दिलंय, त्या संविधानामध्ये आम्हाला शांततेच्या मार्गानं आंदोलन करायचा अधिकार आहे. म्हणजे आता हे ईस्ट इंडिया कंपनी झालेत. या गलिच्छ सरकारला सत्तेवरून हटविले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी माफी मागितली, ती कंडिशनल होती. त्यांनी सांगितलं, की मी माफी मागितली तर ते माफी मागणार का? अटी घालून माफी मागायची नसते, तर मनापासून मागायची असते.

आम्ही लोकशाही आणि संविधानाला मानणारी लोकं आहोत. अदृश्य शक्ती यावर घाला घालण्याचं काम करतंय. आम्ही संविधानाचा मानसन्मान करणार आणि संविधान बदलायचा प्रयत्न जर कधीही अदृश्य शक्तींनी केला, तर आमच्या शेवटच्या श्वासापर्यंत आम्ही लढत राहणार. जीव गेला तरी चालेल, आम्ही संविधान अदृश्य शक्तीला बदलू देणार नाही.



## भाजपची महाविकास आघाडीविरुद्ध आंदोलनाची नौटंकी- **संजय राऊत**

मिंधे सरकारचा भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणामुळे शिवरायांचा पुतळा कोसळला. त्याचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीने सरकारला जोडे मारा आंदोलन केले असताना त्याविरोधात भाजपने मुंबईसह विविध भागात आंदोलन करून नौटंकी केली. भाजपचे आंदोलन म्हणजे मूर्खपणा आहे. भाजपवाले शतमूर्ख आहेत. त्यांचे डोके फिरलेय. असा हल्ला त्यावरून शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी चढवला.

श्री. राऊत यांनी दै. सामनाच्या आपल्या संपादकीयमध्ये असे लिहिले आहे की,

**''एक ब्रह्मचारी गाढवाशी झोंबता, हाणुनिया लाथा पळाले ते ।**
**गाढवही गेले, ब्रह्मचर्य गेले, झाले तोंड काळे, जगामाजी ।।**

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांनी एका ब्रह्मचाऱ्याच्या कर्तृत्वाची कथा अत्यंत विडंबनात्मक पद्धतीने सांगितली आहे. हा अभंग रचताना तुकाराम महाराजांना मोदी, फडणवीस, मिंधे, केसरकर, शेलार, अजितदादा अशी भाजपची टोळी दिसत होती काय ते सांगता येणार नाही, पण हेच वर्णन या मंडळींनाही तंतोतंत लागू पडले आहे. महाराष्ट्रातील छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळून पडताच जनमत तापले आहे व जनतेने सरकारविरुद्ध आंदोलन सुरू केले. मुंबईतील गेट वे ऑफ इंडियासमोर भ्रष्ट आणि शिवद्रोही सरकारला जोडे मारण्याचा कार्यक्रम झाला. लोकशाहीत अशी आंदोलने होणारच. भारतीय जनता पक्षानेही ती केली आहेत. पण आज त्यांचे सरकार राज्यात असताना त्यांना लोकशाही मार्गाने होणारी ही आंदोलने नकोशी झाली. 'जोडे मारा' आंदोलनात पोलिसांनी अडथळे आणले व मूर्खांचा कारभार असा की, छत्रपती शिवरायांच्या सन्मानासाठी विरोधकांनी केलेल्या आंदोलनास विरोध किंवा प्रतिवाद म्हणून भाजपने एक फुटकळ आंदोलन केले. म्हणजे त्यांचे आंदोलन हे शिवरायांच्या सन्मानाविरोधात झाले. विरोधासाठी विरोध करताना त्यांनी ते शिवरायांच्या मान-सन्मानांच्या विरोधात असल्याचे दाखवून दिले. तुकोबांच्या अभंगातील ब्रह्मचाऱ्याने गाढवही गमावले होते. भाजपने स्वतःचे गाढवपण सिद्ध करून आपले उरले-सुरले ब्रह्मचर्य गमावले आहे. फडणवीस वगैरे लोकांचे म्हणणे असे की, 'मालवणमधील राजकोटवरील शिवरायांचा पुतळा कोसळून छिन्नविच्छिन्न झाला. त्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी माफी मागितली आहे. मग विरोधक आंदोलन का करीत आहेत? विरोधक राजकारण करीत आहेत.' फडणवीसांनी राज्याच्या संस्कृतीचे गजकर्ण केल्यामुळे शिवरायांच्या सन्मानासाठी कुणी स्वच्छ राजकारण करीत असेल तर भाजपच्या सर्वांगास खाज का सुटावी? तुम्ही तुमचे खाजवत बसा. महाराष्ट्राला ज्ञान देण्याची गरज नाही. तुमचे शिवप्रेम किती ढोंगी हे वारंवार उघड झाले आहे. शिवरायांनी स्वराज्य म्हणजे महाराष्ट्र निर्माण केला व शिवरायांच्या प्रेरणेमुळेच आजचा महाराष्ट्र अखंड आहे. हा महाराष्ट्र विखंडित करावा व त्यातून विदर्भ वेगळा करावा हे भाजपचे राष्ट्रीय धोरण आहे. स्वतंत्र विदर्भाचा लचका तुटत नाही तोपर्यंत लग्नाच्या बोहल्यावर चढणार नाही अशी प्रतिज्ञा ज्या फडणवीसांनी केली ते शिवरायभक्त कसे मानायचे? महाराष्ट्राचे माजी भाजपाई राज्यपाल कोश्यारी यांनी जाहीर कार्यक्रमात छत्रपतींचा अवमान केला होता तेव्हा त्यांची बाजू घेऊन उभे राहिलेल्या मिंधे-फडणवीसांना शिवभक्त मानणे म्हणजे औरंगजेबास महाराष्ट्रप्रेमी मानण्यासारखेच आहे. आता तर शिवरायांचा भव्य पुतळाच कोसळून पडला व त्याविरोधात संताप व्यक्त करणाऱ्या शिवप्रेमींना रोखले जात आहे. मालवणात भाजपचे गुंड शिवप्रेमींच्या अंगावर चालून गेले. या गुंडांनी पोलिसांना शिव्या घातल्या.

### योद्धे अनवाणी उतरले आंदोलनात

**महाविकास आघाडीचे प्रमुख नेते हुतात्मा चौक ते गेट वे पर्यंतच्या मोर्चात पायी चालत सहभागी झाले होते. हुतात्मा स्मारक येथे अभिवादन केल्यानंतर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि काँग्रेस खासदार छत्रपती शाहू महाराज हे योद्धे हातात हात घालून मोर्चामध्ये चालत होते. प्रकृतीच्या कारणास्तव पायाला पट्ट्या बांधलेल्या असतानाही शरद पवार मोर्चामध्ये अनवाणी चालले. या दोन ज्येष्ठ नेत्यांचा उत्साह पाहून तरुण कार्यकर्त्यांनाही हुरूप आला होता.**



गेल्या दहा वर्षांपासून देशाला......माफ करा, परदेशातील भारतीयांना देखील....... इतिहासाच्या विपर्यासाची आणि त्याआधारे असत्य कथनाची एव्हाना सवय झालेली आहे. विशेषतः परदेशात गेल्यानंतर स्वघोषित दैवी अंश व अवतारी पुरुषांची ही सवय प्रकर्षाने लक्षात येऊ लागते. यापूर्वीचे अनेक किस्से सर्वसामान्य जनतेला देखील माहिती झाले आहेत. हे अवतारी पुरुष ज्या रेल्वे स्थानकावर चहा विकण्याचा दावा करीत होते ते त्या काळात अस्तित्वातच नव्हते अशी माहिती समोर आली. यांच्या शैक्षणिक पदवीबद्दल तर अजुनही धूसरता कायम आहे. जो विषय भारतातल्या कोणत्याच विद्यापीठात शिकविला जात नाही अशा विषयात त्यांनी पदवी प्राप्त केल्याचे सांगितले गेले. त्याबाबतचे कोणतेही ठोस पुरावे अद्याप कुणाच्या हाती आलेले नाहीत किंवा हाती लागू दिलेले नसावेत. जणू काही देशाचा गोपनीय ऐवज असावा अशा प्रकारे ती माहिती प्रकाशात येऊ दिली गेलेली नाही. लहानपणी यांनी जणू काही ते कृष्णाचा अवतार असल्याप्रमाणे म्हणजेच कृष्णाने बालपणी ज्याप्रमाणे कालियामर्दन केले तद्वतच या अवतारी पुरुषांनी त्यांच्या बालवयात मगरीशी झुंज दिल्याची कहाणी त्यांनी साक्षात अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बराक ओबामा यांना सांगितली होती. ओबामा यांनी त्यांना भारतात राष्ट्रपति भवनात दिलेल्या शाही भोजनाच्या वेळी हा किस्सा सांगितला होता. त्यामध्ये उपहास व उपरोध अधिक होता की काय याची तपासणी संशोधकांनी करावी. याच साहेबांनी पंतप्रधानपदाची झूल नव्यानव्याने पांघरलेली असताना जे कधीही न मिळाल्यासारख्या गोष्टीप्रमाणे परदेशवाऱ्या केल्या त्या प्रत्येक परदेश दौऱ्यात भारताची निंदानालस्ती करण्याची मोहिमच उघडली होती. ते पंतप्रधान होण्यापूर्वी परदेशातील भारतीयांना ते भारतीय आहेत असे सांगण्याची लाज वाटायची असे अत्यंत घृणास्पद वक्तव्य त्यांनी परकीय भूमीवर करुन भारतीयांचा आणि भारताचाही अपमान केला होता. तोच प्रकार ते दहा अकरा वर्षांनंतर आजही करताना आढळतात. भारतातल्या भारतात त्यांनी काहीही बोलावे तो देशांतर्गत मामला असतो. परंतु परदेशात, परक्यांच्या भूमीवर जाऊन अशा प्रकारे आपल्याच देशाची नालस्ती करणे हे हलकेपणाचे आणि सुमारबुध्दीचे लक्षण आहे. यापूर्वी कोणत्याही पंतप्रधानाने असला घृणास्पद प्रकार केलेला नव्हता. आपल्या आधीच्या राजवटींची










# विपर्यास व असत्याचा कथाकार

अनंत बागाईतकर





निंदानालस्ती करणे, त्यांच्याबद्दल हेटाळणीचे, टिंगलटवाळीचे उद्गार काढणे यात या साहेबांना पुरुषार्थ वाटतो. परंतु यामुळे त्यांची प्रतिमा खराब होतेच परंतु एका देशाचा पंतप्रधान आपल्या पूर्वीच्या राजवटींबद्दल दुसऱ्या देशांमध्ये जाऊन वाटेल ते बोलतो ही बाब आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराला धरुन नाही. याला असभ्यपणा आणि असंस्कृतपणा म्हणतात. अर्थात हे अवतारी पुरुष ज्या राजकीय



संस्कृतीचे किंवा राजकीय विकृतीचे प्रतिनिधित्व करतात त्याचेच हे लक्षण आहे. ही राजकीय विकृती आपण स्वतः कोण आहोत किंवा आपण कोणत्या मूल्यांशी बांधील आहोत हे सांगत नाही. इतर लोकांमधील न्यून किंवा त्रुटि सूक्ष्मदर्शक भिंगाने शोधून शोधून त्या आधारे त्या लोकांची टिंगलटवाळी, हेटाळणी, कुचेष्टा करणे आणि त्या जोरावर सवंग टाळ्या मिळविणे हा या विकृतीचा मूळ आधार आहे. गेल्या दहा वर्षात याचे किळसवाणे दर्शन असंख्य वेळा देशवासीयांना घडले आहे.

अलीकडेच अवतारी पुरुष पोलंड आणि युक्रेनच्या दौऱ्यावर गेले होते. मोरारजी देसाई हे पंतप्रधान असताना पोलंडच्या दौऱ्यावर गेले होते. त्यानंतर म्हणजेच जवळपास पंचेचाळीस वर्षांनंतर पोलंडच्या दौऱ्यावर जाणारे ते पहिले पंतप्रधान ठरले आहेत. मुळात पोलंड हा काही भारताचा मोठा असा व्यापारी किंवा आर्थिक असा भागीदार देश नाही. उभय देशातील व्यापार अगदीच नगण्य म्हणजे साधारणपणे वार्षिक अडीच ते पावणेतीन अब्ज डॉलर्स इतकाच आहे. पोलंड हा काही भारताचा शत्रु देश नाही. भारताबरोबर चांगले संबंध राखून असलेला देश आहे. परंतु पोलंडमधील साम्यवादी राजवट उलथल्यानंतर हा देश अनेक वर्षे राजकीय अस्थिरतेने ग्रासलेला होता. त्यामध्ये या देशाच्या अर्थव्यवस्थेचीही मोठी हानि झालेली होती. नव्वदच्या दशकात या देशात लोकशाही व्यवस्थेस प्रारंभ झाला आणि त्यानंतर तेथे लोकशाही राजवट स्थिरावण्यास सुरुवात झाली. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या या देशात स्थिरता येण्यासही वेळ लागला. वर्तमान आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय राजकारण आणि संबंध हे प्रामुख्याने आर्थिक आणि व्यापारी असल्याने त्या निकषांवर भारत व पोलंडमधील संबंध हे काहीसे थंड्या बस्त्यात राहिले. अर्थात तेथे लोकशाही राजवट स्थिरावल्यानंतर उभय देशांनी आर्थिक व व्यापारी सहकार्याच्या दृष्टीने काही प्राथमिक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. वर्तमान भारतीय पंतप्रधानांनी अचानक पोलंड देशाला भेट का दिली याचे कारण त्यांच्या युक्रेनभेटीत दडलेले आहे. त्यांना थेट युक्रेनला जाणे बहुधा शक्य झाले नसावे किंवा त्याचा अर्थ वेगळा लावला गेला असता म्हणून त्यांनी पोलंडला भेट देण्याचे ठरविले असावे.

पोलंडला गेल्यानंतर तेथील भारतीयांसमोर बोलताना त्यांनी नेहमीप्रमाणे ते किती महान आहेत आणि पूर्वीचे भारतीय राज्यकर्ते किती फालतू होते हे दाखविण्याचा प्रयत्न केलाच. भारताच्या पंतप्रधानांनी चार दशकात पोलंडला भेट दिली नसल्याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. हे करताना त्यांना पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी जागतिक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांची आखणी करताना ''समान दूरता'' (इक्वि डिस्टन्स) राखण्याचे धोरण ठेवले होते. परंतु आपण (म्हणजे ते स्वतः) मात्र ''समान सामीप्य किंवा जवळीकीचे'' धोरण राबवतो अशी फुशारकी मारली. मुळात याठिकाणीही त्यांनी त्यांच्या अगाध भाषाज्ञानाचे प्रदर्शन घडविले. ''इक्वि डिस्टन्स'' या आंतरराष्ट्रीय राजकारणात व परराष्ट्र संबंधांच्या क्षेत्रात मान्यता पावलेल्या सूत्राचा वास्तव अर्थ हा ''समान दूरता'' नसून ''समान अंतर'' असा घेतला जातो. म्हणजे त्यामध्ये कोणत्याही देशापासून फटकून राहणेही नाही किंवा अतिजवळीकही नाही असा अर्थ घेतला जातो. परंतु एकतर भाषा अज्ञान किंवा मुद्दाम होऊन इतिहासातील संज्ञांचा विपर्यस्त अर्थ लावून लोकांची दिशाभूल करण्याचा हा प्रकार असावा. या संज्ञेचा अर्थ लक्षात घेण्यासाठी काही ऐतिहासिक संदर्भही लक्षात घ्यावे लागतील. परंतु त्यासाठी किमान बौध्दिक पातळीची आवश्यकता असते. उथळपणाने प्रत्येक विषयाकडे पाहून त्याचा अर्थ लावणे हे सुमारबुध्दीचे लक्षण ठरते. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी जगातिक राजकारण हे मुख्यतः अमेरिका आणि सोव्हिएत युनियन (रशिया) या दोन महाशक्तींमध्ये विभागलेले होते. या दोन ध्रुवांभोवतीच जागतिक राजकारण फिरत होते. या दोन्ही महाशक्तींचे आपापल्या मित्र राष्ट्रांचे गट किंवा समूह होते. त्यामुळे जागतिक राजकारणातही या महाशक्तींचे आपापले गटही तयार झालेले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी जगात आणि विशेषतः आफ्रिका खंडातील अनेक देशही स्वतंत्र झालेले होते. हे सर्व देश आर्थिकदृष्ट्या मागासलेले आणि पिछाडीवर असलेले होते.




मार्शल टिटो व पंडित नेहरू

त्यांना या दोन महाशक्तिंपैकी एखाद्याच्या गटात सामील होणारे परवडणारे नव्हते. त्यातूनच अलिप्ततावादाच्या संकल्पनेचा जन्म झाला. पंडित नेहरू, नासर(इजिप्त) आणि मार्शल टिटो (युगोस्लाव्हिया) यांनी पुढाकार घेऊन या मागासलेल्या राष्ट्रांना एकत्र आणले आणि वरीलपैकी कोणत्याही महाशक्तीच्या गटात सामील न होता त्यांच्याशी समान अंतर राखून चांगले संबंध राखणे आणि आपल्या देशाचा आर्थिक विकास व प्रगती साधणे या हेतुने ''इक्वि डिस्टन्स'' म्हणजेच ''समान अंतर राखणे'' या सूत्राचा उदय झाला. यामागे या देशांपासून फटकून राहणे किंवा दूर राहणे असा नव्हता. तर उलट आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखतानाच सर्वांशी मैत्रीसंबंध ठेवण्याची कल्पना किंवा हेतु यामागे होता. अर्थात ही उदात्त संकल्पना समजण्यासाठी तेवढी बौध्दिक क्षमता किंवा खोली आवश्यक असते. उथळ आणि सुमारबुध्दीच्या लोकांना या संकल्पनांचा खरा अर्थ कळणार नाही कारण त्यांची ती पात्रताही नाही. याचप्रकारे नेहरूंनी शांततामय सहजीवनाची संकल्पना चीनबरोबरच्या पंचशील करारात मांडली होती. पुढे मनमोहनसिंग यांनीही दक्षिण चिनी समुद्रातील तणावाच्या संदर्भात भारताची भूमिका स्पष्ट करताना, जग हे विशाल आहे आणि प्रत्येक देशाला आपापल्या आर्थिक, व्यापारी क्षेत्रातील वृध्दीला भरपूर वाव व संधी असून त्यासाठी मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. यासाठी सागरी नाकेबंदी किंवा सागरी मार्गांमध्ये अडथळे उत्पन्न करणे किंवा तणावाची स्थिती निर्माण करणे हा उपाय नव्हे, असे म्हटले होते. याला मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी म्हणतात. ज्याचा पूर्णत्वाने अभाव वर्तमान नेतृत्वात दिसून येतो. केवळ पाळीव माध्यमे आणि पाळीव नोकरशहांच्या मुखातून आपण केवढे मोठे जागतिक दर्ज्याचे नेते आहोत असे उच्चरवाने सांगून कुणी जागतिक नेते होत नसतात. जगाने तसे म्हणावे लागते. स्वनामधन्यतेचे ढोल पिटून ही जगन्मान्यता मिळत नाही.

रशिया आणि युक्रेन दरम्यान मध्यस्थी करण्यासाठी भारतीय पंतप्रधानांनी पुढाकार घेतला आणि फार मोठ्या

मुत्सद्देगिरीचा परिचय दिला असे प्रसिध्दीचे ढोल पिटण्यात आले. प्रत्यक्षात पंतप्रधानांच्या या महान शिष्टाईला किती यश मिळाले याचा हा हिशोब मांडण्याची वेळ आली आहे आणि काही कटु वास्तवही लक्षात घ्यावे लागेल. पोलंडमधून विशेष रेल्वेगाडीने पंतप्रधान युक्रेनला गेले. युक्रनेला पोहोचल्यावर त्यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलिन्स्कि यांना अलिंगन दिले आणि जणू काही ते अनेक वर्षांचे मित्र आहेत अशा थाटात झेलिन्स्कि यांच्या खांद्यावर हात टाकून मित्रासारखे ठिकठिकाणी हिंडल्याचे फोटोही प्रसिध्द झाले. प्रत्यक्षात या महान ऐतिहासिक भेटीनंतर काय घडले आणि खुद्द झेलिन्स्कि यांनी त्याबद्दल कोणते तारे तोडले हेही भारतीय लोकांना कळण्याची आवश्यकता आहे. या दोन्ही नेत्यांच्या भेटीच्या अखेरीला प्रथेनुसार संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्या पत्रकार परिषदेत ठराविक प्रश्न विचारले जातात त्यामुळे त्यात विशेष काही नव्हते. परंतु ती पत्रकार परिषद आटोपून पंतप्रधान पुन्हा पोलंडकडे निघाल्यानंतर झेलिन्स्कि यांनी उपस्थित पत्रकारांबरोबरचा संवाद पुढे चालू ठेवला आणि भारतावर व भारतीय पंतप्रधानांवर टीकास्त्र सोडले. ज्या मोदींनी भारताच्या तटस्थ किंवा अलिप्त किंवा सर्वांबरोबर समान व समतोल संबंध राखण्याच्या सूत्राची पोलंडमध्ये टिंगल केली होती त्याचा उल्लेख झेलिन्स्कि आणि पंतप्रधानांच्या भेटीबाबतच्या संयुक्त निवेदनात करण्यात आला होता. झेलिन्स्कि यांनी नेमका याच मुद्यावर टीकेचा हल्ला केला. आंतरराष्ट्रीय राजकारण समतोल भूमिका अशी संकल्पना असू शकत नाही आणि भारताची समतोल धोरण व भूमिकेची (बॅलन्स्ड व्ह्यू) संकल्पना आपल्या अमान्य आहे आणि ती व्यवहार्य नाही असे वाक्ताडन त्यांनी केले. एखादे लहान मूल हट्टीपणा करते त्याप्रमाणे त्यांनी भारत आणि रशियामधील मैत्रीला हरकत घेतली. जर भारताला शांततेसाठी प्रयत्न करायचे अशतील तर भारताला रशियाकडून क्रूड तेलाची आयात बंद करावी लागेल तरच भारत शांतता प्रयत्नासाठी पात्र ठरु शकेल. पंतप्रधानांनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना दिलेल्या अलिंगनावरही त्यांनी हरकत नोंदवली. यावर कडी म्हणजे त्यांनी म्हणजे झेलिन्स्कि यांनी शांततेसाठी जो दहा सूत्री दस्तावेज तयार केला आहे त्याआधारेच भारताने शांतता प्रयत्न करावेत असेही त्यांनी सांगितले. म्हणजे झेलिन्स्कि यांनी ते एका राष्ट्राचे प्रमुख होण्याच्या पात्रतेचे नाहीत हे यानिमित्ताने सिध्द करुन दाखविले. झेलिन्स्कि यांच्या वक्तव्यांबद्दल भारताने नाराजी व्यक्त केली असली तरी यामुळे जे नुकसान व्हायचे ते झाले आहे. मुळात झेलिन्स्कि हे इतके अव्यवहारी राष्ट्रप्रमुख म्हणून ओळखले जातात की त्यांनी यापूर्वी ब्रिटिश पंतप्रधान, जर्मनीचे राष्ट्रप्रमुख आणि एवढेच नव्हे तर अमेरिकेवरही टीका केलेली आढळते. त्यामुळेच डोनाल्ड ट्रंप यांनी




कंवल सिब्बल

झेलिन्स्कि ज्याज्यावेळी अमेरिकेचा दौरा करता त्यावेळी त्यांना काही अब्ज डॉलर्स हवे असतात. थोडक्यात अशा एका अव्यवहारी राष्ट्रप्रमुखाबरोबर भारताचे पंतप्रधान जाऊन बोलणी करतात आणि स्वतःची आणि देशाची नामुष्की करुन घेतात ही अत्यंत खेदाची आणि शरमेची बाब आहे. झेलिन्स्कि यांची ही प्रतिमा नवी नाही आणि त्यांचा हा अपरिपक्व स्वभाव जगाला माहिती झालेला आहे. त्यामुळेच सुरुवातीला अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांनी त्यांना रशियाविरुध्दचे बाहुले म्हणून वापरले असले तरी आता अमेरिकेसह सर्वांनाच शहाणपण आले आहे आणि आता हळूहळू सर्वांनीच झेलिन्स्कि यांना फार न खेटण्याची आणि अंतर राखूनच संबंध ठेवण्याची भूमिका घेतली आहे. असे असताना भारताला हा विनाकारण आगाऊपणा करुन आपण फार मोठे शांतिदूत असल्याचा आव आणण्याची अजिबात गरज नव्हती. माजी परराष्ट्रसचिव कंवल सिब्बल यांनी या

दौऱ्याबाबत प्रतिकूल मत व्यक्त करतानाच झेलिन्स्कि यांनी जो अशिष्ट व्यवहार भारताबरोबर केला त्याची पूर्वकल्पना किमान परराष्ट्रमंत्री जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल यांना असायला हवी होती आणि त्यांनी पंतप्रधानांना सावधगिरीचा सल्ला देणे अपेक्षित होते असे म्हटले आहे. परंतु उथळ पाण्याला खळखळाट असतो. त्यामुळे आपण काहीतरी प्रयत्न केल्याचे दाखविले तर जगभरात आपली वाहवा होईल या आशेने हा प्रकार केला गेला असावा असेच आता बोलले जाऊ लागले आहे. त्यामुळे हा दौरा म्हणजे केवळ असंगाशी संग करण्याच्या सदरातच समाविष्ट करावा लागेल. झेलिन्स्कि हे मुळात कोण आहेत हेही याठिकाणी लक्षात घ्यावे लागेल. झेलिन्स्कि हे एक चित्रपट अभिनेते आहेत. कॉमेडियन म्हणून ते युक्रेनमध्ये प्रसिध्द होते. एका नाटकात किंवा चित्रपटात त्यांनी राष्ट्राध्यक्षाची भूमिका केली होती. ती तेथील प्रेक्षकांना आवडली आणि त्यांच्या लोकप्रियतेने कळस गाठला. त्या लाटेवर आरूढ होऊनच त्यांनी युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षपदावर कब्जा करण्यापर्यंत मजल गाठली. त्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमि नाही. उलट युक्रेनमधील जनतेच्या भावना भडकवून आपली सत्ता ठिकविण्यासाठी ते प्रयत्न करीत असल्याची टीका त्यांच्यावर केली जाते. त्यांच्या या युध्दाच्या संदर्भातील ताठर व दुराग्रही भूमिकेला आता त्यांच्या लष्कराकडून देखील विरोध होऊ लागल्याच्या ताज्या बातम्या येत आहेत. त्यामुळे त्यांनी युक्रेनला सदैव युध्दाच्या छायेत ठेवण्याचा ध्यास घेतला असेल तर त्यांचे आसन धोक्यात येऊ शकते. त्यामुळे अशा अस्थिर देशाला हाताळताना अधिक परिपक्वतेची गरज आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे आणि ती दूरदृष्टी दाखवली गेली नसल्याची टीकाही ते करीत आहेत.

स्वतःला शांतिदूत समजणाऱ्या पंतप्रधानांना खरोखर जगात शांतता हवी असेल तर त्यांनी त्यांचे खास मित्र इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यनाहू, ज्यांना ते बिबि म्हणून हाक मारतात त्यांना उपदेश करुन गाझा पट्टीतील निरपराध पॅलेस्टिनी नागरिकांचे इस्रायलकडून सुरु असलेले हत्याकांड किंवा सामूहिक नरसंहार थांबविण्यासाठी प्रयत्न करायला हवे आहेत. पण तेथे जाण्याची हिंमत नाही किंवा इच्छाही नाही. कारण नरसंहार हा मुस्लिमांचा होत असल्याने त्याबद्दल फार उत्साह दाखविण्याची गरज त्यांना भासत नसावी. त्यामुळे नको त्या ठिकाणी जाऊन आपण फार मोठे शांतिदूत असल्याचा आव आणण्याचा प्रकार सुरु आहे.


भारताच्या पंतप्रधानांनी देशात तर असंख्य विपर्यस्त आणि असत्य विधाने करुन राजकीय लाभ मिळविण्याचे प्रकार केलेले आहेत. माजी पंतप्रधान मनमोहनसिंग हे गुजरातमध्ये भाजपचा पराभव व्हावा यासाठी पाकिस्तानबरोबर हातमिळवणी करीत असल्याचा अत्यंत हीन दर्ज्याचा आरोप त्यांनी केला होता. त्याबद्दल त्यांनी स्वतः माफी मागण्याचे औदार्य आणि धाडस दाखविले नाही. परंतु जेव्हा त्यांच्या भंपक व धादांत असत्य कथनाबद्दल त्यांच्यावर टीकेचा मारा झाला तेव्हा या भ्याड नेत्याने त्यांचे मंत्री अरुण जेटली यांच्या करवी संसदेत एका निवेदनाद्वारे खुलासा केला आणि मनमोहनसिंग यांच्या सचोटीबद्दल व देशभक्तिबद्दल सरकारच्या मनात कोणतीही शंका नसल्याचे सांगितले. स्वतः आचरट



आणि वाह्यात व बिनबुडाचे आरोप करायचे आणि त्याचा खुलासा मात्र इतरांकरवी करायचा याला शुध्द भ्याडपणा म्हणतात. डरपोक व्यक्ती असले प्रकार करतात. हे केवळ एक उदाहरण झाले.

या पंतप्रधानांची एक महत्वाकांक्षा आहे. त्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक मिळविण्याची अंतःस्थ इच्छा आहे. युक्रेनला जाण्याचा प्रकार हा त्याच प्रयत्नांचा भाग आहे. जागतिक पातळीवर आपण शांतिदूत असल्याचा आव आणून लंब्याचौड्या गोष्टी करण्याची धडपड हा त्याचा भाग आहे. परंतु त्यांना हे पारितोषिक मिळविण्याची विलक्षण इच्छा आहे. ती त्यांनी दाबून ठेवलेली नाही. याचा जिताजागता पुरावा उपलब्ध आहे. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी मनमोहनसिंग सरकारने पूर्ण तयारी करुन ठेवलेल्या लँड बाऊंडरी ॲग्रीमेंटची अंमलबजावणी केली. हा करार बांगला देशाबरोबर करायचा होता. या करारानुसार भारत व बांगला देशातील सीमा भागात

असे काही लहान भूप्रदेश होते की काही बांगला देशात समाविष्ट होते तर काही भारतात होते. संपर्काच्या दृष्टीने याठिकाणच्या नागरिकांना असंख्य व अतोनात अडचणी व हाल अपेष्टांना तोंड द्यावे लागत असे. त्यामुळे दोन्ही देशांनी असे ठरविले की या नागरिकांना त्यांच्या सोयीनुसार त्यात्या देशात सामील करुन घ्यायचे. हा करार उभयमान्य पध्दतीने करण्यात आला. मानवतेच्या तत्वाला यात प्राधान्य देण्यात आले. या कराराची सर्व पूर्वतयारी मनमोहनसिंग सरकारने केलेली होती. परंतु मध्येच लोकसभा निवडणुका झाल्या आणि काँग्रेस पराभूत झाल्याने भाजपचे सरकार केंद्रात सत्तारूढ झाले. वर्तमान पंतप्रधानांना त्या कराराची अंमलबजावणी करावी लागली. त्यामुळे करारावर सही करण्याचे श्रेय वर्तमान पंतप्रधानांना मिळाले. त्यावेळी बांगला देशात शेख हसीना



पंतप्रधान होत्या. दोन्ही देशांच्या सोयीने हा करार झाला होता आणि त्यामुळे या अडचणीतील जनसमूहांना मोठा दिलासा मिळाला होता. यावेळी बोलताना अवतारी पुरुषांनी त्यांच्या आत खदखदणाऱ्या भावना बोलून दाखविल्या होत्या. ते म्हणाले होते की जगात इतरत्र अशा प्रकारचा करार दोन देशात झाला असता तर त्याचा नुसता उदोउदो झाला असता आणि कदाचित करार करणाऱ्या नेत्यांना नोबेल पारितोषिकही मिळाले असते. आता ही खरी ग्यानबाची मेख आहे आणि ती लक्षात घेतल्यानंतर शांतिदूताचा अवतार घेणाऱ्यांचे खरे स्वरुप आणि हेतु लक्षात येण्यास मदत होऊ शकेल.

या अवतारी पुरुषांनी अशा असंख्य विपर्यस्त कथा सांगून लोकांना भडकवून मते पदरात जमा करण्याचा प्रकार आतापर्यंत केलेला आहे. लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत तर त्यांनी खोटी विधाने करण्याची पराकोटि केली होती. काँग्रेसला बहुमत दिल्यास ते तुमचे बँकेतील पैसे जप्त करुन ते पैसे मुस्लिमांना वाटतील, अयाबहिणींची मंगळसुत्रे काढून घेतील अशी धादांत खोटी विधाने करुन लोकांना भडकविण्याचे प्रकार त्यांनी केले. त्यांच्या दुर्दैवाने आता भारतीय मतदार आता एवढा शहाणा झाला आहे की त्यालाही खोटारडेपणा कळू लागला आहे आणि त्यामुळेच हा खोटारडेपणा किंवा असत्य कथनाच्या कथेकऱ्याला मतदारांनी या निवडणुकीत पाणी पाजले. परंतु अंगात कोडगेपणा इतका मुरलेला आहे की पोलंडमध्ये जाऊन पुन्हा खोटेपणा करण्याचा प्रकार त्यांनी केलाच. वर उल्लेख केल्याप्रमाणे २०१४ पूर्वी परदेशातील भारतीयांना आपण भारतात जन्मलो हे सांगायला लाज वाटायची असे विधान त्यांनी करुन त्यांच्या हलक्या मनोवृत्तीचा परिचय दिला होता तीच मालिका ते आजही पुढे चालवीत आहेत.

संसदेच्या नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पी अधिवेशनात देखील असत्य कथनाबद्दल काँग्रेसचे एक सदस्य मणिक्कम टागोर यांनी त्यांच्या विरोधात हक्कभंगाची नोटिस देऊन त्यांच्याविरुध्द उचित अशा कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी लोकसभा अध्यक्षांना यासंदर्भात एक पत्र लिहिले आहे आणि त्याबाबत त्यांची भेटही घेतली आहे. मोदींनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना असत्य कथन केले असे टागोर यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात त्यांनी मोदींच्या भाषणातील विविध मुद्यांचा तपशील दिला आहे. अगदी लष्करातील जवानांना आधीच्या काँग्रेसच्या राजवटीत बुलेटप्रूफ जॅकेट्सही पुरविली नव्हती असा आरोप त्यांनी केला होता. त्याबद्दलची वस्तुस्थिती सादर करुन मोदींचा आरोप कसा असत्य आहे याचा उल्लेखही टागोर यांनी या पत्रात केला आहे. असे अनेक उल्लेख आहेत.

या विषयासंदर्भात असंख्य उदाहरणे अगदी पुराव्यासहित आणि तपशीलासह देता येतील. परंतु प्रश्न हा आहे की पंतप्रधानपदासारख्या सर्वोच्च पदावर आसीन अशा व्यक्तीला असत्य कथन आणि ऐतिहासिक माहितीचा विपर्यास करण्याची बाब शोभा देती का ? पंतप्रधानांनी त्यांच्या पदाची प्रतिष्ठा राखणे लोकांना अपेक्षित आहे. परंतु विपर्यास आणि असत्याच्या कथेकऱ्याला याचे भान राहिल्याचे दिसत नाही हे देशाचे दुर्दैव !

■■




व्यंकटेश केसरी

# चार राज्यातील विधानसभा निकालानी नवी समीकरणे, नवे राजकारण

या चार राज्यांच्या निवडणुकात भाजप महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंड मध्ये हारली तर मोदींचे केंद्रातील आसन डळमळीत होणार. आणि त्यानंतर दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. नरेन्द्र मोदी यांची चमक उडू लागली तर भाजपमध्ये नवीन समीकरणे बनू लागतील आणि यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका महत्वपूर्ण राहणार आहे.



आगामी विधानसभेच्या निवडणूका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी महत्वाच्या ठरणाऱ्या आहेत भले भाजप त्यांच्या चेहऱ्यावर मत मागो अथवा न मागो. कारण या निवडणुकांच्या निकालानंतर भाजपच्या अंतर्गत नवी समीकरणे बनायला सुरुवात होईल आणि मोदी यांची मांड किती पक्की आहे , ते त्यांचा पंतप्रधानपदाचा तिसरा कार्यकाळ कसा खेचतील, किती काळ खेचतील याचा अंदाज देशाला येईल. २०२४ ची लोकसभा निवडणूक भाजप त्यांच्या नावावर,त्यांच्या नेतृत्वावर,त्यांच्या कामावर लढली आणि अल्पमतात गेली कारण त्यांचे नाव, नेतृत्व आणि नारा (अबकी बार ,चारसो पार ) लोकांनी नाकारला आणि प्रादेशिक पक्षांच्या मेहेरबानीने नरेंद मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. आता हे पद त्यांच्या हाती किती काळ राहील याची झलक महाराष्ट्र, हरियाणा,झारखंड आणि जम्मू – काश्मीर विधान सभा निवडणूक निकालात दिसून येईल. पण प्रत्यक्ष मतदानापूर्वी या चारही राज्यात भाजप दमदारपणे उभा आहे असे चित्र नाही. हरियाणात दहा वर्षाच्या अँटी इन्कमबंसीचे ओझे या पक्षावर आहे. झारखंड मध्ये फोडाफोडीचा आवडता खेळ भाजपने केंद्रातील सत्तेच्या आधारे सुरु केला आहे. झारखंड मुक्ती मोर्चाचे बंडखोर आणि माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन या पक्षाच्या गळाला लागले आहेत. काश्मीर खोऱ्यात भाजप निराधार आहे . तिथे हा पक्ष इतर पक्षातील बंडखोर आणि बाकीच्यांचा आधार घेईल.



महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका हरियाणा ,जम्मू-काश्मीर सोबत घेण्याची हिम्मत या पक्षात नाही त्यामुळे निवडणूक आयोगाच्या नथीतून तीर मारण्यात आला. महाराष्ट्राच्या निवडणुकांची तारीख निवडणूक आयोगाने जाहीर केली नाही ही राष्ट्रीय बातमी झाली. यातून एकच अर्थ निघतो तो म्हणजे स्वतःला जगातला सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करणारा,नरेंद्र मोदी यांना विश्वगुरु म्हणणारा भाजप आणि " वन नेशन,वन इलेक्शन " अशी घोषणा करणारे पंतप्रधान जर प्रत्यक्षात चार राज्यातील विधान सभा निवडणुका एकाच वेळी घेऊ शकत नसतील तर ते सार्वत्रिक निवडणुकीबरोबर देशातील सर्व राज्यांतील विधानसभेच्या निवडणूक एकत्रितपणे कशा घेतील ? " वन नेशन,वन इलेक्शन " ची भाषा आणि आवेश हा फक्त बोलक्या शंखाच्या गोष्टी सारखा आहे.

लोकसभा निवडणुकीत बसलेल्या दणक्यातून ना नरेंद्र मोदी सावरले ना भाजप. याशिवाय त्यांना तेलगू देसम पार्टी, जनता दल (युनाइटेड), लोकजनशक्ती पार्टी आणि आघाडीतील इतर मित्र पक्षांचा मनाचा अंदाज घेता येत नाही. त्यामुळे वक्फ बोर्ड अधिनियमात बदल करणारे बिल, ब्रॉडकास्टींग सर्विसेस (रेग्युलेशन ) बिल संसदेच्या अधिवेशनात मांडता आले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांची थेट नेमणूक लॅटरल एंट्री पद्धतीने करण्याचे धोरण त्यांना मागे घ्यावे लागले कारण मित्र पक्ष आणि विरोधी पक्षांचा दबाव ! जुनी पेन्शन योजना लागू करा ही विरोधी पक्षांची मागणी मान्य करता येत नाही म्हणून आता एकीकृत पेन्शन योजना जाहीर करून सरकारी कर्मचाऱ्यांना खुश करण्याचा प्रयत्न मोदी सरकार करत आहे. अशी लवचिकता नरेंद्र मोदी यांच्या स्वभावात नाही कारण त्यांची ओळख त्यांच्या ताठरपणात आहे. पण सत्तेत राहायचे असेल तर तडजोडी केल्या पाहिजेत, दहा, पंधरा खासदारांची संख्या असलेल्या पक्षांची मनधरणी करावी लागणार आहे. हे मोदी यांना शिकावे लागत आहे हा काळाने त्यांच्यावर उगवलेला सूड आहे. २०१४ ते २०२४ पर्यंत त्यांची भूमिका शिकवण्याची होती, ते विश्वगुरू होते आता रोल बदलला आहे हे गृहमंत्री अमित शहा यांना सुद्धा कळून चुकले आहे. संसदेत विरोधी पक्ष आक्रमक आहे तर फोडाफोडीचे राजकारण, सरकारी यंत्रणेचा खुले आम गैरवापर,पैसा यामुळे प्रादेशिक पक्ष बिथरले आहेत. विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात राज्यपालांच्या आडून कोलदांडा घालण्याच्या वृत्तीने केंद्र आणि राज्यातील संबंध तसे खराब आहेत पण याने देशाचे फेडरल स्ट्रक्चर कमकुवत होत आहे . नरेंद्र मोदी यांना सत्तेत राहायचे असेल तर वाजपेयी लाइन स्वीकारली पाहिजे हा 'मॅन डेट' आहे.

या चार राज्यांच्या निवडणुकात भाजप महाराष्ट, हरियाणा आणि झारखंड मध्ये हारली तर मोदींचे केंद्रातील आसन डळमळीत होणार .आणि त्यानंतर दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. नरेन्द्र मोदी यांची चमक उडू लागली तर भाजपमध्ये नवीन समीकरणे बनू लागतील आणि यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका महत्वपूर्ण राहणार आहे. नरेंद्र मोदी यांना एकाच वेळी बाहेरचे विरोधक म्हणजे विरोधी पक्ष आणि आतले छुपे विरोधक यांना

सहन करावे लागणार आहे. त्यातून सरकार चालविण्याची कसरत ! ही सर्कस ते कशी चालवतील ? म्हणून त्यांच्या दृष्टीने या चार राज्यातल्या निवडणूका अत्यंत महत्वपूर्ण राहणार आहेत.



२०२४च्या लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याचे विश्लेषण होणे गरजेचे आहे पण तसे ते झाले की नाही याची चर्चाच होत नाही. संसद अधिवेशनाच्या काळात प्रत्येक आठवड्यात भाजप संसदीय पक्षही बैठक नियमितपणे होत असे तसे मागच्या अधिवेशनात झाल्याच्या बातम्या नाहीत. अर्थात ,यात पक्षाच्या खासदारांना बोलण्यापेक्षा ऐकावेच लागते त्यामुळे त्यांच्या दृष्टीने या बैठकांना काही अर्थ नाही . " ये तो मोदीजी की पाठशाला है, हमे सुनना पडता है " असे ते मार्मिकपणे बोलतात.

नरेन्द्र मोदी आणि अमित शहा यांनी आपल्या "होय बा" (एस मॅन) च्या द्वारे महाराष्ट्र आणि हरियाणा चालवला आणि भाजपचे नुकसान केले. पक्ष रुजवला नाही, वाढवला नाही . महाराष्ट्रात एकट्याने निवडणुकांना सामोरे जाण्याची धर्य भाजपत नाही कारण राज्यव्यापी चेहरा नाही, लोकांना मान्य असलेले नेतृत्व नाही. आणि ज्यांना त्यांनी 'नेते' केले ते नगर पालिकेच्या निवडणुकीत सुद्धा नरेंद मोदी यांच्या नावावर मत मागत असतील त्याने या पक्षाची दिवाळखोरीच दिसून येते.

या चार राज्यात होणाऱ्या निवडणुकांपैकी महाराष्ट्र आणि जम्मू-काश्मीरच्या निवडणुकांकडे देशाचे आणि काही प्रमाणात

# अमृत काळातील दुर्घटनांचे संकेत



**भाजपच्या "अमृत काळात" घडत असलेल्या घटना, दुर्घटना या काय संकेत देत आहेत ? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात झालेल्या प्रकल्पात ,त्यांनी केलेल्या उदघाटन कामात खोट का निर्माण होते ? विरोधी पक्षांच्या नाकावर टिच्चून बांधण्यात आलेल्या नव्या संसद भवनात पावसाने गळती लागली,राजधानी दिल्लीतील भारत मंडपम गळाले आणि ज्या आयोध्येतल्या राम मंदिराने भाजपला सत्ता मिळाली त्या मंदिराच्या गर्भगृहात यंदाच्या पावसाने धार धरली. या मंदिराचे बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी ,मोदींच्या अट्टाहासाने लोकसभा निवडणुकीच्या आधी रामाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यावर कोट्यवधी रुपये खर्चण्यात आल्याच्या बातम्या आहेत. आणि आता मालवण येथील प्रकार ! छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. पण वर्षभराच्या आत तो पुतळा कोसळला.तो पावसामुळे कोसळला की निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने ? हे यथावकाश कळेल पण मोदींच्या हस्ते ज्याचे ज्याचे उद्घाटन होते त्या कामाचे असे का होते हा प्रश्न शिल्लक राहतोच.**




# पक्षफोडीचे शिल्पकार

**आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपसाठी 'जहाल' चेहरा फायद्याचा की 'मवाळ'? याचा पुरेसा अंदाज या पक्षाला येताना दिसत नाही. विकासाचा मुद्दा सर्व पक्षीय असल्याने त्याने ना मतदारांचे ध्रुवीकरण होते ना लाट येते. मुसलमान विरोधी प्रचाराने लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले नाही कारण हिंदू मतदार दुरावला. पंतप्रधान नरेंद मोदी यांचा 'चेहरा' काश्मीर खोरे, हरियाणा, झारखंड विधान सभा निवडणूक प्रचारात किती चालेल याची खात्री भाजपच्या नेते -कार्यकर्त्यांना नाही आणि महाराष्ट्रातील विरोधी पक्षांना नरेंद्र मोदी आणि अमित शहा हवे आहेत. कारण त्यांच्या प्रत्येक भाषणाने विरोधी पक्षांची मतपेढी मजबूत होते. तरुणात, फ्लोटिंग मतदारांत भाजप, मोदी यांचे तसेही आकर्षण राहिले नाही कारण त्यांची प्रतिमा "पक्ष फोडींचे शिल्पकार"अशी झाली आहे. आणि 'मवाळ' चेहरा चालला तर तो मोदी-शहा यांच्यासाठी धोक्याची घंटा राहणार आहे कारण तिथूनच त्यांच्या नेतृत्वाला आव्हान मिळेल.**

विदेशांचे लक्ष्य आहे. घटनेतील ३७० वे कलम हटवून जम्मू-काश्मीरला मिळणारे विशेषाधिकार संपविल्याबद्दल लोकांची प्रतिक्रिया काय? त्याचा भाजपला किती राजकीय लाभ होईल ते यावेळी दिसेल. लोकसभा निवडणुकीतील निकालापेक्षा विधानसभा निवडणुकीत लोकांचा कौल काय असेल ? या कडे आंतरराष्ट्रीय जगताचे लक्ष्य आहे. मोदी यांच्या राजवटीत काश्मीर खोरे आणि काश्मिरी जनता याबद्द्ल " गोदी मीडिया " (सरकारधार्जिणी माध्यमे ) मधून मोठ्या प्रमाणात भारत विरोधी असल्याचे चित्र रंगवण्यात आले. तर या मजबूत सरकारच्या सोबत तिथली जनता का नाही ? याचे उत्तर गेल्या दहा वर्षांपासून मिळत नाही. तिथे डबल इंजिन सरकार , विकास या शब्दांना काही अर्थ नाही कारण तिथल्या लोकांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची ताकत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात नाही. तिथे भाजप उपरा आहे.

नरेंद्र मोदी आणि त्यांच्या भाजपने महाराष्ट्रासारख्या प्रागतिक, विकसित,राष्ट्रीय भूमिका असलेल्या राज्याची अक्षरशः वाट लावली अशी धारणा देशात आहे. त्यांनी महाराष्ट्राची प्रशासकीय घडी विस्कटली,राजकीय भाषा नासवली , पक्षफोडीला राजमान्यता दिली, आयाराम-गयारामला प्रतिष्ठित केले आणि महाराष्ट्राला उत्तर प्रदेश, हरियाणाच्या रांगेत आणून बसवले. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांची महाराष्ट्रातील राजकीय भाषणे ते ज्या पदांवर आहेत त्याचा स्तर घालवणारी आहेत. ती भाषणे उथळ आणि सवंग असतात. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल भाजप विरोधात गेले तर त्याचा फटका या पक्षाला बिहार, उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत बसेल, मोदी यांचे आसन डळमळीत होईल अशी भाकिते राजधानी दिल्लीत केली जात आहेत. त्यामुळे या निवडणुका तांत्रिकदृष्ट्या महाराष्ट्रापुरत्या मर्यादित असल्या तरी त्याचे परिणाम राष्ट्रीय स्तरावर होणार आहेत.

## भाजपचे 'मार्गदर्शक मंडळ' वाढणार काय ?

भाजपच्या मार्गदर्शक मंडळाचा विस्तार होणार काय? पक्षातल्या ज्या नेत्यांचे वय ७५ वर्ष किंवा त्याहून अधिक झाले आहे त्यांना सक्रिय कामातून निवृत्त केले जाईल काय? याची चर्चा पक्षांतर्गत दबक्या आवाजात सुरु आहे. ती बंद होणार नाही पण तिचा आवाज केंव्हा वाढेल याबद्दल निरनिराळे अंदाज केले जात आहेत. नरेंद्र मोदी २०१४ साली पंतप्रधान झाल्यावर मार्गदर्शक मंडळाचे औपचारिक गठन करण्यात आले. त्यात अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, डॉ मुरली मनोहर जोशी यांच्या व्यतिरीक्त स्वतःमोदी आणि राजनाथ सिंग यांचा समावेश होता. पण हे दोघे मार्गदर्शक असूनही मंत्री राहिले तर आडवाणी, डॉ जोशी हे खासदार असूनही त्यांना कोणतेही पद देण्यात आले नाही. आडवाणी हे लोकसभेचे अध्यक्ष होण्याला तयार होते, तसे त्यांनी मोदी



# इतरांना सांगे तत्त्वज्ञान, स्वतः कोरडे पाषाण





समर्थकांना सुचविलेही होते पण ते धुडकावण्यात आले. आडवाणींना राष्ट्रपती करण्याची सूचना भाजपच्या एका केंद्रीय मंत्र्याने केली होती पण त्याला चूप करण्यात आले. वाजपेयी तर २००४ नंतर निवृत्तीच्या मार्गाला लागले होते. या ज्येष्ठांच्या श्रेणीत हिमाचलचे माजी मुख्यमंत्री शांताकुमार आणि त्यानंतर लोकसभेच्या अध्यक्ष व इंदौर मधून सर्वाधीक वेळा लोकसभेवर निवडून आलेल्या सुमित्रा महाजन यांना वाढत्या वयाच्या कारणावरून घरी बसविण्यात आले. यशवंत सिन्हा, अरुण शौरी हे कोणाच्याही ताटाखालचे मांजर होऊ शकत नव्हते सबब ते हळू हळू संघटनेपासून अलग होत गेले. आता नरेंद्र मोदी १७ सप्टेंबर रोजी ७५ व्य वर्षात पदार्पण करत आहेत तेंव्हा त्यांनी स्वतः होऊन पदमुक्त व्हावे अशी सूचना भाजपचे बंडखोर नेते डॉ सुब्रमण्यम स्वामी यांनी केल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. इतरांना तत्वज्ञान सांगणारे , वयाच्या सबबीखाली घरी

## भाजपचा दुहेरी चेहरा व दुटप्पी राजकारण





**पश्चिम बंगाल मध्ये एका इस्पितळात महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि निर्घृण खुनावरून भाजपने रान उठवले आहे पण महाराष्ट्रात महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत हा रस्त्यावर उतरत नाही . २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर टेररिस्ट्सनी हल्ला केला. त्यानंतर झालेल्या राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ विधानसभांच्या निवडणुकीत भाजपने याचा मुद्दा केला,जाहिरातीतून मनमोहन सिंग सरकारला लक्ष्य केले. म्हणजे राजकारण केले पण आता "बदलापूर घटनेचे राजकारण करू नका "असा सल्ला भाजपचे नेते ,मंत्री विरोधी पक्षांना देत आहेत. या पक्षाचा दुहेरी चेहरा, दुटप्पी राजकारण अनेकवेळा देशासमोर आले आहे. रस्त्यावर महा आरती केल्याने समाजात शांतता निर्माण होते, सौहार्द्र वाढते काय ? की दंगली उसळतात ? याबद्दल हा पक्ष बोलत नाही यात आश्चर्य नाही.**

बसवणारे नरेंद्र मोदी आता कोणता आदर्श नव्या पिढीसमोर घालतील, स्वतःसाठी वेगळा निकष लावतील काय ? आणि ते पदाला चिकटून राहिले तर पक्षातली त्यांची प्रतिमा वाढेल की घटेल ? यावर अनेकजण बारकाईने लक्ष ठेऊन आहेत. नरेंद्र मोदी हे भाजपपेक्षा मोठे आहेत, त्यांच्याशिवाय पक्षात पंतप्रधान होण्यासाठी,देश चालविण्यासाठी लायक व्यक्ती कोणी नाही असे असेल तर तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अपमान आहे. संघाने भारतीय जनसंघ निर्माण केला आणि संघावरून ( दुहेरी निष्ठेवरून जनता पार्टी फुटली होती ) भाजप काढण्यात आला. नरेंद्र मोदी हे २००१ पासून सलग सत्तेत आहेत. त्यांची सत्तेची कारकिर्द्ध गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सुरु झाली आणि २०१४ साली ते पंतप्रधान झाले. या पदावर ते आज तागायत आहेत.












**इतरांना तत्वज्ञान सांगणारे , वयाच्या सबबीखाली घरी बसवणारे नरेंद्र मोदी आता कोणता आदर्श नव्या पिढीसमोर घालतील, स्वतःसाठी वेगळा निकष लावतील काय ? आणि ते पदाला चिकटून राहिले तर पक्षातली त्यांची प्रतिमा वाढेल की घटेल ?**



**नरेंद्र मोदी हे भाजपपेक्षा मोठे आहेत, त्यांच्याशिवाय पक्षात पंतप्रधान होण्यासाठी,देश चालविण्यासाठी लायक व्यक्ती कोणी नाही असे असेल तर तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अपमान आहे. संघाने भारतीय जनसंघ निर्माण केला आणि संघावरून भाजप काढण्यात आला.**

" मै तो झोला ले के आया था , झोला उठा के जाऊंगा " असे ते म्हणाल्याचे त्यांचे भक्त सांगतात. त्यांना फक्त दहा वर्षांसाठी पंतप्रधान व्हायचे होते पण २०२३ मध्ये त्यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याची इच्छा व्यक्त केली कारण त्यांना जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हायचे होतो. आणि २०२८ पर्यंत ते या पदावर राहिले तर ते नेहरूंचे रेकॉर्ड मोडण्याच्या नावाखाली २०२९ ची लोकसभा निवडणूकही लढवतील. इतर पक्षांना अकलेचे डोस पाजणाऱ्या भाजपची " चाल, चेहरा आणि चारित्र्य " आता पूर्णपणे बदलले आहे हे च खरे !.

■■

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने महाराष्ट्रभर काढण्यात आलेल्या शिवस्वराज्य यात्रेत ठिकठिकाणी झालेल्या पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या भाषणांचा संक्षिप्त सारांश....**

शिवस्वराज्य यात्रा ही महाराष्ट्रातील भ्रष्टाचारी, दलबदलू तसेच महाराष्ट्राचे राजकारण बिघडविणाऱ्यांच्या विरोधात तसेच सत्तेत राहून सामान्य माणसाच्या मनात विष कालवणाऱ्या व जातीजातीत वाद निर्माण करणाऱ्यांच्या विरोधात असून रयतेचं राज्य निर्माण करणं व महायुती सरकारला शेवटचा धक्का देण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली आहे.




शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळाच्या पहिल्या पायरीचं दर्शन घेऊन महाराष्ट्रामध्ये रयतेचं राज्य आणण्यासाठी आम्ही निर्धारपूर्वक शिवस्वराज्य यात्रेचं आयोजन केलं आहे. महाराष्ट्र सरकारने केलेला गोंधळ आणि भ्रष्टाचार जो माजवला आहे ते जनतेला सांगण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी चालवलेल्या रयतेच्या राज्याप्रमाणे आम्ही सत्तेवर आल्यावर काम करू , हे आम्ही शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून जनतेला सांगणार आहे. शिवरायांच्या नावानं काही सुरु केल्यास त्याला हमखास यश मिळते. मागील शिवस्वराज्य यात्रेनंतर राष्ट्रवादीला ५४ जागी यश मिळालं. यंदा महाविकास आघाडी १७० पेक्षा जास्त जागा जिंकणार.

महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष एकत्र असून पुढील काळात सत्ता, संपत्ती विरोधात लढायचं आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीनं लोकसभेची नगरपालिका केली. पण, पैशापुढं महाराष्ट्र झुकला नाही. त्यामुळे ४८ पैकी ३१ जागा महाविकास आघाडीच्या निवडून आल्या. महाराष्ट्रातल्या जनतेनं लोकसभेला महाविकास आघाडीच्या बाजूनं कौल दिला आहे. केंद्रातील व राज्यातील सरकार आम्हाला नको हे लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातल्या जनतेनं दाखवून दिलं आहे. त्यामुळं आता आम्हाला खात्री आहे की, विधानसभेत सुद्धा महाराष्ट्रातली जनता महाविकास आघाडीला साथ देईल व राज्यांमध्ये खऱ्या अर्थानं, शिवाजी महाराजांच्या आशीर्वादानं रयतेचं राज्य येईल.



लोकसभा निवडणुकीनंतर महायुती सरकारने लाडका भाऊ, लाडकी बहीण योजना आणल्या. लाडकी खुर्ची वाचविण्यासाठी तुम्ही चंद्र जरी मागितला तरी ते देण्याच्या तयारीत आहेत. कारण, त्यांना लोकसभेच्या निकालावरून लक्षात आलं आहे की, सत्ता जाण्याची शक्यता



आहे. त्यामुळं त्यांच्यासाठी सर्वकाही लाडकं होऊ शकतं. उशिरा सुचलेलं शहाणपण महाराष्ट्रानं ओळखलं असून त्यांना त्यांची जागा दाखविण्याचं काम आपण सर्वांनी करूयात. महाराष्ट्र या महायुतीला कंटाळला आहे व महाराष्ट्राची जनता महाविकास आघाडीला साथ देईल याची आम्हाला खात्री आहे. तसेच शरदचंद्र पवार यांच्या पाठीशी महाराष्ट्र आहे हे एकदा आम्हाला दाखवून द्यायचे आहे. खासदार अमोल कोल्हे व इतर नेते महाराष्ट्रभर फिरून शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधणार आहेत.

गृहमंत्री अमित शहा यांच्या हातात ईडी, सीबीआयची छडी आहे. तोपर्यंत आपल्या पक्षात कोणी येणार नाही. ज्यावेळी अमित शहा, नरेंद्र मोदी बाजूला होतील त्यावेळी सगळे इकडे येतील. ज्यांच्यावर केसेस आहेत जे संकटात आहेत ते येणारच नाहीत. आपल्याकडे येण्यासाठी मर्दाचं काळीज लागते.

विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या विधानसभेत ७० टक्के नवीन चेहरे आमदार म्हणून दिसतील. विधानसभेला आमच्या तीनही पक्षाचे मिळून १७५ च्या पुढे आमदार निवडून येतील. महायुतीला ८० ते ९० जागा मिळतील त्यांचा सुपडा साफ होणार आहे. लोकसभा निवडणुका झाल्यानंतर विविध योजना सुरू केल्या आहेत. लाडकी बहीण, लाडका भाऊ या योजना आता आठवल्या आहेत. लोकसभेला लाडकी बहीण आठवली नाही. मात्र आता देत आहेत ते घ्या, आमचं सरकार आल्यावर आमच्या बहिणीसाठी चांगल्या सेवा देऊ, मात्र सध्या सुरू केलेल्या योजना या लाडक्या खुर्चीसाठी सुरू केल्या आहेत. त्यांची खुर्ची जाणार आहे हे त्यांना कळलं असून महाराष्ट्रातली जनता त्यांना गाडल्याशिवाय राहणार नाही. राज्यात आमचं सरकार आल्यानंतर विविध योजना राबवून चांगल्या प्रकारे काम केलं जाईल.

महायुती सरकारला आत्मविश्वास राहिला नाही. त्यामुळं यात्रा काढत आहेत. आता सरकारच्या योजना सांगण्यासाठी ५० हजार योजना दूत नेमणार आहेत. साडेतीन महिन्याचा कालावधी दिला असून ३०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर महायुती सरकार घाबरले आहे.

लोकसभेच्या निवडणुकी अगोदर आमच्याकडं कोणी बघत नव्हते, कोणी येत नव्हते. पण, जनतेच्या मनातली गोष्टी आम्ही मांडत गेलो आणि जनतेनं आम्हाला प्रतिसाद दिला. पक्षाने लोकसभेला दहा जागा लढविल्या, त्यापैकी आठ निवडून आणल्या आहेत. त्यामुळं आता एका जागेवर लढण्यासाठी दहा-दहा जण इच्छुक आहेत. महाराष्ट्रातली जनता महाविकास आघाडीच्या पाठीशी आहे. नऊ अर्थसंकल्प



# रयतेचे राज्य आणण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा

**जयंत पाटील**

मांडताना लाडक्या बहिणीची आठवण झाली नाही. लोकसभेला जनतेनं जागा दाखविल्यानंतर लाडकी बहीण योजना आणली. आता ही योजना चालू ठेवण्यासाठी 'आमचं बटन दाबा' असा दम दिला जात आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर लाडकी बहिण योजना थांबविणार नाही. त्या रकमेत वाढ केली जाईल. महाराष्ट्रातनं १७ प्रकल्प बाहेर गेले असून याचे पाप महायुतीचं आहे. महायुतीचं सरकार आल्यानंतर महाराष्ट्र राज्य मागे पडलं आणि गुजरात पुढे गेलं. पण, भाजपचे लोक पक्ष फोडण्यात मशगुल होते.

शरद पवार यांच्या डोक्यात एकदा बसलं की मग काही



खरं नाही. त्यांच्याकडे प्रचंड जिद्द आहे, त्यामुळे वयाचा अडसर येत नाही. त्यांनी एकदा मनात घेतलं, की ते पाठ लावूनच सोडतात. त्यामुळे शहाण्या माणसाने त्यांना डिवचू नये. त्यांना आव्हान दिलं की मग ते तडीस नेतात.

आज सरकारच्या पायाखालची जमीन सरकायला लागलीय. म्हणून विविध घोषणा केल्या जात आहेत. भाजपचे आमदार म्हणतात, की मला जर मत दिले नाही, तर तुमच्या खात्यात लाडकी बहिण योजनेतून आलेले पैसे काढून घेईन. एवढी मगुरी बरी नाही. हे लोकांचे पैसे आहेत. भाजपच्या खिशातून टाकलेले पैसे नाहीत. एक आमदार आहेत, जे म्हणतात, की आम्ही लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांची नावे विधानसभेनंतर फिल्टर करू. म्हणजे हे लाभार्थी कमीही करतील. त्यामुळे हा फक्त निवडणुकीसाठीचा कार्यक्रम आहे, हे स्पष्ट होते. आपला पराभव होणार हे माहिती आहे म्हणून यांनी योजना काढल्या आहेत आणि जाहिरातीसाठी २८० कोटी खर्च केला आहे.

या सरकारच्या काळात प्रचंड भ्रष्टाचार झाला. आम्ही हे भ्रष्टाचार बाहेर काढले. पण सत्ताधाऱ्यांनी एकही शब्द काढला नाही. आता या भ्रष्ट सरकारला आपल्याला खाली खेचायचंय. उद्याच्या विधानसभा निवडणुकीतही तुम्ही लोकसभा निकालाची पुनरावृत्ती कराल याचा मला विश्वास आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपचा पराभव होईल, असं देशात कोणाला वाटत नव्हतं. मात्र महाराष्ट्र आणि सोलापूर जिल्ह्याने कामगिरी केली. २०१९ साली विधानसभा निवडणुकीत लोक म्हणायचे, की आपले २०-२५ आमदार निवडून येतील. पण, ५४ आमदार निवडून आणले. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत यापेक्षा जास्त उमेदवार निवडून येतील, याची मला खात्री आहे. त्यासाठी आपण सगळ्यांनी मिळून काम करायचं आहे.

महाराष्ट्रातील दोन मराठी नेत्यांनी निर्माण केलेले दोन्ही पक्ष भाजपने फोडले. पवार साहेबांना सोडून गेलेल्या नेत्यांसोबत जनता गेली का? तर नाही. महाराष्ट्रात मोठ मोठे इव्हेंट पाहायला मिळतात. प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकसभा निवडणुकीच्या पराभवानंतर सत्तेतील नेत्यांनाही पराभवाची चाहूल लागली आहे. आता आपण काम करायचं आणि आपलं सरकार आणायचं आहे. साताऱ्यातील महेश शिंदे नामक आमदार म्हणतात, की आत्ता तुम्ही निधी घ्या. निवडणुकीनंतर स्क्रूटीनी करू. त्यामुळे आता

वेळ आली आहे महाराष्ट्रातील सरकार बदलण्यासाठी आता आपण कामाला लागले पाहिजे.

महायुती सरकारच्या काळात शेतकऱ्यांवर इतका अन्याय होतोय, की लोकांना विश्वास पटलाय, की शरद पवार साहेबांच्या विचाराचेच सरकार शेतकऱ्यांना न्याय देऊ शकेल. आपल्या पक्षाचे खासदार लोकसभेत चांगली कामगिरी बजावतात. अर्थसंकल्प जाहीर झाला, त्यावेळी महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही म्हणून आपल्या खासदारांनी सत्ताधाऱ्यांना घेरले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात देशाच्या विकासाची पुढची दिशा दाखविणे गरजेचं होते. पण, पंतप्रधानांनी ते केलं नाही. कारण, त्यांचा आत्मविश्वास हरवलाय. महाराष्ट्रात तर परिवर्तन होणारच, पण देशातही परिवर्तन होऊ शकतं. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू कधीही पलटी मारू शकतात. त्यामुळं महाराष्ट्रानंतर देशातही सत्तांतर होऊ शकतं.

ज्यांनी दहावेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला, त्यांनी तिजोरीचं दारच काढून टाकलं. कारण हे आत्मविश्वास गमावलेलं सरकार आहे. ज्या योजनांची घोषणा केली, त्या योजनांचा प्रचार करण्यासाठी जाहिरातींवर प्रचंड खर्च केला, तरी काही जमत नाही. आता योजनांचा प्रचार करण्यासाठी योजनादूत नेमणार आहेत. त्यातही कॉन्ट्रॅक्टरचा लाभ. हे सरकारच कॉन्ट्रॅक्टचं आहे. राज्यात निरंकुशपणे सत्ता राबविली जात आहे. अधिकारीही ताटाखालचे मांजर झाले आहेत. काल-परवा उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर हल्ला झाला. महाराष्ट्रात असे कधी झाले नव्हते. महाराष्ट्र कुणी नासवला, त्यांना महाराष्ट्र धडा शिकविणार. मुंबई, महाराष्ट्र यांच्या ताब्यातून सुटला पाहिजे. त्यामुळे एक धक्का देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातल्या जनतेशी संवाद साधताना जनता ही महाराष्ट्र धर्माचे रक्षण करण्यासाठी महाविकास आघाडीच्या मागे खंबीरपणे उभी असल्याचे दिसत आहे. आज या सरकारच्या काळात ५० रूपयांना मिळणारी वस्तू १०० रूपयांना मिळत आहे. १८ टक्के जीएसटी लावण्यात येत असल्यामुळे लोकांना प्रचंड महागाईचा सामना करावा लागत आहे. सरकारला जनतेचं काहीएक पडलेले नाही. कर गोळा केल्याशिवाय सरकार चालवता येणार नसल्याची सरकारची भूमिका आहे.

तरूणांच्या हाताला काम देण्यात हे सरकार अपयशी ठरलंय. आहे ते रोजगार इतर राज्यांत वळवण्यात सरकार धन्यता मानतंय. गुजरातनं हातातून रोजगार खेचून घेतले तरी ते काही बोलत नाहीत. त्यामुळे येत्या काळात आपल्याला बेरोजगारी आणि महागाईतून महाराष्ट्राला मुक्त करायचंय. महाराष्ट्र सरकारनं जाहिरातींवर जितका खर्च केलांय, तितका कशावरच केलेला नाही. १४ कोटी रूपये एका कार्यक्रमासाठी खर्च होतात. सरकार योजनांवर जितका खर्च करत नाही, तितका जाहिरातींवर करतंय हे दुर्दैवी आहे. भाजपबाबत लोकांच्या मनात प्रचंड नाराजी आहे. आमदारांना हाताशी धरून त्यांनी दोन पक्ष फोडले. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांच्यासोबतच सरकारमध्ये बसले म्हणून भाजपची विश्वासार्हता कमी झाली. त्यामुळे भाजपचे रेटिंग महाराष्ट्रात कमी झालंय.

सरकारमधील लोक दमदाटीही करू लागलेत. आमच्या पक्षाच्या चिन्हापुढं मत देण्याची दमदाटी करतात. नाहीतर योजना बंद पाडू असं धमकावतात. आर्थिक घडी विस्कटून टाकण्याचं काम सध्या सुरु आहे. सरकारनं जाहिरातींवर वारेमाप खर्च सुरू केला आहे. प्रत्येक वृत्तपत्र पहा, सर्वत्र यांचेच फोटो पहायला मिळतील. टीव्हीवरदेखील हेच. दोन सक्षम उपमुख्यमंत्री असताना असा पैशाचा अपव्यय अपेक्षित नाही. पराभूत मानसिकता असलेलं सरकार राज्यात काम





करत आहे. विधानसभा निवडणुका अजून लांब आहेत, तरी आतापासूनच धमक्या सुरू झाल्या म्हणून हे सरकार आपल्याला खाली खेचायचंय.

कुठलाही गाजावाजा न करता शिवस्वराज्य यात्रा थेट लोकांच्या हृदयात पोहोचतेय. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वच खासदार संसदेत लोकांचे संवेदनशील प्रश्न ठामपणे मांडत आहेत. मला त्यांचा अभिमान आहे. पाटोद्यातल्या आमदारानं काही किरकोळ गोष्टीत मन अडकवून आदरणीय शरदचंद्र पवारसाहेब यांच्याशी गद्दारी केली. राज्यातल्या ४० आमदारांनी आपल्या जनतेसोबत गद्दारी केली. आज त्या सर्वांची शोकांतिका आपल्याला माहिती आहे.

काही लोकांनी हिंदू देवस्थानच्या जमिनी लाटल्या. त्या परस्पर विकल्या. त्यांचं पाप दडवण्यासाठी आता सरकारनंच कायदा बदलण्याचं पाप केलंय. यावर विधानसभेत मी आवाज उठवला. तुम्हाला शब्द देतो, की आपलं सरकार आल्यावर या घोटाळ्याची पाळंमुळं उखडून काढणार. आणि त्यासाठी जनतेनं महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आणण्यासाठी साथ द्यावी.

मराठवाड्याचा मोठा नेता पडत नाही, असं वाटत असलेला नेत्याला पाडण्याचा काम तुम्ही केलं. संपूर्ण मराठवाड्यात भाजपला तुम्ही हरवले. सरकार घाबरलेलं आहे, नाहीतर हरियाणासोबत राज्याची विधानसभा निवडणूक घेतली असती. मागच्या २०१९ च्या निवडणुकीत पराभव झाला याची कारणे शोधा आणि सुधारणा करा.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नेहमी शरद पवारांचा अपमान करतात आणि आमच्यातले



गेलेले ऐकून घेतात. स्वाभिमान राहिला नाही, आतातर कंपनी लावली. कंपनीच्या सल्ल्यावर चालत आहे, माणुसकी जिव्हाळा सगळं संपल आहे. मराठवाड्यात ही शेवटची सभा आहे. राजकारणात संयम असणे गरजेचे आहे. माझ्या विरोधात जे जे निवडणूक लढले ते पुढच्या निवडणुकीत माझं काम करतात. ही विधानसभा जिंकायची हे विसरू नका. महाविकास आघाडीची बैठक झाल्यावर उमेदवार घोषित होईल.

निवडणुका ३ लाख लोकांमध्ये होतात. आपण इथे दोन ते अडीच हजार माणसं बसलेलो आहोत. यातच तुमचे एकमेकांशी एवढे मैत्रीपूर्वी संबंध असतील तर अवघड आहे. तुम्हाला विजयापर्यंत पोहोचायचं असले तर बऱ्याच गोष्टी सहन करायच्या असतात. निवडणूक सोपी झालीये असं गृहीत धरु नका. आणखी निवडणुकीला ३ महिने वेळ आहे. बेरजेचे राजकारण करा, तरच आपल्याला निवडणुकीत यश मिळेल. कोणाला काय करायचे ते करु देत. तुम्ही स्वत: पक्षाचे मालक होऊ नका. वर बसलेले सांगत आहेत, त्याप्रमाणे तुम्ही वागा. प्रत्येकजण एकमेकांची अवहेलना करायला लागला तर ते बरे नाही.

ज्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन तुम्ही इथे आलात, त्यांच्याकडे बसा आणि शांत बसा. हिरोगिरी का करत आहात? कोणाला कमी लेखल्यामुळे आपण मोठे होत नाही. हे कायम लक्षात ठेवा. सर्वांना बरोबर घेऊन जायची ताकद असेल तर आपली निवडणूक सोपी होईल. मी शिवस्वराज्य यात्रेत अनेक ठिकाणी आलो. शेवटी कोणाला इच्छुक व्हायचं असेल तर त्याची इच्छा असेल. ज्याच्या त्याचा प्रश्न आहे, पक्षात लोकशाही आहे. तिकिट मागण्याचा आणि हट्ट करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. श्रेष्ठी मेरीट प्रमाणे आणि ज्याची लोकप्रियता आहे, त्याप्रमाणे निर्णय घेतील. त्यामुळे तुम्ही विनाकारण पराचा कावळा करणे योग्य नाही. विधानसभेच्या निवडणुका २ ते ३ महिन्यांनी सुरु होणार आहेत, माझ्या आधीच्या वक्त्यांनी सर्व माहिती दिली आहे. पक्ष सत्तेत जो काही आला त्यातून आपणा सर्वांना वाटू लागलं की, सत्तेत असताना आपण महाराष्ट्राच्या जनतेची सेवा केली. पण काही लोकांनी २ पक्ष फोडले. त्यामुळे लोकांचा हिरमोड झाला.

आपल्या घरातील एखादा मुलगा जर बेरोजगार असेल तर त्याची जबाबदारी या राज्यातील सरकारची आहे. लोकसभा निवडणुकीआधी कोणीही लाडक्या बहिणी नव्हत्या. लोकसभा निवडणुकीच्यावेळी महाराष्ट्रात किती बहिणींना त्रास झाला, याबाबत मी जास्त सांगण्याची गरज नाही. मात्र, जनतेने लोकसभेची चपराक दाखवली आणि हे सर्वजण जाग्यावर आले. मात्र, आता त्यांना सर्वजण लाडके व्हायला लागले आहेत. हे पुतना मावशीचं प्रेम आहे. हे सावत्र भावाचं प्रेम आहे. सावत्र भाऊ फक्त तीन महिन्यांसाठी तुम्हाला मदत करत आहे.

आता काही दिवसांनी अनेक लोक तुमच्याकडे येतील, काहीजण रंगीबेरंगी कपडे घालून येतील. मग तुमच्या मनात प्रश्न पडेल की आरे काय चाललं आहे? मात्र, आम्ही साधी माणसं आहोत. मी तुम्हाला महाविकास आघाडीच्यावतीने विश्वास देतो की, तुम्ही महाविकास आघाडीला ताकद द्या. उद्या सत्तेत आल्यानंतर आमच्या तीनही पक्षांची एकत्रित आघाडी मिळून महायुतीने जेवढं दिलं, त्यापेक्षा जास्त देण्याचं काम आम्ही निश्चित करू.

■■



# महाराष्ट्रात लवकरच सत्तेवर आपलंच सरकार

## सुप्रिया सुळे यांचे उद्गार

लोकसभा निवडणुकीच्या काळात मी आणि अमोल कोल्हे चिंतेत होतो, पण तुमची ताकद होती, त्यामुळं आम्ही निवडून आलो. आमदार, पदाधिकारी, कारखान्यातले पदाधिकारी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगर पंचायती सगळे सोडून गेले. मी आणि अमोलदादा रोज विचार करायचो आता पुढे काय होणार? आम्हाला दोघांना तुमची ताकदच माहीत नव्हती. पक्षाची ताकद तुम्ही सगळे आहात. संघर्षाच्या काळात आम्ही काळजी करत होतो, कारण पक्ष नव्हता, चिन्ह नव्हतं, नेते नव्हते, काहीही नव्हतं. आम्ही दोघं एकमेकांना समजावत होतो. पण आता आम्हाला कळतंय की मतदार राजा आमच्याबरोबर होता. बाकी सगळे निघून गेले होते.

आमचं भाग्य आहे की आम्हाला तुम्हा सगळ्यांचा विश्वास, प्रेम लाभलं हेच नातं आम्ही कायम ठेवू. बारामती ही आपली आन, बान आणि शान आहे. नवले ब्रिजवर अपघात व्हायचे आपण नितीन गडकरींची मदत घेतली. आता इंदु चौकातही आपल्याला तसाच मार्ग काढायचा आहे, तो रस्ता आता आपल्याला सुधारावयाचा. पुण्यात, बारामतीत अपघात वाढत चालले आहेत, गुन्हे वाढत आहेत. चांगलं प्रशासन द्यायचं असेल तर आपल्याला सरकार बदलायचं आहे हे लक्षात ठेवा. येत्या काही महिन्यांमध्ये आपलं सरकार येणार आहे.

मला परवाच एका पत्रकाराने सांगितलं की बारामतीत जे घडलं ते अपेक्षित नव्हतं. मी त्यांना सांगितलं की लोकांनी आम्हाला निवडून दिलं आहे. मी अंडर कॉन्फिडंट होते आणि ते ओव्हर कॉन्फिडंट होते. पण आज तुम्हाला सांगते बारामती आणि शिरुर मतदारसंघ एकाच माणसाला कळतो त्या माणसाचं नाव आहे शरद पवार. शरद पवार आणि तुमचं हे प्रेमाचं नातं आहे ते काही कुठल्या योजनेचं नातं नाही. एक लक्षात घ्या नाती १५०० रुपयांनी जोडली जात नाहीत. कुणीतरी म्हणालं की एक गेली म्हणून बाकीच्या बहिणी जोडल्या. पण तसं होत नाही. पैशांच्या नात्याने व्यवहार होतात, नातं जुळत नाहीत. झालं गेलं गंगेला मिळालं त्यांनाही शुभेच्छा जिथे असेल तिथे सुखाने नांदा.

रविवारी माझा फोन हॅक झाला. मी जयंत पाटील यांना मेसेज केला तर भलतंच कुणीतरी उत्तर देतं आहे. मी म्हटलं पक्ष गेला, चिन्ह गेलं, सगळं गेलं, आता मोबाइलही हॅक झाला होता. आता फोनमुळे सगळं गेलं, किती वाजले ते पण फोनवर पाहतो. येत्या काही महिन्यांत आपलंच सरकार येणार आहे. काहीही झालं तरीही तुतारी विसरायची नाही तिला फार महत्त्व आहे. कोणतेही सत्ताकेंद्र सोबत नसताना सामान्यांच्या जिवावर मी बारामतीत विजयी झाले. बारामतीतील विकासकामे गुणवत्तेची होत नाहीत. त्यात मी लक्ष घालणार आहे. बारामतीकरांचे शरद पवार यांच्याशी ऋणानुबंध आहेत. हे नाते मनापासून तयार झाले असून, ते पैशाने झालेले नाही.

भगवान राम त्यांच्यासाठी चुनावी जुमला आहे. पण, आमच्यासाठी आस्था आहे. जेव्हा मी रामकृष्ण हरी म्हणते आणि हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा, एक मिनिट, तुम्ही आमच्या हरीचं नाव घेतलं तरी देव पावला म्हटलं जातं. तो नाही म्हणत सगळ सोडून इथं बसा, पांडुरंग हा एकच देव आहे, जो म्हणतो माझ्याकडे आलं नाही तरी चालेल, चांगली सेवा करा, मी तुम्हाला दर्शन द्यायला येईन, माझ्याकडे यायची गरज नाही. ही संतांची भूमी आहे, संस्कारी आहे. सत्तेतील भाऊ काय म्हणतात बघा, मी १५०० रुपये माघारी घेईन म्हणतात.

तुम्ही विचार करा, माहेर जेव्हा सोडून सासरी जातो, तेव्हा घरी आमच्या बहिणीला नीट बघा, असं म्हणणारा भाऊ असतो. तोच भाऊ बहिणीला जर धमकी देणार असेल तर बघा मत नाही दिलं ना तर परत घ्यायची ताकद माझ्यात आहे. मग आम्ही बहिणी परवडल्या. काय नको. भावांनी प्रेम दिलं यावरच आम्ही खूश असतो. नको बाबा तुझे १५०० रुपये. १५०० रुपये परत घेणाऱ्या भावाला आदरपूर्वक प्रेमानं सांगायचं आहे की महाराष्ट्राच्या लेकीला धमकी दिली ना १५०० रुपये परत घेईन तर तू घेऊनच दाखव, बघते तुझा काय कार्यक्रम करते, ये नही चलेगा.

१५०० रूपये दिले, की नवीन बहिण येईल हा भाऊ-बहिणीच्या नात्याचा अपमान आहे. दुर्दैव आहे, महाराष्ट्राचं राजकारण हे नात्यांचा खेळ होऊन बसलंय. पण, या नात्याचा मी खेळ होऊ देणार नाही. असं सरकार महाराष्ट्रात आणा जे दिल्लीसमोर मुजरा करणार नाही, एवढीच माझी माफक अपेक्षा आहे. १५०० रूपये दिले म्हणून लगेच आम्ही नात्यात वाहून जाऊ असं सरकारला वाटत असल्यास हा त्यांचा गैरसमज आहे. कुठलीही चांगली स्कीम आम्ही कधीही बंद करणार नाही, उलट त्यामध्ये चांगल्या सुधारणा करू. फार जवळून पाहिलं आहे या सरकारला. ते एकमेकांचेच नाहीत, तर आपले कधी व्हायचे.

लोकसभेत जे ४०० पार होणार होते, ते २४०वर येऊन बसले, हे देशाने त्यांना दाखवून दिलंय. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात बोलणाऱ्यांना ईडी आणि सीबीआयच्या नोटीसा पाठवून त्यांना जेलमध्ये टाकलं जातंय. देशातील सर्वसामान्य नागरिक हा प्रामाणिक आहे. बिकाऊ नाही. शिवस्वराज्य यात्रा ही महाराष्ट्राच्या अस्मितेची, स्वाभिमानाची यात्रा आहे.



महाराष्ट्रातल्या एका पक्षानं वक्फ बोर्डावरील भूमिका स्पष्ट केलेली नाही. ते नक्की कोणाबरोबर आहेत, याचे उत्तर त्यांनी द्यावे. सोयीप्रमाणं वागून चालणार नाही. आपलं सरकार आल्यावर बहिणींच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडू. आपलं सरकार आल्यावर पोलिसांवर अन्याय होऊ देणार नाही. मेरिटवरच बदल्या होतील.

राज्यात सर्व सरकार सत्तेत आल्यानंतर चांगलं काम करतात. पण या सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली आहे, या योजनेचा टायमिंग पाहा. त्यांना कधीही बहीण लाडकी वाटली नाही. लोकसभेच्या निवडणुकीनंतर त्यांना बहीण लाडकी वाटायला लागली. त्यांना नाते आणि व्यवहार यातील



फरक कळत नाही. व्यवहारात पैसे असतात. नात्यात प्रेम आणि विश्वास असतो. नात्यामध्ये पैसे घेत नाहीत आणि व्यवहारात प्रेम आणि नातं येत नाही. महाराष्ट्रातल्या महिला फार स्वाभिमानी आहेत. तुम्ही १५०० रुपये देत आहात तर तुमचे आभारी आहोत. पण जर तुम्हाला वाटत असेल की आम्हाला १५०० रुपये देऊन आम्ही नात्यात वाहवत जाऊ, तर हा गैरसमज आहे.

लाडकी बहीण योजनेबाबत सत्तेतील दोन आमदार बोलले आहेत. त्यातील एकजण म्हणाले, माझं योजनेवर बारीक लक्ष आहे. दीड हजार रुपयांचे दुप्पट मी करु शकतो. पण निवडणुकीनंतर माझ्या लक्षात आलं की हा पैसा विरोधातील मतदारांना गेला तर मी तुमचाच भाऊ आहे, मी ते पैसे जसे दिले तसे ते परत घेऊ शकतो. माझी त्या आमदाराला विनंती आहे, तुम्ही ते पैसे परत घेऊन तर दाखवाच. फक्त एका बहिणीचे पैसे परत घेऊन दाखवा. मी महायुती सरकारलाही आव्हान देते, तुम्ही योजनेचे पैसे फक्त एखाद्या महिलेकडून परत घेऊन दाखवा. मग पुढे काय करायचं ते पाहू.

विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये होईल. त्यानंतर डिसेंबरमध्ये लिस्ट चेक केल्या जाणार आहेत. मला देखील माहिती नव्हतं. हे सरकार बूथ आणि मतदानाची यादी चेक करणार आहेत, असं त्यांचेच एक आमदार म्हणाले. मतदान त्यांना असेल तरच पैसे अन्यथा पैसे नाहीत. आता त्यांना हा गैरसमज झाला आहे की, त्यांचं सरकार सत्तेत येईल. त्यांनी या गैरसमजामधून बाहेर पडलं पाहिजे. हे सरकार असं करत असेल तर राज्यातील एकही महिला महायुतीला मतदान करणार नाही.

राज्यात अनेक वर्ष राष्ट्रवादी काँग्रेसचं सरकार होतं. तेव्हा शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला होता. तेव्हा सरसकट कर्जमाफी झाली होती. पण त्यावेळी कोणीतरी असं म्हटलं नाही की आम्ही सातबारा कोरा केला, आम्हाला मतदान झालं नाही तर पुन्हा आम्ही तुमच्या सातबाऱ्यावर कर्ज टाकू. आताचं जे सरकार आहे ते तुमच्या आणि माझ्या सुख आणि दुःखाचं नाही. हे भाऊ आणि बहिणीच्या नात्याला १५०० रुपयांची किंमत लावत आहात. बहिणींचं प्रेम कधीतरी बघा. ही बहीण फक्त १५०० रुपयांसाठी भावांवर प्रेम करत नाही, तर मनापासून प्रेम करते. भावाने मागितलं असतं तर सर्व देऊन टाकलं असतं. पक्ष आणि चिन्ह काय? सगळं देऊन टाकलं असतं. लाडक्या बहिणीच्या फसव्या नात्याला महिलांनी बळी पडू नये. सत्ताधारी पक्षाच्या दोन आमदारांनी या योजनेबद्दल जी भाषा वापरली, त्यामुळे ही योजना दोन महिनेच सरकार राबविणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अनेकवेळा सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला. महायुतीच्या सरकारने दूध, कांदा, सोयाबीन, कापूस याला भाव न दिल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे.

भावाच्या दारात आम्ही बहिणी काही मागायला गेलो नाही. हे आमच्या दारात आलेत. यांनी पैसे परत घेऊनच दाखवावेत. सत्तेतल्या लोकांनी जर बहिणींनी मतदान केलं नाही म्हणून त्रास दिला तर गाठ सुप्रिया सुळेशी आहे. महायुतीचं सरकार जुमलेबाज आहे. शेतकरीविरोधी आणि महागाईच्या बाजूने आहे. म्हणून हे सरकार आपल्याला बदलायचंय. दिल्लीसमोर न झुकणारे सरकार आपल्याला आणायचंय. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र करू. या सुसंस्कृत महाराष्ट्रात जे घाणेरडं, गलिच्छ राजकारण सुरु केलं आहे ते बंद केलं पाहिजे. हे सरकार का बदललं पाहिजे, घाणेरड्या गलिच्छ राजकारणाला संपवण्यासाठी बदललं पाहिजे.

■■



# महाराष्ट्राच्या मातीत गद्दारांना जागा नाही

**अमोल कोल्हे**

हा महाराष्ट्र छत्रपतींचा महाराष्ट्र असून या महाराष्ट्रात निष्ठावान माणसांची नावे काळजावर कोरली जातात. गद्दारांना महाराष्ट्राच्या मातीत जागा नाही. त्यामुळे ज्यांनी तुमच्या आमच्या आयुष्य बदलले त्या आमचे नेते शरद पवार यांची यांच्याशी गद्दारी करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल. सध्या हे सरकार योजनांची पुंगी वाजवून जनतेला भूलवण्याचं काम करत आहे. स्वार्थासाठी केलेल्या गद्दारीवर पडदा टाकण्यासाठी विविध योजना आणत आहे. मात्र या जुलमी सरकारला चले जाव सांगण्याची वेळ आली असल्याने ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी शिवस्वराज्य यात्रेला सुरुवात केली आहे.

सगळ्यात जास्त टॅक्स महाराष्ट्राकडून दिला जातो, त्या महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली गेली. केंद्र सरकारला याबाबत जाब विचारण्याची हिम्मत महायुतीच्या नेत्यामध्ये राहिली नाही. त्यासाठीच या शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्राचा स्वाभिमान पायाखाली तुडवणाऱ्या महायुतीला चलेजाव सांगणार आहे. हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा लढा आहे. शिवरायांनी महाराष्ट्राचा स्वाभिमान दिल्लीला दाखवून दिला. शिवाजी महाराज हे आपले आराध्य दैवत असून त्यांचा आदर्श समोर ठेवून गद्दारी व भ्रष्टाचार करणाऱ्यांना धडा शिकवू.

बारामतीकरांनी लोकसभेला दाखवून दिले आहे. आता वेळ आली आहे, त्यांची जागा दाखवून द्यायची. शरद पवार यांच्या नेतृत्वात राज्य नव्हे देशातील सरकार बदलणार आहोत, त्यामुळे लोकसभेसारखे काम आपल्याला करायचे आहे. काहीजण म्हणतात की, विकासासाठी लोक जातात. हे आपण अनेकदा ऐकतो. आम्हाला एक कायम दरारातील आवाज ऐकायची सवय होती. त्या वाघाच्या आवाजाचं म्याव म्याव झालं की काय काही कळेना काही योजनांचा पोहा पोहा सुरु आहे. या योजनांची फोड बारामतीकरांसारखी कुणी करु शकत नाही. नऊ वर्षे भाऊ दारावरुन कधी जातो कधीच कळत नाही आणि अचानक भाऊ दारात येऊन रक्षाबंधन करतो. भावाने आणि बहिणीने काय करावं? इतकी वर्षे आठवण आली नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी बहीण लाडकी नव्हती. निवडणुकीनंतर जर ही परिस्थिती येत असेल तर काय डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतले जातात हे तुम्हीच बघा.

याप्रसंगी मला एक कविता ऐकवायची आहे. ती अशी आहे, की किती दमदाटी केली तरी लोक आता बधत नाही, बघतो तुला, बघून घेतो हे स्वाभिमानाला आमच्या खपत नाही. वस्तू चोरली, रंग बदलला तरी चोरी काही लपत नाही. स्वार्थासाठी बाप बदलला तरी जनतेला ते पटत नाही. घड्याळ जरी चोरलं तुम्ही तरी वेळ मात्र आमची आहे. जॅकेट घाला, योजना काढा, हवा फक्त पवारसाहेबांची आहे

कांदा उत्पादक शेतकरी नाडला जात असून ४० टक्के

निर्यात शुल्कामुळे पाकिस्तान पेक्षा आपला कांदा महागात विकला जातोय. परिणामी आपल्यापेक्षा पाकिस्तानी कांद्याला मागणी आहे. युवकांच्या भविष्याशी खेळ खेळण्याचे पाप महायुतीचे सरकार करत आहे. महाराष्ट्रातील उदयोगधंदे शेजारील राज्यात पळवले जात असून त्याविरोधात आवाज उठवण्याचे धरिष्टय महायुतीच्या नेत्यामध्ये नसल्याची सांगत लाडका भाऊ लाडकी बहीण लाडकी मोलकरीण योजना नसून एकच लाडकी खुर्ची योजना असून यासाठी लोटांगण घालण्यासाठी हे महायुतीचे नेते तयार आहेत. भोसरीतील प्रत्येक कामात भ्रष्टाचार सुरू आहे. शीतलबागेतील सात लाखाचा पूल सात कोटींवर कसा केला. मोशीत कचराडेपो नसून सोन्याचा डेपो आहे. कचऱ्यातून पैसे कमविले जात आहेत. भोसरीतील कोणत्या व्यक्तीचे दोनशे कोटीचे हॉटेल लंडनमध्ये आहे? लोकसभेला कानाखाली मारली म्हणून लाडक्या खुर्चीसाठी लाडकी बहीण योजना आणली आहे. लाडकी खुर्ची योजना सुरू आहे. त्यासाठी वाट्टेल तितकी लोटांगणं घालण्याची तयारी या महायुतीने ठेवली आहे. यासाठी दिल्ली दरबारी दौरे सुरु आहेत. त्यामुळं आता आपल्याला स्वाभिमान जागवणारे सरकार आपल्याला राज्यात आणायचं आहे. त्यासाठी ही 'शिवस्वराज्य यात्रा' आपण काढतो. राज्यातील इतके प्रकल्प गुजरातमध्ये गेले, पण एकही नेता केंद्रातल्या सत्ताधाऱ्यांना जाब विचारू शकला नाही. आता निवडणूक आली की योजना आणतायत. ह्या सगळ्या योजना फसव्या आहेत. 'लाडकी खुर्ची' ही ह्यांची एकच खरी योजना आहे. महायुतीचे सरकार वेगवेगळ्या योजना आणत आहे. पण, या योजना फक्त दोन महिन्यांपुरत्याच आहेत. शिवस्वराज्य यात्रेचा उदंड प्रतिसाद बघून विरोधकांना झोप लागणार नाही.

नागपंचमीच्या सणाचं वैशिष्ट्य आहे. आम्ही सापाला दूध पाजणं म्हणत नाही. शेतकऱ्यांसाठी हा कृतज्ञतेचा सण आहे. म्हणून आपण नागदेवतेची पूजा करतो. पण या सणाचं स्वरुप आजकाल नागाचे दात काढून नंतर पुंगी वाजवून त्याला डोलायला लावणं इथपर्यंत झालंय. हा फरक समजून घ्या. कारण गुलाबी रंगाची पुंगी वाजवून योजनांचा आवाज काढत जनतेचा नाग डोलतो का काय हे बघण्याचा प्रयत्न सुरू होत असताना जनता मात्र कृतज्ञ आहे.

लोकसभेत दिल्लीविषयी जेवढा राग लोकांच्या मनात होता, त्याहून पाच ते दहापट अधिक राग खोके सरकारविरोधात लोकांच्या मनात आहे. सत्तेतला आमदार म्हणतो, मत दिले नाही तर पैसे परत घेऊ. मग बहिणींनी पायताण काढावे की नाही? राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणतात, आमच्या नावापुढचं बटन दाबलं तरच योजना सुरू राहील. मग बहिण लाडकी आहे, की फायद्यापुरती आहे असा प्रश्न पडतो. साहेबांच्या छत्रछायेखाली असताना गर्जना व डरकाळी करता येत होती. आता कुजबुजावं लागतंय. आगामी निवडणुकीच्या तोंडावर मंत्रालयात एक नवा क्यूआर कोड आला आहे. मंत्रालयातील ८० टक्के फोन गेल्या ८ दिवसांपासून बंद आहेत. तुम्ही जर विचारलं तर सांगतील तांत्रिक बिघाड आहे. खरंतर मंत्रालयात एक नवा क्यू आर कोड आला आहे. क्यू आर कोड स्कॅन केला की त्यावर फक्त येतंय, की टेंडर घ्या, कमिशन द्या. याचा अर्थ निवडणूक जवळ आली.

जर निवडणुका लांबणीवर गेल्या तर डोक्याचं केस गळू नयेत यासाठीच्या तेलाचा सर्वांत जास्त बिझनेस मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडे होईल. कारण मंत्रालयातील सर्व अधिकारी वैतागले आहेत. तिजोरीमध्ये खडखडाट आहे. आता मंत्रालयातील अधिकारी केस उपटायला लागले आहेत. कारण सरकारची परिस्थिती आयसीयूमधील पेशंट प्रमाणे झालीय. महायुतीच्या सल्लागारांना विनम्रपणे एवढचं सांगू इच्छितो की महाराष्ट्र शेतकऱ्यांचा आहे. आमच्याकडे पाऊस लांबणीवर पडला म्हणून शेतकरी हातपाय गाळून बसत नाही. तो पुन्हा कंबर कसतो, दुबार पेरणी करतो. निवडणुका लांबणीवर टाकल्या तरी महाराष्ट्रातला शेतकरी तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय



राहणार नाही. सरकारला कळून चुकलं आहे की, आता जर निवडणुका झाल्या तर महाराष्ट्र सरकार हद्दपार झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे या निवडणुका लांबणीवर टाकण्याच्या हालचाली सुरू आहेत.

शेतकरी रूमणं हातात घेतो तेव्हा भल्याभल्या सरकारांची पळता भुई थोडी होते. सरकार सोयाबिनला ६ हजार रुपये भाव देणार होतं. त्यासाठी २०१४ मध्ये दिंडी काढण्यात आली होती. गळ्यात टाळ घालून बेंबीच्या देठापासून ओरडत जात होते. तेव्हा ६ हजार भाव मागत होते. आज ४ हजार रुपयांनी सोयाबिन घालावं लागतय. प्रत्येक शेतकऱ्याचं १२०० ते १३०० रुपयांचं नुकसान होतं आहे. म्हणजे एकरामागे साडे बावीस हजार रुपयांचं

नुकसान होतं आहे.

खताची बॅग साडेचारशी रूपये होती, आता किती रुपये झाली? हे शेतकरी विसरणार नाही. शेतकऱ्यांची जी परिस्थिती आहे, तीच युवकांची परिस्थिती आहे. सरकारमधील अडीच लाख पदं रिक्त आहेत, त्याची भरतीचं होतं नाही. मराठी तरुणांना भरती करुन घेतलं जात नाही. तो पैसा योजनांसाठी फिरवला जातोय. सुसंस्कृत राजकारणाला ज्यांनी गालबोट लावण्याचं काम केलं, त्यांचा विधानसभेला एकदाच हिशोब करून टाका. भारतीय जनता पक्षाने राजकारणाला एका वेगळ्या दिशेनं नेलं. नवा आयाम दिला. सरकार जशी बहिणीला ओवाळणी देतंय, तसंच दाजीला आणि बहिणीच्या मुलाच्या हाताला काम द्या. सरकार योजनांचे पैसे देऊन मतं विकत घेण्याचा प्रयत्न करतंय.

वारकरी संप्रदाय म्हणजे सेवाभाव. माऊलींची सेवा करताना तिथं व्यवहार नसतो. पण महायुती सरकार ठेकेदारांना कुठून कुठून लाभ करून देता येईल यातच मश्गुल. वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्याच्या निमित्तानं महायुती सरकारने चढ्या दराने तपासणीचा ठेका दिला आणि कोट्यवधींची बिलं बनवली.



जन्माला आल्यानंतर मिळणाऱ्या पहिल्या लसीपासून ते मरेपर्यंत लागणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर जीएसटी लावलांय आणि त्या जीएसटीमधून येणाऱ्या पैशातून सरकार ठेकेदारांना हजारो कोटींची कामं देतंय आणि पुन्हा त्याच ठेकेदारांकडून निवडणुकीसाठी फंड गोळा करत आहे. कोणतीही योजना आणा, पण सरकार वाचवा अशी गत झालीय. सरकार मोरावाणी नाचतंय. महाराष्ट्रात नवीन जन्माला आलेल्या बाळाच्या डोक्यावरसुद्धा ६५ हजारांचं कर्ज आहे. सरकार एवढा कर्जाचा बोजा असूनही नवीन योजना आणतंय. सरकारने राज्यातल्या ७४ हजार आशा भगिनींचं चार महिन्यांचं मानधन दिलेलं नाही. मग लाडक्या बहिणीवर विश्वास कसा ठेवायचा? गुलाबी यात्रेत २००० रूपयांच्या नकली नोटांचा पाऊस पडला. जशा या नोटा नकली, तशाच त्यांच्या योजनाही नकली. जेव्हा इजा करण्यासाठी हात उचलला जातो, तेव्हा तो गुन्हा असतो. पण, संरक्षण करण्यासाठी हात उचलला जातो तेव्हा तिला मर्दुमकी म्हणतो, हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. लाडकी बहिण योजनेचा फॉर्म भरून घेणार, रक्षाबंधनला पहिला चेक पाठविणार, पण नंतर योजना चालू राहणार की नाही याची गॅरंटी नाही. कारण, केंद्रातल्या त्यांच्या बाबाच्या गॅरंटीची वॉरंटी नाही. मग योजनेची कशी राहणार हा प्रश्न आहे.

पंतप्रधान महोदय पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाला आले नसतील, कारण हा सोहळा पाहिल्यानंतर त्यांना दिसलं असेल, की जातीजाती भांडण महाराष्ट्रात लागू शकत नाही. चंद्रभागेच्या तिरी अठरापगड जातीचे वैष्णव एका पांडुरंगाच्या नामस्मरणात लीन होतात. त्यामुळे वस्तादावर विश्वास ठेवा. महाराष्ट्र एकदा वस्तादाच्या हाती आला, की दिल्लीतल्या सरकारच्या दोन कुबड्या काढून घ्यायला वस्ताद वेळ लावणार नाहीत.

इतिहासामध्ये आदिलशहाने अफजल खान पाठवला. आता कुठल्यातरी शाहने गद्दारीचा अफजल खान पाठवला. पण, महाराष्ट्रात गद्दारांना जागा दाखविल्याशिवाय जनता स्वस्थ बसत नाही, हा इतिहास आहे. खतांच्या आणि बी-बियाण्यांच्या किमतीत वाढ झाली. पण, सोयाबीनच्या भावात २ हजारांची घट झाली, हे शेतकरी विसरणार नाही. त्यामुळं तुम्ही निवडणुका कितीही लांबणीवर टाका, आम्ही सरकार नांगरून टाकल्याशिवाय राहणार नाही. कृषी सेवा विभागातल्या २५८ जागांना वित्त विभागाची मंजुरी मिळाली. तरीसुद्धा अजून भरती झालेली नाही. महाराष्ट्रातल्या सगळ्या तरूणांनी याचा गांभीर्यानं विचार केला पाहिजे. आता दिल्लीला मुजरे करणार नाही, तर दिल्लीच्या नजरेत नजर रोखून आपल्या हक्काचं मागणारं महाविकास आघाडीचं सरकार आणायचं आहे. लहानपणी ऐकलं होतं, की चप्पल, सुपारी, कपडा खरेदी करता येते. पण, भाजपनं दाखवून दिलं, की आमदार-खासदारही खरेदी करता येतात. महायुतीचे नेते दिल्लीसमोर जाऊन लोटांगण घालतात. शरणागती पत्करतात, हे कुठल्या स्वाभिमानी मराठी माणसाला सहन होतंय? महाराष्ट्राच्या राजकारणाला गद्दारीची कीड ज्यांनी लावली, त्या भारतीय जनता पक्षाचा सुपडासाफ केल्याशिवाय गप्प बसायचं नाही. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार आणण्यासाठी आपण सर्वांनी जोमानं प्रयत्न करूया.

सरकारने कोव्हिड काळात काम केलेल्या ७४ हजार भगिनींचे अद्यापही मानधन दिलेले नाही. आता केवळ निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण ही फसवी योजना आणली. परंतु जनतेने ठरविले आहे, हे सरकार जाणार व राज्यात शिवस्वराज्य येणार.

■■

# लोकशाहीला अजूनही धोका

काल आपण स्वातंत्र्याचा दिवस साजरा केला. आज आघाडीच्यावतीने उद्याची महाराष्ट्राची आपली दिशा काय राहणार आहे आणि जे काही महाराष्ट्रावरती संकट आहे, त्या संकटातून महाराष्ट्राची सुटका कशी करता येईल यासंबंधीची एक दिशा महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्या शहरांमध्ये, जे आपले लाखो सहकारी आहेत त्यांच्यापर्यंत हे आजच्या सोहळ्याच्या माध्यमातून पोचवावे त्यासाठी आजचं हे आपल्या सर्वांचं संमेलन आहे.

इथे अनेक सहकारी मित्रांची भाषणे झाली. प्रत्येकाने महाराष्ट्रामध्ये जे परिवर्तन करायचंय त्यासाठी काय करायची आवश्यकता आहे, त्याचे उत्तम मार्गदर्शन हे आपल्या सगळ्यांच्या समोर केलं. फक्त महाराष्ट्रापुरता विचार करायचे दिवस आता आहेत हे मला वाटत नाही. महाराष्ट्राचा विकास करावाच लागेल पण अजूनही देशावरचं संकट पूर्णपणे गेलं असा निष्कर्ष काढता येणार नाही. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेला एक भूमिका आपण मांडलेली संविधानाच्या संदर्भातली. मी जबाबदारीने सांगतो, की ज्या निवडणुकीमध्ये काही प्रमाणात यश आलं, पण याचा अर्थ संविधानावरचे संकट



# त्यासाठी एकजुटीने लढा

शरद पवार

**मुंबईत १६ ऑगस्ट रोजी झालेल्या महाविकास आघाडी पदाधिकारी मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केलेले भाषण...**

आहे ते पूर्णपणे गेलं असा निष्कर्ष काढण्याचे दिवस नाहीत. त्याचे प्रामुख्याने कारण आज देशाची सूत्रं ज्यांच्या हातामध्ये आहेत त्यांचा या सगळ्या संविधानात्मक संस्था, विचारधारा आणि तरतुदी यासंबंधीची आस्था नाही.

आज देशाच्या पार्लमेंटमध्ये मी बघतो देशाचे प्रधानमंत्री या पार्लमेंटची प्रतिष्ठा किती ठेवतात. राज्यसभेचे काही सदस्य याठिकाणी व्यासपीठावर आहेत. हल्लीच राज्यसभेचे आणि लोकसभेचे अधिवेशन झालं. या अधिवेशनामध्ये देशाचे प्रधानमंत्री एक दिवस सुद्धा सदनामध्ये आले नाहीत. त्या





सदनाची किंमत. त्याची प्रतिष्ठा याचं महत्त्व याच्याकडे ढुंकून न बघण्याची भूमिका आजची राज्यकर्त्यांची आहे. त्याची प्रचिती आम्ही लोकसभा किंवा राज्यसभेमध्ये आहोत त्यांना पुन्हा पुन्हा बघायला मिळते. आज काही संस्था आहेत सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष देशाचे प्रधानमंत्री इन्स्टिट्यूशन आहे, देशाचे विरोधी पक्ष नेते हे इन्स्टिट्यूशन आहेत. प्रधानमंत्री यांची प्रतिष्ठा ही देशाने ठेवली पाहिजे तसंच विरोधी पक्ष नेत्याची प्रतिष्ठा सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी कालच्या १५ ऑगस्टला विरोधी पक्षनेते पाठच्या ओळीत बसवले.

मी स्वतः विरोधी पक्ष नेता होतो. अटल बिहारी यांचे सरकार होतं आणि मला आठवतंय या सभेमध्ये माझ्या बैठकीची सुविधा कॅबिनेट मिनिस्टर यांच्या बरोबरची होती. मला आठवतंय मनमोहन सिंग प्रधानमंत्री होते. सुषमा स्वराज या विरोधी पक्ष नेत्या होत्या आणि याच १५ ऑगस्टच्या कार्यक्रमामध्ये कॅबिनेट मंत्र्यांच्या रांगेत सुषमाजी सुद्धा बसलेल्या होत्या. याचा अर्थ व्यक्ती हा प्रश्न नाही. या संस्थांचे प्रश्न आहेत. ही इन्स्टिट्यूशन आहे, लोकशाहीची इन्स्टिट्यूशन आहे आणि त्याचा सन्मान ही करण्याची जबाबदारी कुठल्याही राज्यकर्त्यांच्या वरती असते. त्यामुळे त्यांच्याकडून खर्गे किंवा राहुल गांधी यांची प्रतिष्ठा राखली जाईल अशी अपेक्षा जरी ठेवली तरी ती त्यांच्याकडून ठेवली गेली नाही. त्याचं महत्त्वाचं कारण या लोकशाहीच्या संस्थांवर, त्या पद्धतीवर किंचितही विश्वास नसलेले राज्यकर्ते आज देशाच्या सत्तास्थानी बसले त्यामुळे आपण अतिशय जागरूक राहण्याची गरज आहे.

महाराष्ट्र सरकारच्या संबंधीच्या निवडणुकीला आपण दोन महिन्यांनी सामोरे जाणार आहोत. तीन महिन्यांपेक्षा कमी दिवस आहेत. या कमी दिवसांमध्ये या तिन्ही पक्षांनी आणि आपल्या मित्रपक्षांनी एका विचाराने सामान्य लोकांमध्ये जाऊन त्यांच्यात जागृती निर्माण करून परिवर्तनाचा विचार हा त्यांच्या मनामध्ये रुजवला पाहिजे. महाराष्ट्राचं चित्र बदलायचं असेल तर इथलं सरकार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही. एककलमी कार्यक्रम महाराष्ट्राचे सरकार बदलणं. चुकीच्या लोकांच्या हातातली सत्ता काढणं. ती सत्ता चुकीच्या पद्धतीने किती वापरली जाते अनेक उदाहरणं सांगता येतील.



मी, बाळासाहेब थोरात, जयंतराव पाटील किंवा शिवसेनेचे विधानसभेचे नेते असतील त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो, की त्यांनी एक गोष्ट परवा फार चांगली केली. आजच्या सरकारने एक नवीन कायदा महाराष्ट्रात आणण्याचा निर्णय हा घेतला होता. त्या कायद्याचं नाव जन सुरक्षा कायदा. तो कायदा विधिमंडळामध्ये इंट्रोड्युस केला. आमच्या या सगळ्या नेत्यांनी मुख्यमंत्री आणि सभा अध्यक्ष यांच्याकडे आग्रह करुन हा कायदा थांबवून ठेवा. आपल्या लोकांच्या जागरूकतेमुळे तो कायदा आता थांबलाय. तो कायदा असा आहे की, त्या कायद्याने तुम्ही एकट्याने रस्त्यावर कुठेही निदर्शने करायचं ठरवलं तर तुम्हाला अटक करून पाच ते सात वर्ष तुरुंगात ठेवण्याचा अधिकार आहे. साधे निदर्शन केलं तरी एक माणूस असो, दहा माणूस असो, २५ लोक असो त्यांनी निदर्शने केली हा निकाल त्याची तरतूद आजच्या या कायद्यामध्ये केलेली. अशा अनेक तरतुदी आहेत त्या तरतुदीमध्ये मूलभूत अधिकार हा उध्वस्त करण्याची भूमिका आजच्या राज्यकर्त्यांनी केलेली होती. विरोधी पक्ष जागरूक होता आणि सभापतींनी, अध्यक्षांनी त्यांचं म्हणणं ऐकलं आणि तात्पुरता हा कायदा सध्यातरी थांबलेला आहे. अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या गोष्टीसाठी सत्तेचा गैरवापर हे सूत्र आजच्या भाजपच्या राज्यकर्त्यांचे आहे. यापासून महाराष्ट्राची सुटका करून घेणं हेच एक महत्त्वाचं काम, एक आवाहन आपल्या सगळ्यांच्या समोर आहे. त्यामुळे मी एवढेच सांगू इच्छितो निवडणुकीला सामोरे जायचंय, तिथे एकजुटीने यश मिळवायचंय, सरकार बदलायचंय. आम्ही तुम्हाला एक खात्री देऊ शकतो की, आम्ही तिघेही ते राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना, डावे आणि उजवे कम्युनिस्ट पार्टीचे, भारतीय शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष यातले सहकारी असतील या सगळ्यांना सन्मानाने बरोबर घेऊन एक सामुदायिक चित्र महाराष्ट्राच्या जनतेच्यासमोर ठेवू. निवडणुकीला एका विचाराने जाऊ आणि जो जो उमेदवार असेल आघाडीचा तो यशस्वी करण्यासाठी आम्हा सगळ्यांकडून प्रयत्न केले जातील. त्या प्रयत्नामध्ये तुम्हा सर्वांचा हातभार हवाय एवढंच याठिकाणी सांगतो. यश शंभर टक्के आपलं आहे, फक्त ही एकजूट आणि त्यासाठी पडेल ते कष्ट ही करण्याची तयारी तुम्ही ठेवा.




उद्धव ठाकरे

# महाराष्ट्राला झुकविणाऱ्याला

कालच स्वातंत्र्यदिवस साजरा केला आणि आजपासून आपण पुढच्या लढाईला सुरुवात करीत आहोत. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राची निवडणूकही जाहीर करून टाकावी. आमची पूर्ण तयारी झाली आहे. या निवडणूकीची लढाई पाहिजे तशी सोपी नाही. ही लढाई जिद्दीने लढली पाहिजे. म्हणजे एकतर तू राहशील किंवा मी राहीन. पण हे आपल्या मित्र पक्षात नको. आपण सर्वांनी महाराष्ट्र लुटायला आलेल्यांना सांगायचे की एक तर तू राहशील नाही तर मी राहीन, होऊन जाऊ दे. लोकसभेची निवडणूक ही संविधानाच्या रक्षणाची लढाई होती. या लढाईत आपण राजकिय शत्रूला पाणी पाजलेच आहे. पण आताची लढाई ही महाराष्ट्र धर्म रक्षणाची, महाराष्ट्राच्या अस्मितेची, संस्कृतीची आणि महाराष्ट्राचा स्वाभीमान जपण्याची आहे. त्यामुळे महाराष्ट्राला लुटायला आलेल्यांच्या विरोधात जिद्दीने लढले पाहिजे. महाराष्ट्राला झुकविण्याची जो हिंमत करतो त्याला आम्ही गाडून टाकतो, या इतिहासाची पुनरावृत्ती करायची आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये एकजूटीची वज्रमूठ दिसू द्या आणि हातामध्ये मशाल घेऊन महायुतीच्या बुडाला आग लावून विजयाची तुतारी फुंका.

लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्राने देशाला दिशा दाखवली आहे. ती दाखवलेली दिशा कायम ठेवण्यासाठी विधानसभेची




# गाडून इतिहासाची पुनरावृत्ती करा

निवडणूक जिंकणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी जागेवरून मारामारी करू नका. एखादी जागा शिवसेनेकडून काँग्रेसकडे, काँग्रेसकडून राष्ट्रवादीकडे किंवा राष्ट्रवादीकडून शिवसेनेकडे आली तर जागांसाठी मारामारी करू नका. सगळ्यांनी एकत्र काम केले पाहिजे. एकजूट, वज्रमुठ शब्दात नाही तर कामातून दिसली पाहिजे. माझ्यापेक्षा महाराष्ट्राचे हित आम्ही जपू, मला उमेदवारी मिळाली नाही तरी चालेल पण महाराष्ट्र लुटणाऱ्यांना खाली खेचू अशी शपथ घेतली पाहिजे.

तोतया आणि चोरांच्या हातात मी शिवसेना ठेवणार नाही. त्यांनी माझे धनुष्यबाण घेतले असेल तर त्यांच्या बुडाला आग लावण्यासाठी मी हातात मशाल घेतली आहे. लोकसभेत मशालीचा प्रचार करायला वेळ कमी मिळाला, तरीसुद्धा आपण यश मिळवले आहे. काँग्रेसच्या नशिबाने त्यांचा हात त्यांच्यासोबत आहे. त्यामुळे शिवसेनेची मशाल, काँग्रेसचा हात आणि राष्ट्रवादी काँग्रेसची तुतारी वाजवणारा मावळा हे सर्व गावागावांत, घरांघरात पोहोचवा.

वक्फ बोर्ड असो, हिंदू संस्थान, मंदिर किंवा कोणत्याही धर्माच्या जागा असतील तर आम्ही काही वेडेवाकडे होऊ देणार नाही. वक्फ बोर्डाच्या जमिनी संदर्भात कायदा करून त्या उद्योगपतीच्या घशात घालणार असाल तर तो डाव हाणून पाडू.



केदारनाथ मंदिरातील २००-२५० किलो सोने गायब झाले. सोने चोरून पितळेचा मुलामा दिला. याचे पितळ उघडे झालेच पाहिजे, त्याची जेपीसीद्वारे सखोल चौकशी करा.

महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण यावरून महायुतीत काड्या घालणारे बसले आहेत. पण मी माझ्यासाठी लढतोय ही भावना माझ्यात नाही. मी मुख्यमंत्रीपद सोडले ते मी माझ्या स्वार्थासाठी नाही तर महाराष्ट्राच्या स्वार्थासाठी. पण मी तुम्हा सर्वांसमोर स्वच्छ मनाने सांगतो कि आज इथे पृथ्वीराज चव्हाण व शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, मी पाठिंबा देतो. मुख्यमंत्री कोण होणार हे आम्ही बघू. पण भाजपसोबतच्या युतीत घेतलेल्या अनुभवाची पुनरावृत्ती नको. सेना-भाजप युती म्हणून आम्ही २५-३० वर्षे एकत्र लढलो. जागावाटपासाठी अशाच बैठका व्हायच्या. त्या बैठकांमध्ये ज्याच्या जागा जास्त येतील त्याचा मुख्यमंत्री हे जाहिर केले जायचे. पण हेच धोरण आम्ही एकमेकांच्या पायवर धोंडे टाकण्यासाठी करायचो. कारण तुझ्या जागा जास्त आल्या तर तुझा मुख्यमंत्री होईल, म्हणून जागा पाडायचे. मग या पाडापाडीच्या राजकारणात युतीला काय महत्त्व राहिले? त्यामुळे आधी ठरवा आणि मग पुढे चला. माझी काहीच हरकत नाही.

सरकारी योजना घरोघरी पोहोचवण्यासाठी सरकार ५० हजार दूत नेमणार आहेत. हे दूत म्हणजे त्यांचेच चेलेचपाटे असणार आहे. त्यांना १० हजार प्रति महिना दिला जाणार. म्हणजे लाडक्या बहिणीला १५०० आणि यांच्या सरकारी योजना पोहोचवणाऱ्याला १० हजार रुपये देणार. त्यातही या दुतांची खोटी नावे देऊन पैसा ओरबडला जाईल आणि हा सर्व गोंधळ पुढे सुरुच ठेवला जाईल. लाडकी बहीण योजनेसाठी पैसे कुठून आणायचे म्हणून न्यायालयानेही फटकारले आणि ही योजना थांबवू असे म्हटले आहे. त्यामुळे सरकार पाडायला ५० खोके आणि लाडक्या बहिणीला १५०० रुपये. मोदींनीही १५ लाख रुपये खात्यात येईल म्हटले होते. त्या १५ लाखांचे १५०० रुपये का झाले? ही पैशांची लूट असून हा एक प्रकारे घोटाळा आहे. पैसे देऊन दूत गावा-गावांत फिरणार असतील तर आपणही महाविकास आघाडीचे दूत आहात. आपणही गावागावात जाऊन महाविकास आघाडी सरकारने अडीच वर्षांत केलेली कामे लोकांना सांगा. सध्या निवडणूका लांबवण्याचा खटाटोप चालला असून महापालिका निवडणुकाही ते घेत नाहीत. कारण कोरोनाकाळात आपण केलेली कामे लोकांना विसरायला लावण्यासाठी आणि स्वतःच्या न केलेल्या योजनांच्या थापा मारण्यासाठी ते विधानसभाही एखाद महिना पुढे ढकलतील.

बांगलादेशमुळे स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित झाले असे सरन्यायाधीश म्हणतात. पण तिथे हुकुमशाही, दडपशाही सुरू होती. तिच्याविरोधात जनता रस्त्यावर उतरली. पंतप्रधान, सरन्यायाधीशांना राजीनामा द्यावा लागला. ही लोकशाही तुम्हाला मान्य आहे का? स्वातंत्र्याचे महत्त्व जाणून घ्यायचे असेल तर भुतकाळात डोकवावे लागेल. भुतकाळात डोकावतो तेव्हा आम्हाला रामशास्त्री प्रभुणे यांची आठवण येते. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससबाबतचा निर्णय येत्या ५०-६० वर्षात नक्कीच मिळाल्याशिवाय राहणार नाही. या जन्मी नाही तर पुढच्या जन्मी आम्हाला नक्की न्यायदेवता पावल्याशिवाय राहणार नाही.

मराठा, ओबीसी, धनगर समाजाला आरक्षण देणार, अशा घोषणा केल्या जात आहेत. समाजा समाजात तेढ निर्माण केली जात आहे. परंतु, आरक्षणाची मर्यादा वाढविण्याचे अधिकार राज्य सरकारला नाही तर केवळ केंद्र सरकारला आहेत. बिहारने वाढवलेली मर्यादा न्यायालयाने उडवून लावली. हा अधिकार लोकसभेचा आहे. राष्ट्रपतीही सर्वोच्च न्यायालयाचा अहवाल, सल्ला घेऊन आरक्षणाची मर्यादा वाढवू शकतात. आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचे बील आणा, आम्ही महाविकास आघाडी म्हणून पाठींबा देऊ.

# बहुमत जाताच मोदींना धर्मनिरपेक्षतेची आठवण

**बाळासाहेब थोरात**



लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या १० वर्षांच्या मनमानीला जनतेने उत्तर दिलेले आहे. लोकसभेतील राहुल गांधी यांच्या पहिल्याच भाषणाने ५६ इंचाच्या छातीला धडकी भरली. राहुल गांधी यांच्या पाठीशी इंडिया आघाडीचे सर्वजण असल्याने तिथे विरोधकांची ताकद लोकसभेत दिसू लागली आहे. नरेंद्र मोदी यांच्या ५६ इंच छातीसह भाजप अजूनही राज्यघटना आणि लोकशाहीवर घाला घालण्याच्या तयारीत आहे. मूठभर लोकांसाठी सत्ता चालवताना भाजप सत्ताधाऱ्यांकडून हा आघात कधीही होऊ शकतो. लोकसभेला धडा शिकवला आहे. आता विधानसभा निवडणुकीला भाजप महायुती सरकार हद्दपार करणे हाच एकमेव उपाय आहे.

लोकसभा निवडणुकीत बहुमत जाताच नरेंद्र मोदी यांना धर्मनिरपेक्षतेची आठवण झाली आहे. लोकसभा निवडणुकीतील धड्यानंतर आता त्यांना धर्मनिरपेक्ष, सेक्युलर शब्द आठवू लागले आहेत. इकडून तिकडून सेक्युलर, धर्मनिरपेक्ष म्हणायला लागलेत. घटना त्यांना नको होती, ती आता त्यावर बोलायला लागले आहेत. त्यामुळे सत्तापरिवर्तन गरजेचे आहे.

राज्यघटना आणि लोकशाही मोडीत काढण्याचा भाजपचा हा प्रकार जनतेला मान्य नाही. कोणी धर्माचे, जातीचे राजकारण करत असेल, तर त्यांना त्यांची जागा जनतेनं लोकसभा निवडणुकीत दाखवून दिली आहे. त्यामुळे त्यांना सेक्युलर शब्दाची आठवण होऊ लागली हे खरंच आहे. पण, त्यांचा हेतू तोच आहे. सत्ता कशी मूठभर लोकांसाठी वापरायची हा भाजपचा हेतू संपलेला नाही. हे लक्षात ठेवूनच विधानसभा निवडणुकांना सामोरे जावे लागणार आहे.

महाराष्ट्राचा आवाज दिल्लीत वाढला आहे, महाराष्ट्राने संसदेत वाघिणी पाठवल्या आहेत, या महिल्या खासदार भाजपा सरकारला धारेवर धरत आहेत. महाराष्ट्रातील वरिष्ठ खासदार सुप्रियाताईंबरोबर आता रजनीताई, प्रियंकाताई, प्रणितीताई, मुंबईतून वर्षाताई, चंद्रपूरमधून प्रतिभाताई धानोरकर, शोभा बच्छाव यांना पाठवले आहे. या सगळ्या वाघिणी आहेत. तिथं लोकसभेत सत्ताधारी कोण आणि विरोधक कोण हेच कळत नाही. सत्ताधाऱ्यांवर हावी होण्याचं काम महाराष्ट्रातील खासदार करत आहेत. जोरदार भाषण ठोकत आहेत. तुटून पडत आहेत. जोरदार ठोकून काढत आहेत. हा इंडिया आघाडीचा आवाज आहे. महाराष्ट्राचा आवाज आहे आणि विधानसभा निवडणुकीला आपल्याला याच एकीनं सामोरं जावं लागणार आहे.

महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत असून, महायुती सरकारने मंत्रालयाला भ्रष्टाचाराचा अड्डा बनवले आहे. या सरकारच्या काळात मुंबईसह महाराष्ट्रातल्या जमिनीदेखील सुरक्षित राहिलेल्या नाहीत. त्या जिरवण्यासाठी गुप्त बैठका सुरू आहेत. जमिनीचे सर्व उद्योग कशासाठी सुरू आहेत, हे जनतेला कळून चुकले आहे. कुर्ला येथील बहुमोल जागा देऊन टाकली. या जागेचा ठराव मंत्रालयात सापडत नाही. चार ओळी काहीतरी लिहून ठेवल्या असून, ती जमीन परत घेण्याची व्यवस्था सरकारने केलेली दिसत नाही. वरळीमधील आरेची जमीनदेखील जिरवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी गुप्त बैठका होत आहेत.

कायदा सुव्यवस्थेचा तर बोजवारा उडाला आहे. आमदार पोलिस ठाण्यात गोळीबार करतो, अंमली पदार्थांचा हैदोस सुरू आहे. धन-दांडग्यांची पोरं गोरगरिबांवर गाड्या घालतात.



## भ्रष्टाचाराचे फुटले पेव एजंटांचा प्रचंड सुळसुळाट

**गद्दार आमदारांनी प्रत्येकी ५० कोटी घेतले आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचे चांगले चाललेले सरकार पाडले. यामागे कोणती शक्ती काम करीत होती हे आता लपून राहिलेले नाही. ते जगजाहीर झाले आहे. आता सत्तेवर असलेल्या ट्रिपल इंजिन सरकारचा एक कलमी कार्यक्रम चालू आहे तो म्हणजे जेवढे हाणता येईल तेवढे हाणा. प्रचंड लुटालूट चालू आहे. भ्रष्टाचार तर इतका बोकाळला आहे की एकही पाईल मंत्र्याला पैसे दिल्याशिवाय सही होत नाही. मंत्रीमंडळात तर कुणाचा कुणाला पायपोस नाही. प्रत्येकजण मनमानी पद्धतीने काम करतो आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा कोणावरही वचक राहिलेला नाही. त्यामुळे आमदारही हव्या त्या कागदावर पाहिजे त्या पद्धतीने सह्या करून घेताहेत. परिणामी अदिकाऱ्यांना काम करणे अशक्य झाले आहे. अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी आता बोली लावली जाते आहे आणि जो सर्वाधिक बोली लावेल त्याला मलिद्याच्या जागा मिळत आहेत. साहजिकच नेमणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर रकमा दिल्यामुळे त्या लवकर लवकर वसूल करण्याकडे अधिकाऱ्यांचा ओढा आहे. त्यामुळे सामान्य व गोरगरीब माणूस भ्रष्टाचाराच्या चरकात पिळला जातो आहे. हे शोषण थांबविण्यासाठी महायुतीचे भ्रष्ट, दळभद्री सरकार तातडीने आपल्याला या विधानसभा निवडणुकीत बदलावे लागेल. त्यासाठी एकजुटीने आपण सारेजण कामाला लागू या.**

त्यांना वाचवण्यासाठी हे सत्ताधारी जात आहेत. बदल्यांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार सुरू आहे. विधानसभा निवडणुकीसाठी पैसा उभा करण्याचा घाट या बेकायदेशीर सरकारने घातला असून, त्यासाठी लाडकी बहिणीच्या नावाखाली लाडकी सत्ता हा उद्योग सुरू आहे. अतिरेक झाला आहे. या सर्व भ्रष्टाचाराचे केंद्र मंत्रालय बनले आहे. त्यासाठी सरकार बदलणे हाच यावरील उपाय आहे.

आगामी काळातही घटनेवर आणि लोकशाहीवर आघात होण्याची शक्यता असून, भाजपचा हा हेतू विसरू नका. लोकसभेपेक्षा जादा ताकद लोक आपल्याला विधानसभा निवडणुकीत देण्यासाठी तयार आहेत. पण, त्यांच्यासमोर आपल्याला चांगल्या पद्धतीनं जावं लागणार आहे. कारण, अहंकारी सत्ता लोकांना बुडवायची आहे. लोकसभेला लोकांनी ते दाखवून दिलं. आता बेकायदेशीर सरकार जनतेला बुडवायचं आहे. ती जबाबदारी स्वत: जनतेनं घेतली आहे. महायुती सरकार जनतेला मान्य नाही. लोकसभेच्या विजयाने महाराष्ट्रात चैतन्याचे वातावरण आहे. राज्यातील बेकायदेशीर सरकार घरी बसवण्याची जनतेची भावना आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फुटीनंतर राज्यात एक घोषणा गाजली होती. 'पन्नास खोके, एकदम ओके'. ही घोषणा आजही गावाकडच्या पारांवर घुमते आहे. या सरकारची आजही तीच अवस्था आहे. बेकायदेशीर आणि राजकीय नैतिकदृष्ट्या सत्तेत येण्यासाठी भाजपने केलेले फोडाफोडीचे राजकारण जनतेला आवडलेले नाही. हे जनता अजून विसरलेली नाही. खरी राष्ट्रवादी आणि शिवसेना कोण हे जनतेने लोकसभेला दाखवून दिले आहे. महायुती सरकारचे घोटाळे उघड करताना महाविकास आघाडी सरकारने पहिल्याच आठवड्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली हे सांगा. मविआच्या चांगल्या कामांची माहिती जनतेला सांगा आणि आपले सरकार आणण्यासाठी जोमाने प्रयत्न करा.

महाविकास आघाडीची ही सभा अनेक दिवसांपासून घेण्याचे प्रयत्न सुरु होते. मात्र सरकार निवडणूक कधी घेणार हे स्पष्ट करत नव्हते. आज देखील निवडणूक आयोग जाहीर करणार आहे ती सुद्धा हरियाणा आणि इतर राज्यांची जाहीर होणार आहे. महाराष्ट्राची निवडणूक जाहीर केली जाणार नाही. कारण महाराष्ट्र सरकार घाबरलेलं सरकार आहे. त्यांना निवडणूकीची भीती आहे. यांचं सरकार सत्तेवर आल्यानंतर राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका घ्यायला

# महाराष्ट्रातलं सरकार महाविकास आघाडीचेच येईल

**जयंत पाटील**



देखील हे घाबरले. मागच्या दीड वर्षांमध्ये जो यांनी कारभार केलेला आहे. त्यामुळे जनतेच्या लक्षात आले आहे की काय प्रकारचं काम हे लोक करत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या लोकांनीच लोकसभेमध्ये यांना मोठा धक्का दिला आहे. यांना आता निवडणूका ऑक्टोबरमध्ये घेण्याचं धाडस होणार नाही. म्हणून निवडणूक आयोग दिवाळी झाल्यानंतरच निवडणूक जाहीर करेल आणि तेव्हाच हे समोरे जातील. त्याच्या आधी निवडणूका घेण्याची ताकद नाही.

सरकार निवडणूक कधी घेणार याचा अंदाज येत नव्हता. आज निवडणूक आयोग पत्रकारांसमोर हरियाणा आणि झारखंडची निवडणूक जाहीर करतील. महाराष्ट्र सरकार घाबरणारं सरकार आहे. यांना निवडणुकांची भीती वाटतेय. लोकसभेत महाराष्ट्राच्या जनतेनं त्यांना मोठा धक्का दिलाय. यांना आता ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेण्याचं धाडस होणार नाही. त्यामुळे दिवाळीनंतरच हे निवडणुका घेतील. १५-२० नोव्हेंबरदरम्यान निवडणुका घेतील असा माझा अंदाज आहे. हे निवडणूका लवकर घेणार नाहीत. कारण लोकांनी लोकसभेमध्ये मोठा धक्का दिला आहे. ४०० पारचा नारा देणारे २४० वर थांबले. २४० वर गाडी थांबल्यावर दोघांचे टेकू घेतले. एक बिहारचा टेकू आणि एक आंध्रप्रदेशचा टेकू घेतला. पण हे दोन टेकू पलटी मारण्यात बहाद्दर आहेत की यांचं दिल्लीचं सरकार कधी खाली येईल सांगता येत नाही. यांचा सहा महिने किंवा वर्ष एवढाच विषय राहिलेला आहे. म्हणून लाल किल्ल्यावरुन भाषण करताना सेक्युलर सिव्हिलकोड शब्द वापरायला लागला, यातचं तुमची हार समोर आली. मागच्या दहा वर्षापासून जो तुम्ही टेंभा मिरवला भारतात त्यात सेक्युलर शब्द वापरत नव्हता. पण आता ह्यांच्या लक्षात आलं की भारत तुम्हाला सहजासहजी चालू देणार नाही.

आता मी यापुढे न वाचता फायलींवर सह्या करणार नाही, असे राज्याच्या अर्थमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे. याचा अर्थ आधी न वाचता सह्या झाल्या आहेत. त्यांचा स्वभाव असा नव्हता. पण परिस्थितीमुळे तसा झाला. राज्याचा अर्थसचिव प्रत्येक फाईलवर लिहितोय की काहीही मागण्या पाठवू नका. मिळणार नाही. सगळे पैसे एकाच योजनेसाठी वळवण्याची गरज आहे.

राज्य सरकारकडून वेगवेगळ्या विकासकामांसाठी राबवल्या जाणाऱ्या टेंडर प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार होत आहे. १३ ऑगस्टला महाराष्ट्र मंत्रिमंडळानं एक निर्णय घेतला. ६ हजार किलोमीटरचे रस्ते आता बांधायला मंजुरी दिली. कोणतं महामंडळ रस्ते बांधणार आहे? तर महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉपोरेशन. मी आरोप केला होता की विधानभवनाच्या इमारतीसमोर एका इमारतीत या महामंडळाचं

कार्यालय आहे. तिथे एक अधिकारी आणि त्याचे दोन-तीन पीए आहेत. त्याशिवाय त्याच्याकडे दुसरं कोणतंही इन्फ्रास्ट्रक्चर नाही. पण त्या महामंडळाकडे ३७ हजार कोटींचे रस्ते बांधण्याची जबाबदारी दिली आहे. फक्त टक्केवारी घेऊन काम देणं हा उद्योग करणारं हे महामंडळ आहे.

लोकसभा निवडणुकीआधी या सरकारने ९० हजार कोटींच्या रस्त्यांचे टेंडर काढले. जालन्यातून नांदेडला जाणारा रस्ता. ११ हजार कोटींचा अंदाजित खर्च आहे. पण टेंडर जातंय १५ हजार कोटींना. एका किलोमीटरला खर्च येतोय ८३ कोटी. अलिबागहून वसई-विरारला पोहोचायला ९६ किलोमीटरचं कॉरिडोअर बांधणार आहेत. २० हजार कोटींचा अंदाजित खर्च आहे. २६ हजार कोटींना टेंडर चालू आहे. एका किलोमीटरचा



खर्च २७३ कोटी रुपये असेल. चंद्रावर ३ लाख ८५ हजार किलोमीटरवर चंद्र आहे. नाना पटोलेंना माहिती असेल चंद्र कुठे आहे. तिथे आपलं चांद्रयान फक्त ६०० कोटींमध्ये गेलं. पण अलिबागहून वसई-विरारला जायला जो रस्ता होणार आहे, त्यावरून फक्त ३ किलोमीटर जरी गेलात तरी ६०० कोटी संपतील.

राज्यातल्या हिंदू देवस्थानांच्या जमिनी सरकारी पक्षातील नेत्यांनी लुटल्या आहेत. महाराष्ट्र सरकार घाबरणारे सरकार आहे. यांना निवडणुकांची भीती वाटते आहे. लोकसभेत महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना मोठा धक्का दिल्याने यांना आता ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेण्याचे धाडस होणार नाही. महाराष्ट्रात हिंदू देवस्थानाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळेपासून वेगवेगळ्या देवस्थानाला जमिनी देण्यात आल्या होत्या. भारतीय जनता पक्षाच्या एक दोन आमदारांनी या जमिनी लुटल्या. जमिनी काढल्या आणि आपल्या नावावर केल्या. महाराष्ट्राच्या विधानसभेत हा मुद्दा मांडला त्यावेळी महसूल मंत्र्यांनी उत्तर दिलं, की दोन महिन्यात आपण चौकशी करु. दोन महिने नाही तर दोन वर्षे झाली तर अजून चौकशी झाली नाही. १३ तारखेला महाराष्ट्राच्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये यावर निर्णय झाला. ५ टक्के नजराना भरून या जमिनी वर्ग २ च्या १ करा. मात्र, या जमिनी त्यांनी विकल्या आहेत. त्यावर आता इमारती उभ्या झाल्या आहेत. म्हणजे महाराष्ट्रामध्ये हिंदू देवस्थानाच्या जमिनी लुटण्याचं पाप भाजप सरकारने केलं आहे.

विधानसभा निवडणुका आता येणार आहे. आपण एकत्र राहिले तर हे सरकार आपलेच असणार आहे. साताऱ्यात पिपाणीला ३७ हजार मते गेली, त्यामुळे आमची जागा गेली. मुंबईतील आमची जागा चोरली. विधानसभेचे काम आपण सुरु केले आहे. त्यामुळे ही निवडणूक प्रतिष्ठेची आणि महत्वाची आहे. उद्धव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे सर्वांनी एकत्र राहून काम करणे गरजेचे आहे.

लोकसभेमध्ये भाजपचा पराभव करुन महाराष्ट्राच्या जनतेची भावना समोर आणली आहे. आता दोन महिन्यांमध्ये विधानसभेच्या निवडणूका होतील, आता योग्यवेळी आपण सर्व पक्ष एकत्र आलो आहेत. आपण सगळे एकदिलानं आणि एकमुखानं राहिलो तर महाराष्ट्रातलं सरकार महाविकास आघाडीचं येईल ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. तुम्ही काही चिंता करु नका, पण एकमेकांना सहाय्य करणं आणि आपला महाविकास आघाडीचा उमेदवार विजयी कसा होईल यासाठी प्रयत्न करणं गरजेचे आहे. आजपासून आपण कामाला लागू.

■■

# लोकसभेच्या निकालानंतर बहिणी आठवायला लागल्या

## सुप्रिया सुळे यांचा टोला

लोकसभेच्या निकालानंतर त्यांना बहिणी आठवायला लागल्या. तोपर्यंत कुणालाही त्यांची बहीण आठवली नाही. पण, दुर्दैव एका गोष्टीचे वाटते की, बहिणीचे नाते हे आमच्या भावांना कळलेच नाही. मतदान केले नाही तर लाडकी बहीण योजनेतून दिलेले पैसे परत काढून घेऊ, अशी विधाने सत्तेतील पक्षाचे नेते करीत आहेत. यांचे बहिणीशी नाते प्रेमाचे नसून मतांशी जोडलेले आहे. डिसेंबरमध्ये किती बूथवर किती महिलांची मते मिळाली, हे पाहून लाडकी बहीण योजनेचे पुढचे पैसे दिले जाणार आहेत. या सरकारमधल्यांना प्रेमातले आणि पैशातले अंतरच कळले नाही. एक बहीण गेली तर हरकत नाही. आपण दुसऱ्या बहिणी आणू. १५०० रुपयांमध्ये विकत घेता येईल, इतके हे नाते विकाऊ नाही. हा आमच्या नात्याचा अपमान आहे. निरागस बहीण-भावाच्या नात्याला किंमत लावण्याचे पाप या सरकारने केले. महायुती सरकारने त्यांच्या गलिच्छ राजकारणात नातीही ओढली आहेत.

लोकसभा निवडणुकीतील यशानंतरही मूळ पक्ष आणि त्याच्या चिन्हासाठीची न्यायालयीन लढाई चालूच राहील. ही न्यायालयीन लढाई बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यासाठीची आहे. मशाल आणि तुतारीला जनतेने आशीर्वाद दिलाच आहे. पण ही तत्त्वांची लढाई आहे. त्यामुळे ही हक्काची लढाई आम्ही शेवटपर्यंत लढत राहू. शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये, असे म्हणतात. पण आम्ही थेट सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढली आहे. सोबतच या न्यायालयीन लढ्यात ठाकरे गटाचे नेते अनिल परब आणि अनिल देसाई हे उत्तम कार्य करत आहेत.

उद्धव ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांचे उत्तराधिकारी आहेत. बाळासाहेब ठाकरे यांना दुखविण्याचा काम या लोकांनी केलं आहे. उद्धवजी बहीण म्हणून मी तुम्हाला शब्द देते, सर्वोच्च न्यायालयाची लढाई आम्ही अर्धवट सोडणार नाही. उद्धवजी प्रेमाचे नातं कधीही तुटणार नाही. सेना ही कधीही वेगळी आहे हे असं वाटलं नाही. खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आपण काम केले आहे. आपण पुन्हा आपलं सरकार आणू.

मी जाहीरपणे उद्धव ठाकरे, राहुल गांधी, सोनिया गांधी यांचे मनःपूर्वक आभार मानते. लोकसभेला आपण आम्हाला जी काही मदत केली त्यामुळे आम्ही सगळे जे निवडून आलो आहोत. त्यात प्रत्येक पक्षाचे खूप मोठे योगदान आहे. आज जेव्हा पार्लमेंटमध्ये आम्ही बसतो तेव्हा सर्वात मोठा आवाज संसदेत महाविकास आघाडीकडून कोणाचा असतो तर तो वर्षाताई यांचा असतो. ही आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे.

पत्रकार मला अनेक वेळा विचारतात की, दिल्ली कशी आहे? मी म्हणते, दिल्ली की हवा बहुत बदल गई है. कारण आम्ही जरी विरोधात असलो तरी आम्ही असे वागतो जसं आम्हीच सत्तेत आहोत. जे शपथ घेऊन सत्तेत बसलेले आहेत ते हारून मंत्री झाल्यासारखे दुःखी होऊन बसतात. त्यामुळे दिल्लीतले वातावरण खूप बदलले आहे. आता आपल्याला







महाराष्ट्रातलं वातावरण बदलायचे आहे. नुसते वातावरण नाही तर सरकार बदलायचे आहे. ही मोठी जबाबदारी आपल्याला सर्वांना पार पाडायची आहे.

मी विनंती करते की, तुम्ही जो काही निर्णय घ्याल? कोणाला तिकीट द्यायचे ते द्या. पण, लवकरात लवकर जागावाटप निश्चित करा. सर्वांच्याच यात्रा सुरू झालेल्या आहेत. यात्रेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मी आणि अमोल दादा ज्या दिवशी निवडून आलो. तेव्हा आमच्याकडे काहीच राहिले नव्हते. तरी आम्ही प्रचार केला. अडचणी आणि संघर्षाच्या काळात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांचा पक्ष आमच्या बाजूने उभा राहिला त्याला आम्ही कधीच विसरणार नाही. आत्ता जेव्हा प्रचाराची वेळ आहे तेव्हा ३१ खासदारांच्या वतीने मी तुम्हाला विश्वास देऊ इच्छिते की, कष्टांची परिकाष्टा जी तुम्ही आमच्यासाठी केली त्यापेक्षा ३१ खासदार मिळून आम्ही जास्त कष्ट करू आणि जास्तीत जास्त आमदार निवडून येण्यासाठी प्रयत्न करू, महाराष्ट्रातील एक स्वाभिमानी, दिल्लीच्या समोर न झुकणारं सरकार आणण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. आपण पुन्हा आपलं सरकार आपलं आणू

■■

Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by
MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2
CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

राज्यातील मंत्रीच भडक भाषणे करीत आहेत. जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या ठिकाणी झालेल्या दंगलींमागे अदृश्य शक्ती कार्यरत आहेत. त्यामुळे या दंगलींची पारदर्शीपणे चौकशी केली पाहिजे. पैशाने सर्वकाही विकत घेता येत नाही. बँकेत पैसे आल्यास ते तातडीने काढून घ्या. कारण, अर्ध्या बँका बुडाल्या आहेत. राज्यात आपले सरकार आल्यानंतर सध्याची लाडकी बहीण योजना अधिक बळकट केली जाईल हे मी आज इथे ठामपणे सांगत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ६५ दिवसांचा कालावधी बाकी आहे. महाविकास आघाडीचे सरकार राज्यात येणार आहे. राज्यात सरकार आल्यानंतर सर्वप्रथम शेती व त्यासोबत निगडित वस्तूंवरील 'जीएसटी' हटविण्यात येईल.

पहिला भाजप सुसंस्कृत होता. आता नवीन भाजपने गलिच्छ राजकरण केलं आहे. महाराष्ट्र संविधानाने चालतो, कोणाच्याही मनमानीने चालत नाही. सत्ता, पैसा पद या गोष्टी येतात आणि जातात. शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव दिला पाहिजे. आशा स्वयंसेवक महिलांना पाच हजार देतो म्हणाले होते, अद्याप त्यांना पैसे दिले नाहीत. येत्या पाच दिवसात जर आशा वर्कर महिलांना पाच हजार रुपये मिळाले नाहीत तर मी आंदोलन करणार आहे.

भाजपने आपला पक्ष भ्रष्टाचारमुक्त केला असून, तुरुंगात जाणारे सत्तेत गेले. हे सरकार खोक्यांचे आहे. ५० खोके घेऊन हे सरकार तयार झाले आहे. ते पैशाने विकले गेले असतील. पण महाराष्ट्रातील जनता स्वाभिमानी आहे. मी माझं काम पारदर्शकपणे लोकांसमोर ठेवलं. आपल्याकडे ईडी, सीबीआय असली भानगड नाही. या सरकारनं लाडकी बहिण योजनेच्या जाहिरातीसाठी २०० कोटी रुपये खर्च केले आहेत. राज्यातलं सरकार हे स्वार्थी सरकार आहे. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर तुमचा पाण्याचा प्रश्न सोडवू. आपल्या राज्यात आलेला रोजगार दुसऱ्या राज्यात नेला जातो. आपल्या राज्यातील उद्योग व्यवसाय हे परराज्यात जात आहेत.

आता अनेकजण माफी मागत आहेत, पण माफी मागणाऱ्यापेक्षा माफ करणारा हा मनाने मोठा असतो. पण माफी मागणारे स्वतःची चूक मान्य करत असतील ते कोर्टातील केस मागे घेणार का? सध्या न्यायालयात सुरु असलेली लढाई ही फक्त पक्ष आणि चिन्हाची नाही तर ती नैतिकतेची लढाई आहे. कारण पक्ष आणि चिन्ह ओरबाडून घेणे हा आदरणीय पवार साहेब आणि उद्धवजींचा घात आहे. मी भावासोबत गेले असते तर केंद्रात मंत्री झाले असते. पण मी माझ्या ८० वर्षाच्या स्वाभिमानी वडिलांसोबत उभी राहिले याचा मला अभिमान



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी १९ ऑगस्ट रोजी नाशिक जिल्ह्यातील चांदवड तसेच जळगाव जिल्ह्यातील जळगाव, पारोळा येथे झालेल्या पक्षाच्या महिला व पदाधिकारी मेळाव्यात उपस्थितांना केलेले मार्गदर्शन...**

आहे. महिलांना सत्तेपेक्षा स्वाभिमान जास्त महत्वाचा असतो.

एक देश एक निवडणुकीचा नारा देणारे सरकार महाराष्ट्रातील निवडणुका पुढे ढकलत आहे. याचा अर्थ सरकार डर रही है, कारण राज्यातील महायुतीचे नेते निष्क्रिय असल्यामुळेच प्रधानमंत्र्यांना महाराष्ट्रात यावे लागत आहे. असे असेल तर तो महाविकास आघाडीचा विजय आहे. दोन पक्ष फोडण्याचे देवेंद्र फडणवीस यांना कौतुक वाटत असेल तर ते दुर्दैवी आहे. मी पक्षाकडे खासदारकीचे तिकीट सोडून काहीही मागत नव्हते कारण संसदेत पहिला नंबर येत असल्यामुळे मी मेरिटवर खासदारकीचे तिकिट मागितले, तर तो गुन्हा आहे का?

मी कष्टाची परिकाष्टा करेन आणि सत्याच्या मार्गाने चालेन पण कधीही दिल्ली समोर मुजरा करणार नाही. देशातील जनता खोकेवाली नाही, तर इमानदार आणि प्रामाणिक आहे, हे त्यांनी लोकसभा निकालात दाखवून दिले आहे. त्यामुळं आता पुढील ९० दिवस आपल्याला स्वाभिमानासाठी लढायचे आहे. आपली सत्ता आल्यानंतर महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री पहिला निर्णय हा शेतकऱ्यांच्या हमीभावासंबंधीचा घेईल.

शिक्षण संस्थांच्या कार्यक्रमाला जाताना मला खूप गंमत वाटते. कारण माझी मार्कशिट तुम्ही बघितलेली नाही. अनेक कुटुंबांनी योगदान दिलं म्हणून हे रोपटं मोठ झालं. ज्या दिवशी रिझल्ट येतो त्या दिवशी मी उलटी गिनती सुरू करते. माझ्या पहिल्या इलेक्शनमध्ये मोबाईल होता. पण एवढं नव्हत. तंत्रज्ञानाचा उपयोग इलेक्शनमध्ये आता मोठ्या प्रमाणात होतोय. थ्रीडी पद्धतीने आम्ही नेत्यांचे भाषण सादर केले. पोलीस भरतीसाठी आलेली मुलंमुली फूटपाथवर झोपल्याचे आज बातम्यांमध्ये बघितलं. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनासाठी असायला हवं.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा वाढते आहे का? मला अनेकदा भीती वाटत होती की, संपूर्ण देश राईटिस्ट होतो की काय?



# महिलांना सत्तेपेक्षा स्वाभिमान जास्त महत्वाचा

**सुप्रिया सुळे**



मला जर कोणी म्हणाले की पुन्हा खासदार होण्यासाठी पांडुरंगाला साकडं घाला. तर मी म्हणेल एवढ्यासाठी कशाला पांडुरंगाला त्रास देऊ? मी मेहनत करेन. मी कधीच जय श्री राम म्हणत नाही. मी नेहमी मर्यादा पुरुषोत्तम राम म्हणते.

मनुस्मृती शालेय अभ्यासक्रमात आणू, असं मध्ये म्हणत होते. बाबासाहेबांच्या संविधानात हे बसत नाही. संविधानात नसलेली मनुस्मृती तुम्ही शिक्षणात लादणार असाल तर आम्ही टोकाचा विरोध करू. सरकारी नोकरी कॉन्ट्रॅक्टवर होता कामा नये. जे आहे ते चालू ठेवा एवढीच आमची सरकारला विनंती आहे. आम्ही यावेळी खूप संघर्ष केला. चिन्हं नव्हतं, पक्ष नव्हता, पण आम्ही संघर्ष केला आणि तुम्ही बघता महाराष्ट्रात काय झालं. नवीन शैक्षणिक धोरण आल्यावर मी तत्कालीन केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांचे अभिनंदन केले. १५०० रुपये देत आहेत, त्याचं स्वागत, पण त्याच्या बरोबर आलेली धमकी मान्य नाही. पैसे पण द्यायचे आणि धमकी पण द्यायची हे मान्य नाही.

पवार कुटुंबातील पहिली व्यक्ती इंग्रजीत शिकली ती म्हणजे मी. मराठी भाषेला केंद्राने अभिजात भाषेचा दर्जा द्यायला हवा. मराठी भाषेसाठी चर्चा झालीच पाहिजे. मराठी भाषा फक्त भाषा दिन साजरी करून संपत नाही. प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिक्षणासाठी हवी. हे कधी रडीचा डाव खेळतील माहिती नाही, पण निवडणुका झाल्यानंतर आपल्या विचारांचा मुख्यमंत्री बसल्यानंतर मराठी शाळेसाठी काम करणार. पवित्र पोर्टल बंद करून टाका आणि पारदर्शक शिक्षण द्या. एआयचा सर्व्हे आला की हा व्यक्ती राज्याचा मुख्यमंत्री होईल. पण एआय नाही तर तुम्ही ठरवणार. मला कोणाचा मोबाईलनंबर पाठ नाही. शिक्षकाची जागा कधीही एआय घेऊ शकणार नाही. अंमळनेर या मतदारसंघातून पाच वर्षांपूर्वी एक आमदार



तुम्ही निवडून दिला होता त्याबद्दल मी तुमचे आभार मानते. प्रत्येकाच्या आयुष्यात वेगवेगळ्या घटना घडत असतात. तशा माझ्या आयुष्यातही घडल्या आहेत. माझा काळ मी बदलू शकत नाही. आमच्या घरात मुलं आणि मुलींमध्ये कधी अंतर नव्हतं, अशा पुरोगामी कुटुंबामध्ये मी जन्माला आले आहे.

वडीलधाऱ्या माणसांचा मान सन्मान करायचा, कधीकधी एक पाऊल मागे घेतलं. फार जबाबदाऱ्या घेतल्या नाही. वडिलांच्या जागेवर काम करायचा निर्णय झाला. यानंतर आमच्या आयुष्यात एक वादळ आलं. एक अदृश्य शक्ती आली आणि अदृश्य शक्तीला आमचं सुख काय बघवलं गेले नाही आणि या अदृश्य शक्तीने आमचं घर उद्धवस्त केलं. घर म्हणजे पवार कुटुंब नाही, तर राष्ट्रवादी पक्ष उद्धवस्त करण्याचा पाप या अदृश्य शक्तीने केले आहे.

आमचा पक्ष उद्धवस्त झाला. त्यावेळी तुम्ही माझ्या जागी असता तर काय केलं असतं? तुम्ही रडल्या असत्या की लढल्या असत्या? मला माझी भगिनी रडायला शिकवत नाही. लढायला शिकवते आणि म्हणून मी लढत आहे. आज माझ्यावर अनेक लोक टीका करतात. कारण मी कोणत्याही कॉन्ट्रॅक्टमधले पैसे खाल्ले नाहीत. मी कुणाच्या पाच पैशाची मिंधी नाही. राजकारणात पैसे कमवायला नाही, तर काहीतरी बदल घडवायला आली आहे. राज्यात गलिच्छ राजकारण सध्या सुरू आहे. ते आपल्याला बदलयाचं आहे.

त्यांना वाटतं पैसे वाटले की लोक विकत घेता येतात. पन्नास खोके आणि एकदम ओके. ते माझ्यावर टीका करू शकतात, त्यांच्या अधिकार आहे. मात्र मी टीका केली की ते मला भीती दाखवतात. मी नाही घाबरत. सत्यमेव जयते. कारण विजय हा सत्याचाच होत. सत्य परेशान हो सकता है. सत्य पराजित नही हो सकता.

५ ऑगस्टला बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांना पळून जावं लागेल, याची आधी कोणीही कल्पना केलेली नव्हती. याचा अंदाज शेख हसीना आणि त्यांच्या गुप्तचर यंत्रणेला आला नव्हता. भारतीय, अमेरिकन व इतर देशाच्या गुप्तचर यंत्रणेला देखील बांगलादेशातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे पंतप्रधानाला सत्ता आणि देश सोडून भारतात जावं लागेल याचा अंदाजही आला नव्हता. बांगलादेशात असं काही होऊं शकेल याची कुठल्याही पत्रकारांनी कल्पना देखील केली नव्हती. मागच्या अंकात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबद्दल मी सविस्तर लिहिलेलं. अंक छापायला गेल्यानंतर शेख हसीना यांना पळून जाऊन भारतात आश्रय घ्यावा लागला. बांगलादेशात १९७५ मध्ये काय होईल याचा तेव्हा भारताला अंदाज आलेला. १९७५ च्या जून महिन्यात भारताचे रिसर्च अँड ॲनालिसीस विंगचे (रॉ) प्रमुख आर.एन. काव ढाका येथे बांगलादेशचे तेव्हाचे पंतप्रधान मुजीबुर रेहमान यांना भेटलेले. तेव्हा त्यांनी तुमच्या विरोधात बंडाचे कारस्थान होत आहे, अशी माहिती देऊन आवश्यक पावले उचलण्याची सूचना केलेली. त्या कारस्थानात लष्कराचे कुठले अधिकारी सहभागी आहेत त्याची देखील सविस्तर माहिती काव यांनी दिलेली. मुजीबुर रेहमान यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. शेवटी १५ ऑगस्ट १९७५ ला मुजीबुर रेहमान आणि त्यांच्या कुटुंबातील अनेकांची हत्या करून लष्कराने सत्ता काबीज केलेली. शेख हसीना तेव्हा बांगलादेशात

जतीन देसाई

# बांगलादेशातील परिस्थिती चिंताजनक



नसल्याने वाचलेल्या.

गेल्या १०-१२ वर्षांपासून शेख हसीना यांच्या विरोधात बांगलादेशात हळूहळू वातावरण निर्माण होत गेलेलं. निवडणुकांचा निकाल आपल्याच बाजूने लागेल त्यासाठी सत्तेचा त्या मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करतात असा आरोप त्यांच्यावर गेल्या अनेक वर्षांपासून होत होता आणि त्यात तथ्यही आहे. माध्यमांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण आणलं गेलं. शाहीदुल आलम नावाच्या प्रसिद्ध फोटोग्राफरची ५ ऑगस्ट २०१८ ला धरपकड करण्यात आली होती. सुरक्षित रस्ते पाहिजे, या मागणीसाठी सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे त्याने घेतलेले फोटो जगभर प्रसिद्ध होत होते. अल जझीराला दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी म्हटलेलं की विद्यार्थ्यांचे आंदोलन रस्त्यांच्या पुरते मर्यादित नसून ते व्यापक आहे. माध्यमांवर नियंत्रण आणण्यात आलं आहे. विरोधकांना तुरुंगात टाकण्यात येत आहे. अनेकांची हत्या करण्यात येत आहे. या मुलाखतीवरून शाहीदुल यांना पकडण्यात आलं. १०७ दिवसानंतर बांगलादेशाच्या उच्च न्यायालयाने त्याला जामीनवर सोडलं. जगभरातल्या पत्रकार आणि मानवाधिकाराच्या प्रश्नावर काम करणाऱ्या संघटनांनी तसेच नोबेल पुरस्कार विजेत्याने शाहीदुल यांना मुक्त करण्याची मागणी केली होती. मुंबई प्रेस क्लबने २०१९ मध्ये त्याचा मुंबईत सत्कार केलेला.

बांगलादेशात आता नवीन सरकार अस्तित्वात आलं



आहे. नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार आहेत. एका महिन्याहून अधिक काळ झाला असला तरी संपूर्ण परिस्थितीवर त्यांच नियंत्रण नाही. हिंदू व अन्य अल्पसंख्याकाच्या प्रतिनिधीमंडळाला ते भेटले. हिंदू मंदिरात देखील ते जाऊन आले. हिंदूंना सुरक्षिततेची त्यांनी हमी दिली. मात्र, अजूनही हिंदू व इतर अल्पसंख्याकांच्या मनात भीती आहे. भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींशी मोहम्मद युनूस फोनवर बोलले. हिंदू व अन्य अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचं त्यांनी आश्वासन दिलं. शहरांतील परिस्थितीत सुधारणा झाली आहे पण ग्रामीण भागातील परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. भारताच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रत्येक गोष्टीसाठी भारताला दोष देण्याची सुरुवात झाली आहे. अलीकडे आलेल्या पुरासाठी भारत सरकार जबाबदार असल्याचा आरोप बांगलादेश सरकार आणि तिथल्या माध्यमानी केला आहे. या पुरामुळे बांगलादेशाच्या नोआखली, कोमिला, फेनी, चटोग्राम, मौलवीबाझार इत्यादी जिल्ह्यात प्रचंड नुकसान झालं आहे. भारताने बांगलादेशला न सांगता त्रिपुरा येथील डंबर धरणाचे पाणी अचानक सोडल्यामुळे बांगलादेशात पूर आल्याचा आरोप करण्यात आला. भारताच्या त्रिपुरात देखील पुरामुळे मोठं नुकसान झालं आहे. १९ ऑगस्टपासून त्रिपुरात प्रचंड पाऊस सुरु झालेला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत पत्रकार-परिषद घेऊन बांगलादेशचा आरोप नाकारला. पण एकदा अविश्वासाचं वातावरण निर्माण झाल्यानंतर किंवा इतर राष्ट्राबद्दल द्वेष निर्माण करण्यासाठी लहान मोठ्या प्रत्येक गोष्टीवर आरोप केला जातो. आरोप करताना वस्तुस्थितीचा विचार केला जात नाही.

शेख हसीना आणि अवामी लीगच्या विरोधात आज बांगलादेशात प्रचंड संताप आहे. जानेवारीत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत शेख हसीना सलग चौथ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आल्या. प्रमुख विरोधी पक्ष बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टी (बीएनपी) आणि जमात-ए-इस्लामीने निवडणुकांचा बहिष्कार केलेला. जून महिन्यात उच्च न्यायालयाने स्वातंत्र्य सैनिकांच्या










भारताने त्रिपुरा येथील डंबर धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे बांगला देशात पूर आला असा आरोप बांगला देशाने केला आहे.

वारसदारांना सरकारी नोकऱ्यात देण्यात येणारं आरक्षण परत सुरू करण्याचा आदेश दिला. त्याच्या विरोधात विद्यार्थ्यांनी जुलैपासून आंदोलन सुरू केले. सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांना सरकारी नोकऱ्यात देण्यात येणार ३० टक्के आरक्षण कमी करून पाच टक्के करण्याचा आदेश दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांचं आंदोलन संपेल, असा



डॉ. ए.एस.एम. मकसूद कमल
कुलगुरू, ढाका विद्यापीठ





ओबेदुल हसन
मुख्य न्यायमूर्ती,बांगलादेश

अंदाज सर्वत्र व्यक्त करण्यात आलेला. मात्र तसं झालं नाही. शेख हसीना यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला गंभीरतेने घेतले नव्हते. किंबहुना आंदोलन आणि विद्यार्थी नेत्यांची त्यांनी टीका केली. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की पहिल्यांदा शेख हसीना १९९६ मध्ये पंतप्रधान म्हणून निवडून आल्या. १९९६ ते २००१ आणि त्यानंतर २००९ ते २०१४ पर्यंत त्यांचा कारभार अतिशय चांगला होता. बऱ्यापैकी लोकशाही स्थापित झालेली. बांगलादेशाचा आर्थिक विकास होत होता. मात्र २०१४ नंतर शेख हसीना यांच्या कार्यपद्धतीत बदल झाला. बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीने जानेवारी महिन्याच्या निवडणुकीचा बहिष्कार केला होता. बांगलादेशची वाटचाल एकपक्षीय लोकशाहीच्या दिशेने सुरू झालेली. लोकशाही मार्गाने निवडून आल्यानंतर हुकूमशाही वृत्तीने वागणाऱ्या सर्व नेत्यांनी बांगलादेशातून धडा घेतला पाहिजे.

विरोधी पक्ष संपवले असल्यामुळे २०१४ नंतर शेख हसीना यांना प्रश्न विचारणारे लोकही कमी झाले. दहशतवादी संघटनावर त्यांनी कारवाई केली. त्यांच्या सुरुवातीच्या काळात बांगलादेशनी लक्षणीय आर्थिक विकास केला. तयार कपडा (गारमेंट) व्यवसायात बांगलादेश खूप पुढे गेला आणि मोठ्या प्रमाणात निर्यात करायची सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय बाजारात बांगलादेशाच्या तयार कपड्याची मागणी वाढली. त्यामुळे दरडोई उत्पन्नही वाढलं. यादरम्यान लोकांवर अत्याचार वाढले. विरोधकांचा आवाज दाबण्यात आला. सरकारच्या विरोधात लिहिणाऱ्या काही पत्रकारांना तुरुंगात टाकण्यात आले. माजी पंतप्रधान आणि बीएनपीच्या नेत्या बेगम खालेदा झिया यांना तुरुंगात टाकण्यात आले. नंतर त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. आता नवीन सरकारने खालेदा झिया यांना मुक्त केलं आहे. खालेदा झिया आणि त्यांच्या पक्षाच्या इतर नेत्यांनी पाण्याच्या प्रश्नावरून भारतावर टीका करायला सुरुवात केली आहे. आता तर बीएनपी यांनी शेख हसीना यांचे प्रत्यार्पण करण्याची मागणी केली आहे. बांगलादेशात शेख हसीनाच्या विरोधात हत्या, नरसंहार, अपहरण सारखे ५० हून अधिक खटले भरण्यात आले आहेत. दोन्ही देशांमध्ये प्रत्यार्पणाचा करार आहे. शेख हसीना भारतात आहेत. त्यांनी ब्रिटनकडे राजकीय आश्रय मागितला आहे. परंतु ब्रिटनने त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही.

आश्चर्य म्हणजे अमेरिकेने शेख हसीना यांचा व्हिसा रद्द केला आहे. त्याचा अर्थ शेख हसीनाशी त्यांना औपचारिक संबंध ठेवायचे नाही, असा होतो. अमेरिकेच्या या भूमिकेचा परिणाम काही पाश्चात्य देशावर होण्याची शक्यता आहे. मोहम्मद युनूस अमेरिका समर्थक आहे. आपण शेख हसीना

यांचे समर्थक आहोत असा संदेश बांगलादेशातील लोकांपर्यंत पोहोचू नये म्हणून अमेरिकाने शेख हसीना यांचा व्हिसा रद्द केला असण्याची शक्यता आहे. याचा अर्थ नवीन सरकारशी अधिक सौहार्दपूर्ण संबंध स्थापित करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न असणार. अमेरिका आणि शेख हसीना यांचे संबंध फारसे चांगले नव्हते. विद्यार्थ्यांच्या बंडामागे अमेरिका आहे, अशी पण चर्चा सुरू आहे. या वेळच्या निवडणुका मुक्त आणि न्याय वातावरणात झाल्या नसल्याचा अमेरिकेने आरोप केला होता. २०२२ च्या फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेने म्हटलेलं की बांगलादेशाच्या निवडणूक प्रक्रियेत अडचणी निर्माण करणाऱ्या बांगलादेशातील लोकांना अमेरिका व्हिसा देणार नाही. अमेरिका आपल्या सरकारला सत्तेतून उलथवून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शेख हसीना यांनी आधी केला होता. ब्रिटनने जानेवारीत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांबद्दल काही प्रश्न निर्माण केले होते. सगळ्या राजकीय पक्षाने निवडणुकीत भाग घेतला नसल्यामुळे मतदारांसमोर अन्य पर्याय उपलब्ध नव्हते, असं ब्रिटनने म्हटलेलं. भारताने शेख हसीना यांना राजकीय आश्रय दिलेला नाही. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकरच्या म्हणण्यानुसार त्या काही दिवसासाठी भारतात आहेत. बांगलादेशच्या सरकारने शेख हसीना यांचा राजनैतिक पासपोर्ट रद्द केला आहे. बांगलादेश सरकारने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची औपचारिक मागणी अजून तरी केलेली नाही. एवढ्यात ते करतील याची शक्यता देखील कमी आहे. आज बांगलादेशात शेख हसीना यांच्या विरोधात वातावरण आहे. अवामी लीगच्या अनेक नेत्यांना पकडण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे अनेक न्यायाधीशांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. ढाका विद्यापीठाच्या व्हाईस चान्सेलरनी राजीनामा दिला आहे पाकिस्तानच्या विरुद्ध रावलपिंडी येथील पहिल्या क्रिकेट कसोटीत बांगलादेशला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात शकीब उल-हसन याची महत्त्वाची भूमिका होती. अवामी लीगचे ते खासदार होते. त्यांच्या विरोधात देखील हत्येचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नवीन सरकारने जमात-ए-इस्लामी आणि त्यांची विद्यार्थी संघटना छात्र शिबिरवर लावण्यात आलेली बंदी २८ ऑगस्टला उठवली. एक ऑगस्टला शेख हसीना यांच्या अवामी लीग सरकारने जमातवर बंदी घातलेली. १९७१ च्या स्वातंत्र्य आंदोलनात जमातने पाकिस्तानच्या लष्कराला लोकांवर अत्याचार आणि हत्या करण्यात मदत केलेली. शेख हसीना यांनी युद्ध गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी न्यायाधिकरण स्थापन केलेलं. न्यायाधिकरणाच्या निकालाच्या आधारे जमातच्या काही नेत्यांना फाशी देखील देण्यात आलेली. आताच्या सरकारने जमात-ए-इस्लामी दहशतवादी नसल्याचे सांगितले. खरंतर हे आश्चर्यकारक आहे. जमात आणि छात्र शिबिर या दोघांचा दहशतवादी कृत्याशी संबंध असल्याचं यापूर्वी उघड झालं आहे. छात्र शिबिरचे काहीजणांच बॉम्ब बनवत असताना झालेल्या स्फोटात मृत्यू देखील झाले आहे. आता खालेदा झिया यांना ज्या तत्परतेने मुक्त करण्यात आले आणि जमातवरील बंदी उठवण्यात आली त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की बीएनपी आणि जमातचा युनूस सरकारवर दबाव आहे. या पक्षांनी सातत्याने भारताच्या विरोधी भूमिका घेतली आहे. ते अल्पसंख्यांकाच्या विरोधी आहे.

मोहम्मद युनूस काही म्हणत असले तरी बीएनपी आणि जमातचा प्रभाव वाढत आहे आणि सरकारची पावलं पण त्यांना मदत करणारी आहे. जमातचे प्रमुख शफिकुर रेहमान यांनी म्हटलं," जमात भारताच्या विरुद्ध नाही. आम्ही बांगलादेशाचा आधी विचार करतो. भारताशी आम्हाला चांगले द्विपक्षीय संबंध पाहिजेत. मात्र भारताने आधी केलेल्या काही गोष्टी बांगलादेशच्या लोकांना आवडलेल्या नाही." वस्तुस्थिती त्यापेक्षा वेगळी आहे. बांगलादेशातील लोक भारतावर प्रेम करतात. हे मी बऱ्याचवेळा अनुभवले आहे. १९७१ मध्ये बांगलादेशात ३० लाख लोकांची करण्यात आलेली हत्या आणि जवळपास दोन लाख महिलांवर करण्यात आलेल्या बलात्कारासाठी जमात स्वतः जबाबदार आहे. जमात तेव्हा पाकिस्तानच्या बाजूने होता आणि पाकिस्तानच्या लष्कराला त्यांनी नरसंहारास मदत केली होती. बीएनपीचे महासचिव मिर्झा फकरुल आलमगीर यांनी भारताने शेख हसीना यांना बांगलादेशात परत पाठवण्याची





मागणी केली आहे. हिंदू समाजातील लोकांवर करण्यात आलेल्या हल्ल्यात बीएनपी आणि जमातची लोक पुढे होती. पाच ऑगस्टच्या रात्री त्यांनी 'विजयी मिरवणुका' काढल्या होत्या. हिंदू व इतर अल्पसंख्याक नेहमी अवामी लीगचे समर्थक राहिले आहेत. हिंदू समाज शेख मुजीबुर यांच्यासोबत स्वातंत्र्य आंदोलनात राहिलेला. २००१ ते २००६ पर्यंत बीएनपीच्या खालेदा झिया पंतप्रधान होत्या. भारत-बांगलादेश संबंधाच्या दृष्टीने तो वाईट काळ होता. भारत विरोधी काही संघटनांना बांगलादेश सरकारकडून मदत मिळत असे. ईशान्य भारतातील काही अतिरेकी, फुटीरतावादी संघटना बांगलादेशातून काम करत होत्या. तेव्हा पाकिस्तानच आयएसआय पण बांगलादेशात सक्रिय होत. चीनचा प्रभाव वाढलेला. बांगलादेशाच्या स्वातंत्र्य आंदोलनाला चीनचा विरोध होता. मुजीबुर रेहमान यांच्या हत्येनंतर बांगलादेशाला चीनने मान्यता दिली होती. शेख हसीना यांच्या विरोधी कटात चीन आणि पाकिस्तान पण असल्याची







तिस्ता नदीच्या पाणी वाटपावरून भारत व बांगला देशात वाद आहे.


यामुळे चर्चा आहे.

अवामी लीगच्या विरोधात वातावरण असल्यामुळे सरकारने लवकर निवडणुका घेता कामा नये. निवडणुका नेहमी 'मुक्त आणि न्याय' वातावरण व्हायला पाहिजे. लवकर निवडणुका झाल्या तर सहाजिकच त्याच सर्वात मोठं नुकसान अवामी लीगला होईल आणि बीएनपी-जमातला प्रचंड फायदा होईल. काही विद्यार्थी नेते विद्यार्थ्यांचा स्वतःचा पक्ष बनवण्याचा देखील विचार करत आहे. असं झाल्यास एक नवीन चित्र निर्माण होईल. भारतातल्या आसाममध्ये ऑल आसाम स्टूडेंट युनियन (आसू) या विद्यार्थी संघटनेने केलेल्या आंदोलनानंतर त्यांनी असम गण परिषद नावाचा पक्ष स्थापन केलेला आणि सत्ता देखील मिळवलेली हे विसरता कामा नये. बांगलादेशाची परिस्थिती सुधारल्यानंतर निवडणुका व्हायला पाहिजे की ज्यामुळे सगळ्या पक्षांना समान संधी मिळेल. १५ ऑगस्टला दरवर्षी मुजीबुर रेहमान यांच्या निवासस्थान ३२, धनमोंडी येथे मोठ्या संख्येने लोक जमतात. यावर्षी शेख हसीना यांनी लोकांना मोठ्या संख्येत तिथे गोळा होण्याचं आवाहन केलं होतं. पोलिसांनी तिथे लोकांना येऊ दिलं नाही, हे खरं असलं तरी लोक मोठ्या संख्येने तिथे गेले नव्हते हे मान्य केले पाहिजे. यातून बांगलादेशातील वातावरण आपल्या लक्षात येतं. दुसरं महत्त्वाचं म्हणजे मुजीबूर रेहमान यांचा लोकशाहीचा आणि सर्वसमावेशक राजकारणाचा वारसा यापुढे कायम राहिला पाहिजे. बंगाली संस्कृती सर्वसमावेशक आणि पुरोगामी आहे. त्यामुळे अशी अपेक्षा करायला हरकत नाही की परत एकदा बांगलादेश सर्वसमावेशक धोरणामुळे विकासाच्या आणि लोकशाहीच्या दिशेने पुढे जाईल.

## भारत-बांगलादेश संबंध, पुढे काय?

मोहम्मद युनूस यांच्या शपथविधीला भारताचे बांगलादेशातील उच्चायुक्त प्रणय वर्मा सहभागी झाले होते, ते महत्त्वाचे आहे. बांगलादेशाच्या नवीन सरकारशी संवाद ठेवला पाहिजे. यापूर्वीच्या सरकारला करण्यात येत असलेली मदत सुरू ठेवली पाहिजे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सरकारशी बोलत असताना विरोधी पक्षांसह समाजातील वेगवेगळ्या समूहाशी देखील संवाद केला पाहिजे. बांगलादेशात अनेक मोठ्या स्वयंसेवी संस्था आहेत. त्यांच्याशी बोलले पाहिजे. तिस्ता व इतर नद्यांच्या पाणी वाटपाच्या प्रश्नाला महत्त्व दिले पाहिजे. बीएनपी आणि जमात नेहमी पाणी वाटपाच्या प्रश्नावर चुकीचे सांगून लोकांची दिशाभूल करतात, हा इतिहास आहे. आता देखील पुरावरून भारताला दोष देण्याचा प्रयत्न केला गेला. परराष्ट्र मंत्रालयाने अधिक सक्रिय राहणं आवश्यक आहे. चीनचा बांगलादेशवर डोळा आहे, हे विसरता कामा नये. शेख हसीना पंतप्रधान म्हणून शेवटी चीनला गेल्या होत्या. तेव्हा चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग त्यांना भेटले नव्हते. शेख हसीना यांनी एक दिवस आधीच त्यांचा दौरा पूर्ण केलेला, हे लक्षात ठेवले पाहिजे.

■■



# नेहरू-गांधी परिवाराविषयी सत्ताधाऱ्यांत आकसाची भूमिका

**शरद पवार**

आजचा दिवस राजीवजींचा स्मरण करण्याचा दिवस आहे. या देशाच्या स्वातंत्र्याच्यानंतर जी एक नवीन पिढी देश चालवण्याच्यासाठी काँग्रेसचं नेतृत्व हातामध्ये घेऊन यशस्वी झाली, त्याच्यामध्ये राजीव गांधींचा उल्लेख हा प्रकर्षानं करावा लागेल. मला आनंद आहे, की त्यांचा हा आजचा दिवस मुंबईमध्ये साजरा होतोय, की ज्या मुंबईमध्ये त्यांचा जन्म झाला. एवढंच नव्हे, काँग्रेस आणि मुंबई यांचं एक अनोखं नातं होतं. आपल्यापैकी अनेकांना ठाऊक असेल, काँग्रेस पक्षाची पहिली बैठक ही पुण्याला होणार होती आणि त्याचवेळेला पुण्यनगरीमध्ये प्लेगची साथ आली आणि निर्णय हा घेतला, की पुण्यावरून काँग्रेसची बैठक ही मुंबईला घ्यावी आणि मुंबईला याठिकाणी बैठक घेतली गेली आणि त्याठिकाणी काँग्रेसचा जन्म झाला.

आणखीन एक अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक बाब आहे, की ज्याचा उल्लेख मुकुल वासनिकांनी याठिकाणी केला, की सुरूवातीचा काँग्रेसचा काळ हा देशातल्या लोकांमध्ये जागृती करणं, पण संघर्षाचा विचार नव्हता. स्वातंत्र्य प्राप्त करण्याच्यासाठी संघर्षाची भूमिका घेणं ही नितांत आवश्यकता आहे ही वेळ आणि हा विचार ऑगस्ट क्रांती मैदानावर महात्मा गांधींनी त्या काळामध्ये करून दाखवलेलं होतं. ती काँग्रेसची बैठक, की त्या बैठकीमध्ये गांधीजींनी चले जावचा नारा दिला आणि संध्याकाळी ब्रिटीश सरकारनी त्यांना अटक केली आणि पुण्याच्या आगा खान पॅलेसमध्ये नेऊन त्यांनी रवानगी त्याठिकाणी केली. आणि दुसऱ्या दिवशी अरूणा असफअली यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस कमिटीची बैठक भरली आणि हा संघर्ष आम्ही पुढं नेणार याप्रकारचा आदेश अरूणा असफअलींनी दिला. त्यावेळच्या इंग्रज सरकारनी संपूर्ण काँग्रेसची कार्यकारिणी तिला अटक केली आणि बाळासाहेब थोरातांच्या अहमदनगर जिल्ह्यात एक प्रसिद्ध किल्ला आहे, त्या किल्ल्यामध्ये नेऊन काँग्रेसची वर्किंग कमिटी ठेवली, की ज्या अहमदनगरच्या किल्ल्यामध्ये डिस्कव्हरी ऑफ इंडिया यासारखा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ जवाहरलाल नेहरूंनी लिहिला. ही सगळी इतिहासाची मालिका आणि मुंबई यांचा कुठेना कुठे संबंध आहे.

राजीव गांधींचा जन्म इथं झाला. राजीव गांधींचं काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून एक अत्यंत गाजलेलं भाषण हे मुंबईमध्ये झालेलं होतं. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचं अधिवेशन मुंबईमध्ये होतं आणि काँग्रेसला एक नवीन दिशा द्यायची हे सूत्र राजीव गांधींनी याच मुंबई शहरामध्ये मांडलेलं होतं. आणि म्हणून मुंबई आणि काँग्रेस, मुंबई आणि राजीव गांधी यांचं एक आगळंवेगळं अशा प्रकारचा सलोखा होता. ऐतिहासिक अशा प्रकारचा तो होता आणि अशाच वेळेला त्यांच्या संदर्भातला हा सोहळा याठिकाणी होतोय याचा मला मनापासूनचा आनंद आहे. मी काही अधिक बोलून आपल्या सगळ्यांचा वेळ घेऊ इच्छित नाही. आज हा राजीव गांधींचा विचार, मग तो इंदिरा गांधींचा विचार असेल, जवाहरलाल नेहरूंचा विचार असेल, मोतीलाल नेहरूंचा विचार असेल, महात्मा गांधींचं मार्गदर्शन असेल, मौलाना अब्दुल कलाम अझाद अशी अनेकांची नावं घेता येतील या सगळ्यांचं योगदान या देशाच्या उभारणीमध्ये आणि देशाच्या स्वातंत्र्याच्यामध्ये होतं. हा एक देशाच्या इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. आज ज्यांनी इतिहास निर्माण केला, ज्यांनी या देशाला नवीन दिशा दिली, देश

परकीयांच्या ताब्यातून मुक्त केला, त्यांचं योगदान या देशाच्या प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटावा अशा प्रकारचा आहे.

पण, दुर्दैव असं आहे, की ज्यांच्या हातामध्ये देशाची सत्ता आहे त्यांना नेहरू परिवार म्हटल्याच्यानंतर काय होतं मला माहित नाही. मी संसदेमध्ये बघितलं, नेहरू कुटुंबीयांच्यावर टीका करणं, ज्यांनी आपलं सगळं आयुष्य देशासाठी दिलं, सर्वस्व देशाच्यासाठी दिलं. एक, दोन, तीन, चार पिढ्या या देशाच्यासाठी ज्यांनी खर्ची घातल्या अशा व्यक्तींच्या आणि अशा कुटुंबीयांच्यासंबंधी एक प्रकारची आकसाची भूमिका आजचे देशाचे प्रधानमंत्री आणि त्यांचे सहकारी घेतात ही अत्यंत दुर्दैवी अशा प्रकारची गोष्ट आहे. भले त्यांनी काही म्हणो, त्यांनी काही टीका-टिप्पणी करो, पण या देशाच्या इतिहासामध्ये नेहरू परिवार आणि त्यांचं योगदान हे कुणीही पुसू शकत नाही. या परिवारानं आज तोच विचार राजीव गांधींच्यानंतर पुढे चालू ठेवलेला आहे.

माझ्या व्यक्तिगत जीवनामध्ये काही गोष्टी माझ्या आयुष्यात राहणाऱ्या अशा आहेत. माझ्या मुलीचं लग्न ठरलं. लग्न बारामतीला होतं. राजीव गांधी बारामतीला आले आणि लग्नाला उपस्थिती लावली. मला आठवतंय, की दु:खद गोष्ट आहे, राजीवजी गेले, त्याच्या आदल्या दिवशी त्यांचा मुक्काम मुंबईत होता. महंमद अली रोडवर त्यांची सभा आम्ही लोकांनी आयोजित केली होती. त्यावेळी सभा किती वेळ चालावी याच्यावर बंधनं नव्हती. रात्री दहा वाजता आमची सभा संपली आणि मुक्कामाला राजीवजी माझ्या घरी आले वर्षावर आणि सकाळी सात वाजता तयार होऊन दक्षिणमध्ये गेले चेन्नईला, आणि दुर्दैवानं दुसऱ्या दिवशी नको ते घडलं आणि ते या देशात राहिले नाहीत. आपल्या सगळ्यांच्यातून निघून गेले. पण, माझ्या व्यक्तिगत जीवनामध्ये हे दोन प्रसंग मी कधीही विसरू शकत नाही. आम्ही लोकांनी एकत्र काम केलं. ते देशाचे प्रधानमंत्री होते. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. नंतरच्या काळामध्ये देशातले एक विरोधी नेते होते. राज्याची सत्ता ही माझ्या हातामध्ये होती. अनेक गोष्टी या सातत्यानं एकत्र बसून, त्यांचं मार्गदर्शन घेऊन हा देश आधुनिकतेच्या रस्त्यावर कसा न्यायचा याबद्दलची त्यांची एक भूमिका मांडण्याची त्यांची एक पद्धत होती त्याचा पुरेपूर लाभ आम्ही सगळेजणं सातत्यानं घेत होतो. नंतरच्या काळामध्ये आणखीन एक वेगळी गोष्ट घडली. मी काँग्रेसमध्ये नव्हतो आणि त्याच काळामध्ये पंजाबचं एक वेगळं चित्र निर्माण झालं. पंजाबमध्ये अतिरेकी शक्ती वाढल्या. पंजाब आणि हा देश याच्यामध्ये अंतर होतंय की काय अशा प्रकारची स्थिती आली. राजीव गांधी प्रधानमंत्री होते आणि त्यांनी मला बोलवून घेतलं आणि मला सांगितलं, की हे शिखांचं जे नेतृत्व आहे, ते तुरूंगामध्ये होतं, आणि त्यांच्याशी संपर्क साधणं आणि सुसंवाद साधणं याची एक राष्ट्रीय गरज होती आणि म्हणून राजीव गांधींनी मला आणि एक आर. डी. प्रधान नावाचे गृहस्थ, की जे केंद्र सरकारच्या गृह खात्याचे सचिव होते, आम्हा दोघांना सांगितलं, की हा शिखांचा प्रश्न सोडवण्याच्यासाठी शीख समाजाच्या नेतृत्वाला चर्चेच्यासाठी तयार केलं पाहिजे आणि ही प्रक्रिया तुम्ही करावी आणि म्हणून हे काम माझ्यावर सोपवलं. तीन दिवस अखंडपणानं प्रकाशसिंह बादल असतील किंवा त्यांचे इतर सहकारी असतील, त्यांच्याशी आम्ही सुसंवाद साधला आणि त्यांना चर्चेच्यासाठी तयार केलं. नंतरची चर्चा राजीवजींची आणि त्यांची झाली आणि त्या चर्चेच्यानंतर एक प्रकारचं सामंजस्य हे निर्माण होण्याच्यासाठी प्रक्रिया सुरू झाली.

अशा कितीतरी गोष्टी आहेत, की ज्यामुळं या देशाला संकटातून बाहेर काढण्याच्यासाठी राजीव गांधींनी अतिशय व्यापक दृष्टिकोन ठेऊन ठोसपणानं पावलं टाकली अशा भारतमातेच्या सुपुत्राचं आज आपण याठिकाणी स्मरण करतोय. त्यांनी राष्ट्रासाठी केलेलं कष्ट, राष्ट्रासाठी खाल्लेल्या खस्ता आणि राष्ट्रासाठी त्यांनी केलेला त्याग याचं अखंड स्मरण आपण लोकांनी ठेवावं आणि ती विचारधारा मजबूत करण्याचं ऐतिहासिक काम आपल्या सगळ्यांना करावं लागेल ही भूमिका घेऊनच इथून आपण जाऊया. एवढंच सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो. ■■

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्यावतीनं २० ऑगस्ट रोजी मुंबईतील षणमुखानंद सभागृहात आयोजित सद्भावना दिवस व संकल्प मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...**






शरद पवार

# काम देणाऱ्यांची पिढी तयार

आज दिवसभर राज्यस्तरीय अधिवेशन आपण या ठिकाणी आयोजित केलं. विविध प्रश्न आपल्या सगळ्यांच्या समोर आहेत. त्यातून मार्ग काढून आत्मविश्वासाने उभी झालेली ही पिढी तयार करणं, यासंबंधी अत्यंत मोलाची कामगिरी संभाजी ब्रिगेडच्यावतीने गेली अनेक वर्षे केली जाते. आज याठिकाणी अनेकांची भाषणं आपण सकाळपासून ऐकली. ज्ञानेश महाराव या ठिकाणी बसलेत. त्यांचं भाषण आपण या ठिकाणी ऐकलं. अनेक प्रकारची आव्हानं आपल्या सगळ्यांच्या समोर आहेत. नेहमीच्या चौकटीच्या बाहेर जाऊन त्या आव्हानांवर मात करण्याच्या संबंधीची हिंमत ही दाखवण्याची आज अत्यंत गरज आहे.



आपण काही क्षेत्रामध्ये काम करतो, शेतीच्या क्षेत्रामध्ये काम करतो, आपल्यातले काही सहकारी व्यवसायामध्ये गुंतलेत आणि त्याशिवाय अनेक क्षेत्रांमध्ये जाण्याची आवश्यकता तुम्हा लोकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न संभाजी ब्रिगेडच्या वतीने सतत केला जातो. हा देश शेतीप्रधान आहे. आपण याठिकाणी सन्मान करत असताना शिंदेंचा सत्कार केला. त्यांनी कंपनी काढली जिचं नाव सह्याद्री आणि आज सह्याद्री कंपनी, माझी अगदी आग्रहाची सूचना तुम्हाला आहे. कधी नाशिकला गेलात तर सह्याद्रीवर चक्कर जरूर टाका. काही शेतकरी एकत्र येतात आणि शून्यातून एक कंपनी तयार करतात. शेती उत्पादन वाढवतात त्या उत्पादनावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था करतात आणि देशातील नव्हे तर जगाच्या बाजारपेठेमध्ये आपण काही करू शकतो या प्रकारचा इतिहास घडवतात. हा इतिहास घडवल्यानंतर, कर्तृत्वदृष्टी ज्यांनी दाखवली ते तुम्हा सगळ्यांच्यापैकीच एक होते. त्यांची पार्श्वभूमी काही टाटा बिर्लाच्या घरातली नव्हती. पण शेतीच्या क्षेत्रामध्ये आधुनिक विज्ञानाचा आधार घेऊन आपण काही वेगळं करू शकतो या प्रकारचा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला आणि तो




# करण्यासाठी सहकार्य करूया

अंमलात आणला.

आपण नेहमी सांगतो की भारत हा शेतीप्रधान देश आहे. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढतेय आणि देशातील शेती कमी व्हायला लागली. आपण विकासाचे अनेक प्रकल्प हातामध्ये घेतो, धरणं बांधतो, औद्योगिक वसाहती करतो, नागरीकरण वाढतं आणि या सगळ्याला शेतीची जमीन जात असते. अलीकडच्या काळामध्ये आपल्या देशामध्ये महामार्ग तयार करण्याची भूमिका सरकारने स्वीकारली आणि त्या महामार्गात सुद्धा शेवटी जमीन जाते ती शेतीची जमीन जाते. याचा अर्थ शेतीची जमीन कमी होते आणि दुसऱ्या बाजूनं शेतीवरचा बोजा हा वाढत चाललेला आहे. ज्यावेळेला १५ ऑगस्ट १९४७ ला आपण स्वतंत्र झालो त्यावेळेला देशाची लोकसंख्या ३० ते ३२ कोटी होती. आज ती तिप्पट चौपट वाढलीये. ऐवढा प्रचंड बोजा शेतीवरती पडला. हे क्षेत्र कमी झालं आणि मर्यादित क्षेत्रावर शेती करण्याची भूमिका ही करण्याची स्थिती आपल्या सगळ्यांवरती आली. यात यश मिळवायचं असेल तर आधुनिकत्येला दुर्लक्षित करून चालणार नाही. शेतीच्या क्षेत्रामध्ये बी बियाणं असेल आणि या पद्धती असतील याच्यात प्रचंड बदल होतायत, संशोधन होतंय आणि त्या संशोधनाचा आधार घेऊन आपण शेतीची उत्पादकता वाढवणं आणि शेती करत असताना त्याला जोडधंद्याची जोड देणं या गोष्टी केल्याशिवाय शेतीचं अर्थकारण हे खऱ्या अर्थाने व्यवहारी होणार नाही.

**संभाजी ब्रिगेडच्यावतीने २२ ऑगस्ट रोजी वाशी, नवी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...**

आत्महत्या हा शेती आणि शेती व्यवसायाला लागलेला एक गंभीर रोग आहे. ही आत्महत्येची स्थिती बदलायची असेल तर उत्पादकता वाढवली पाहिजे, विज्ञानाचा आधार घेतला पाहिजे, तयार झालेल्या मालावर प्रक्रिया करण्याचा विचार हा करायला पाहिजे आणि हे सगळं करत असताना जगाची बाजारपेठ कशी प्राप्त करायची याच्यामध्ये सुद्धा लक्ष केंद्रित करावं लागेल. त्यादृष्टीने एक प्रकारची विचारी नवी पिढी ही तयार कशी करता येईल आणि ती तुम्ही केली तर तुमच्यापासून तिचा बोध घेऊन तुमचा शेजारी, तुमचा मित्र तोही त्या रस्त्याने कसा जाईल याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तरच हे चित्र बदलणार आहे.

आज या ठिकाणी ज्यांचा ज्यांचा तुम्ही सन्मान केला शेतीच्या क्षेत्राच्या योगदानाच्याबद्दल माझ्या मते ही फार चांगली गोष्ट तुम्ही केली. सह्याद्रीचा उल्लेख मी केला. सतीश मगर याठिकाणी आहेत. त्यांनी पूर्ण माहिती सांगितली नाही.

आज मगरपट्टा हा देशाच्या समोर एक उदाहरण झालंय. आज मगरपट्टा, एकेकाळी उसाची शेती करणारा हा सगळा परिसर. मला आठवतंय की आम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये जेव्हा पहिल्यांदा निवडून आलो त्यावेळेला आम्हा लोकांच्यापुढे राजकारणाचे धडे देण्याच्यासाठी आणि साथ देण्याच्यासाठी जे अनेक वरिष्ठ आणि वडीलधारी आमचे सहकारी होते. त्याच्यामध्ये आज सतीश मगर आहेत. त्यांचे कुटुंबीय सुद्धा अण्णासाहेब मगर हे आम्हा सगळ्यांचे मार्गदर्शक होते. पण उत्तम शेती करून नंतरच्या काळामध्ये पुणे शहर वाढायला लागलं. शहर वाढतंय तशी शेती करण अवघड होतय. काम करण्यासाठी लोक मिळत नाहीत, उत्पादन खर्च वाढतो, आणि शेती ही दिवसेंदिवस संकटात नेण्याचं काम करतेय. आता हे नागरिकरण आहे याची नोंद घेऊन आपण बदल केला पाहिजे हा विचार त्या ठिकाणी सतीश मगर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्यात आला. स्वतः बाहेरून शिक्षण घेऊन आले आणि आल्यानंतर जमिनीचे तुकडे करायचे आणि ती जमीन विकायची आणि त्यातून आलेल्या पैशाने आयुष्य जगायचं या प्रकारची सरंजामी पद्धती शहरांच्या जवळच्या अनेक शेतकऱ्यांच्यामध्ये असते. पण सतीश मगरांनी वेगळा दृष्टिकोन ठेवला. त्यांनी एक नवीन शहर निर्माण करू शकतो का? या दृष्टिकोनातून पावलं टाकली आणि जेवढे शेतकरी त्या भागातले होते त्या सगळ्यांची एक संस्था स्थापन केली. त्या संस्थेच्या मार्फत आधुनिकतेचा आधार घेऊन त्या जमिनीचं नियोजन योग्य करून एक नवीन औद्योगिक नगरी ही उभी केली. ती औद्योगिक नगरी ही वेगळी नगरी आहे. आताच जग हे आयटीचे जग आहे आणि त्या आयटीसाठी उत्तम प्रकारची सुविधा देणारं एक काम या नगरीच्या मार्फत करू शकतो हा दृष्टिकोन त्यांनी घेतला आणि त्याची उभारणी केली. आज हजारो लोकांना त्या ठिकाणी काम मिळतं.

मला आनंद आहे की महाराष्ट्राचे आणि महाराष्ट्राच्याबाहेरचे सुद्धा तरुण आज त्याठिकाणी येतात, कष्ट करतात आणि देशाच्या संपत्तीत भर टाकतात. आणि ते जे शेतकरी जमीन विकून थोडेबहुत पैसे मिळाले असते त्याऐवजी त्या संस्थेचे ते संचालक सभासद झाल्यामुळे आज दरवर्षाला त्यांना अतिशय चांगल्या प्रकारचं उत्पन्न आज त्या शेतीच्या या संस्थेच्या पद्धतीतून मिळत.

हे इथेच थांबलेलं नाही. शेतकऱ्यांच्या घरातील मुली त्या दुसरा काही व्यवसाय करू शकतील का? हजार लोकांना काम मिळाल्याच्यानंतर त्या हजारो लोकांचा चहापान अन्न हा खर्च हा दिवसेंदिवस वाढतच असतो मग त्याच्यासाठी कोणीतरी बाहेरून येण्याच्याऐवजी आपल्याच कुटुंबाच्या मुली या क्षेत्रामध्ये उतरल्या आणि काही व्यवसाय करू शकल्या, तर त्यावर प्रोत्साहन दिल. त्यात त्या यशस्वी झाल्या. नवीन पिढी ही आणखीन काहीतरी वेगळं करायचा प्रयत्न करत असते पण त्याच्यासाठी जिथं हजारो लोक काम करतात त्या हजारो लोकांना वाहनाची व्यवस्था लागते आणि म्हणून गाड्या एकत्र करून व्हेईकलची किंवा प्रवासाची सुविधा ही देण्याच्यासाठी काही करता येईल का त्या दृष्टिकोनातून ट्रान्सपोर्टची व्यवस्था त्यांनी केली आणि आज मगरपट्टा हे अतिशय उत्तम प्रकारचं काम त्या ठिकाणी करतंय आणि नव्या पिढीला एक प्रकारचं आत्मविश्वासानं आपण हे करू शकतो हे चित्र त्यांनी निर्माण केलं.




राजेंद्र पवारांनी आज कृषीच्या क्षेत्रामध्ये काम केलंय. बारामती ॲग्रो नावाची कंपनी काढली गेली आणि त्या कंपनीच्या मार्फत अनेक गोष्टी हातामध्ये घेतल्या. त्यामधून शेती आणि शेतीवर आधारित अन्य काही व्यवसाय असतील. आज दुधाचा धंदा वाढत असल्याच्यानंतर त्या जनावरांच्यासाठी खाद्याच्यासाठी निर्मितीची गरज असेल अशा अनेक गोष्टी आहेत त्या गोष्टीची निर्मिती करून आपण कारखानदारी काढू शकतो या प्रकारचा आदर्श त्यांनी केला. यातून नव्या पिढीला एक प्रकारचं प्रोत्साहित करण्याचं काम त्यांच्यामार्फत त्या ठिकाणी झालेलं आहे आणि म्हणून मी हे

सांगितलं एवढ्यासाठी की आपण थोडीशी चाकोरी बदलली पाहिजे. नेहमीचा आपला जो व्यवसाय आहे तो करूया पण सगळ्यांना तिथे गुंतवायचं का? सगळ्यांची शक्ती त्या ठिकाणी लावायची का? याबद्दल फेरविचार करण्याची वेळ आली आहे.

आज जगातील अनेक देशांमध्ये भारतीय बघायला मिळतात. प्रामुख्याने शिख समाज बघा, तमिळनाडूमधील मद्रासी घटक बघा, गुजरात मधील गुजराती बघा. अमेरिकेमध्ये तुम्ही गेलात तर रस्त्याने जात असताना जेवढे पेट्रोलचे पंप असतील आणि छोटे रेस्टॉरंट असतील त्याच्यात जास्तीत जास्त मालकी ही भारतातून आलेल्या लोकांची आहे. हे सगळे लोक प्रामुख्याने गुजरात या राज्यातून त्या ठिकाणी गेले आहेत. ब्राझीलमध्ये आपण गेलात तर उत्तम शेती करणारे शेतकरी भारतीय त्या ठिकाणी मिळतात. विशेषतः तामिळनाडू आणि पंजाब, हरियाणा या भागातून ते आलेले असतात. याचा अर्थ एकच आहे की कुठल्याही क्षेत्रामध्ये जायचं असेल तर जगात कुठेही जाण्याची तयारी ठेवणे आणि कसलाही प्रकारचा उद्योग आम्ही कष्टाने करू शकतो, यशस्वी होऊ शकतो त्यासाठी मेहनत करण्याची तयारी ही जर तुम्ही ठेवली तर शंभर टक्के यशस्वी होता, याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

संभाजी ब्रिगेड यांचे प्रामुख्याने अलीकडचे काम त्यांच्या पुण्याच्या एका बैठकीमध्ये मी गेलो होतो. अर्थकारण या विषयावर त्यांचे आता लक्ष जास्त आहे. नव्या पिढीने अर्थकारणाला महत्त्व द्यायला हवे. उद्योग किंवा व्यवसाय काही ना काहीतरी करणे आणि त्यातून पुढे जाणे व ते करत असताना आपल्यासारखे जे अनेक नवे तरुण जे येऊ इच्छितात त्यांना प्रोत्साहन करणं वेळेप्रसंगी मदत करणं हा दृष्टिकोन जर आपण ठेवला तर ही सगळी तरुण पिढी जीवनामध्ये यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. अधिक हातांना काम देण्याची त्यांची तयारी राहिली पाहिजे. आम्हाला काम देणारे तयार करायचे आहेत आणि ते काम देणाऱ्यांची पिढी तयार करण्यासाठी एक दृष्टिकोन, विचारधारा ही बदलण्याची आवश्यकता आहे. मला समाधान एका गोष्टीचे आहे की, प्रवीण दादा आणि त्यांचे सहकारी गेले काही वर्ष या कामात अधिक लक्ष द्यायला लागले आहेत. काम देणारा तरुण कसा तयार होईल? यामध्ये त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. ही भूमिका घेत असताना तुमची आणि माझी सगळ्यांची जबाबदारी आहे की त्याच्यामध्ये त्यांना सहकार्य करणं. ते काम करतात तसेच काम आपापल्या भागामध्ये वाढेल कसं व इतरांना आपण प्रोत्साहित कसे करू, त्यांचा आत्मविश्वास कसा वाढवू? या दृष्टिकोनातून आपण काळजी घेतली पाहिजे. ते काम तुम्ही करावं एवढीच माझी अपेक्षा आहे.




आज शिवछत्रपतींच्या नावाने आपण अनेक गोष्टी सांगतो. शिवछत्रपतींनी समाजातील अठरापगड जातींना बरोबर घेतलं आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी हे राज्य उभे करताना दृष्टिकोन ठेवला. मी अनेकदा सांगतो रयतेचे राज्य उभे करण्याची त्यांनी भूमिका घेतली. रयतेच्या हातामध्ये हे राज्य जर चालवायचे असेल तर अठरापगड जातींना बरोबर घेणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना दृष्टी देणे व त्यांच्यामार्फत राज्य उभे करणे हे काम शिवाजी महाराजांनी केले. हे सगळं करताना समाजातील ज्या दुष्ट प्रवृत्ती आहेत याचा किंचितही संबंध असता कामा नये. संभाजी ब्रिगेड यासाठी अत्यंत मोलाची कामगिरी करेल याचा मला विश्वास आहे, त्यासाठी मी त्यांना अंतःकरणापासून शुभेच्छा देतो व त्यांचे अभिनंदन करतो. ■■

# धर्मांधांनी सदा बलात्कारीत भूमीचे रक्तलांछीत आत्मवृत्त

**प्रभाकर खोले**



'द फर्टाइल क्रिसेंट' किंवा 'क्रॅडल ऑफ सिव्हिलायझेशन' म्हणजेच 'संस्कृतीचा पाळणा' या नावाने ओळखला जाणारा पश्चिम आशियातील पॅलेस्टाइन इस्त्रायल आणि जवळपासचा भूभाग हा तिथल्या दीर्घ सांस्कृतिक वारशासाठी जेवढा प्रसिद्ध आहे त्याहीपेक्षा कदाचित जास्त माहिती आहे तो धर्माच्या नावाखाली हजारो वर्षे होणारी रणकंदने, अत्याचार, नरसंहार आणि लाखोंच्या संख्येने होत असलेली निर्वासितांची स्थलांतरे, यासाठी... आणि आजही सध्या चालू असलेल्या इस्त्रायल-हमास युद्धात तर या दुदैवी भूमीचे हे रक्तलांछीत स्वरुप आणखीनच प्रकर्षाने पुढे येत आहे. प्रागैतिहासिक काळापासून सुरु असलेल्या या धार्मिक-राजकीय-वाशिंक तथा भूराजकीय वंशसंहारांचा इतिहास.

७ ऑक्टोबर, २०२३ हा मानवी इतिहासातील अनेक काळ्या दिवसांपैकी सर्वात अलिकडचा. 'हमास' या पॅलेस्टिनी अतिरेकी संघटनेच्या सशस्त्र समाजकंटकांनी दक्षिण इस्त्रायलमध्ये नृत्यसंगीत समारोहात दंग असलेल्या बाराशेवर सामान्य इस्त्रायली नागरिकांची निघृण हत्या केली, कित्येक तास अत्याचार, बलात्कारांचे थैमान घातले आणि शेकडो निरपराधांना वरती पकडून नेऊन गाझा पट्टीमध्ये डांबून ठेवले. त्यातले काही मेले, काही सुटले तरी कित्येक ओलीस आज जवळजवळ वर्षानंतरही हमासच्या कैदेमध्ये खितपत पडलेले आहेत.

अरब-इस्त्रायली (ज्यू) यांच्या वैरातील ताज्या पर्वाची ही सर्वात अलिकडील घडामोड. अजूनही हल्ले-प्रतिहल्ले आणि लष्करी कारवाया, बॉंबफेकी, क्षेपणास्त्र हल्ले व इतर छापे-धाडी यांच्या खून सत्रांमधून हजारोंचे जीव घेणारी, कित्येक हजारांना जायबंदी करणारी आणि लक्षावधींना आपली घरेदारे सोडायला लावून कायमची निर्वासित करणारी, उघड्यावर राहणे, कुपोषण, रोगराई आणि किमान मानवी मूल्यांबद्दल विलक्षण अनास्था यांमुळे हजारोंचे बळी घेणारी ही सारी हत्याकांडे जगाच्या या ज्या चिंचोळ्या, छोट्याश्या भागात सातत्याने आणि इतिहासात ज्ञात असल्यापासून घडून येत आहेत. त्याचे केंद्रस्थान आहे, जेरूसलेम! जगातील जवळजवळ सात अब्ज लोकसंख्येपैकी साठ टक्के म्हणजे

बहुसंख्यांचे धार्मिक केंद्रस्थान, त्यातले सुमारे अडीचशे कोटी म्हणजे जगाच्या लोकसंख्येच्या एक तृतीयांश आहेत ख्रिश्चन, जवळजवळ एक चतुर्थांश आहेत मुस्लिम आणि दीडेक कोटी आहेत ज्यू धर्माचे अनुयायी.

हे तिन्ही धर्म आहेत 'एकेश्वरवादी' म्हणजे एकाच देवावर श्रद्धा ठेवणारे. 'या विश्वात फक्त एकच देव आहे' असे मानणारे अन त्या देवाचे प्रेषित वेळोवेळी येऊन समाजाला (धार्मिक) ज्ञान देतात, यावर विश्वासही ठेवणारे.

ख्रिश्चनिरी, इस्लाम व जुडाइझम (ज्यू) या तिनही धर्मांचा परस्पर संबंधही आहे म्हणजे एकाच्या अनुयायातूनच दुसऱ्यांचे प्रेषित निर्माण झाले अशीही त्यांची धारणा आहे. यातील सर्वात जुना धर्म ज्यू. त्यातूनच एक ख्रिस्त निर्माण झाला, अब्राहम (उर्फ इब्राहीम) हा ज्यूंचा प्रणेता. म्हणूनच या तिनही धर्मांना 'अब्राहमिक' म्हणजे अब्राहमपासून चालत आलेले धर्म असेही म्हणतात. मात्र 'अल्ला' या एकाच देवाची भक्ती सांगणारे मोहम्मद पैगंबर हे शेवटचे प्रेषित आणि त्यांनी सांगितलेली नचने हा अखेरचा धर्म असे इस्रायलमध्ये अनुयायी मानतात आणि त्यामुळेच आपले धर्मश्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याच्या अहमाहमिकेमुळे या भूमीत





आपली प्रार्थनास्थळे व आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी या तिनही धर्मांमध्ये रक्तरंजित संघर्ष सुरु झाले व होत राहिले. आजच्या इस्रायल या देशाची निर्मिती १४ मे १९४८ रोजी झाली. जगभरातून ज्यू धर्मीय येऊन तिथे स्थायिक झाले, गेली काही शतके तिथे राहात असलेल्या अरबांना (इस्लामी) या नववसाहतकरांनी पिटाळून लावले व तेव्हापासून या पुरातन रक्तसंघर्षाचे आधुनिक पर्व सुरु झाले, जे आजतागायत चालू आहे.

## इस्रायलशी हाडवैर निर्मितीपासूनच !

इस्रायलची निर्मितीच 'एक ज्यूंचे राष्ट्र' म्हणून झाली, त्यामुळे धर्माने ज्यू असलेल्या किंवा स्वतःचे ज्यूत्व सिद्ध केलेल्या जगातील कोणत्याही व्यक्तीला इस्रायलमध्ये प्रवेश व नागरिकत्व त्यांच्या राज्यघटनेनुसार मिळू शकते. आपल्या भारतातूनही गेल्या शहात्तर वर्षात हजारो ज्यू तिथे स्थलांतरित झाले आहेत आणि महाराष्ट्रातूनही 'बेने इस्रायल' या नावाने ओळखले जाणारे ज्यू धर्मीय अर्थात भारतामध्ये ज्यू धर्मियांवर धर्माच्या नावावर कधीच अत्याचार झाले नाहीत.

अरबांना हटवून तिथे त्यांच्या जमिनीवर इस्त्रायलची स्थापना झाल्याच्या भावनेतून इस्लामधर्मीय अरबांनी आणि सभोवतालच्या अरब इस्लामी राष्ट्रांनी इस्त्रायलच्या गळ्याला जन्मापासूनच नख लावण्याचे प्रयत्न आणि ज्यूंना समुद्रात बुडविण्याची भाषा सुरु केली. सशस्त्र अरबी टोळ्या आणि इजिप्तपासून जॉर्डनपर्यंत सर्व राष्ट्रांच्या सैन्यांनी इस्त्रायलवर पाश्चिमात्य, विशेषतः अमेरिकन राष्ट्राच्या सबळ व सशस्त्र पाठिंब्यामुळे इस्त्रायलने यशस्वी तोंड दिले. परंतु सुरक्षिततेच्या नावाखाली इस्त्रायलने आजूबाजूचा अरब मुलूखही त्यांना हाकलून देऊन किंवा खराब वस्त्यांमध्ये ढकलून बळकावण्यास सुरुवात केली. ‘गाझा’,‘वेस्ट बँक’ वगैरे त्याचीच उदाहरणे. निर्वासित अरबांच्या कित्येक पिढ्या अशा बकाल वस्त्यांतच राहिल्या, निर्माण झाल्या अन् त्यातून निर्माण झाले अरबांचे व त्यातही पॅलॅस्टिनी अरबांचे इस्त्रायलशी जन्माजन्माचे हाडवैर. मुस्लिम अरबांचा ज्यू इस्त्रायलशी उभा दावा तेव्हापासून सुरु झाला. त्याला इराण, सौदी व इतर इस्लामी जगताची साथ लाभली व अरब अतिरेकी हमास, हिजबुल्ला असे अनेक इस्त्रायलविरोधी अतिरेकी गट निर्माण झाले.



अरबांविरुद्ध विस्तारवादी धोरणाला अमेरिकादी राष्ट्रांचा कधी उघड तर कधी प्रच्छन्न पाठिंबा होता. अमेरिकेतील अत्यंत धनाढ्य व बलाढ्य अशा ‘ज्यू’ लॉबीची फूस होती (इस्त्रायलपैक्षा अमेरिकेमधील ज्यू धर्मियांची संख्या अधिक आहे) इस्त्रायलला सर्व प्रकारची आर्थिक, तांत्रिक, लष्करी मदत अमेरिकाच पुरवते आणि तंत्रज्ञानात अमेरिका साऱ्या जगामध्ये प्रगत असल्याने इस्त्रायली तंत्रज्ञान विशेषतः हत्यारे, यंत्रसामुग्री, विमाने, हेरगिरी व शस्त्रास्त्रे यांमध्ये इस्त्रायल, अरब देशांपेक्षा कितीतरी पुढे आहे.

## युद्धतंत्राची ६ वी पिढी

सध्या चालू असलेल्या इस्त्रायलच्या गाझा पट्टीतील कारवाई आणि युद्धाला संरक्षणसंशोधक आणि युद्धतज्ज्ञ यांनी ‘युद्धतंत्राची सहावी पिढी’ असे नाव बहाल केले आहे. त्यांनी केलेल्या वर्गवारीप्रमाणे युद्ध करण्याच्या मानवाच्या तंत्रामध्ये गेल्या हजारो वर्षांपासून जे बदल घडून आले, तांत्रिक प्रगतीमुळे, त्यांची ढोबळपणे वर्गवारी युद्धतंत्राच्या सात पिढ्यांमध्ये करता येईल. त्यातली पहिली म्हणजे अगदी प्राथमिक पिढी ही आदिमानवाची, दगडधोंडे, काठ्या किंवा हातात असेल त्याने शिकार करण्याची होती. ही अवस्था खूप काळ टिकली. दुसरी पिढी होती ‘फेकून मारण्याच्या हत्यारांची’, दगड-गोफण ते भाले-बाण, बरची वगैरे. नंतर स्फोटके आली, बंदुका-तोफा, रणगाडे. त्यानंतरची प्रगती भराभर होत गेली, पिढ्या लवकर येत गेल्या. हिटलरने एकावेळी अनेक आघाड्यांवर युद्धतंत्र केले. नंतर त्यामध्ये प्रचार, प्रसार व धार्मिक आवाहनांची भर पडली व समाजमन आणि राजकारणाची जोड दिली. या पाचव्या पिढीच्या युद्धतंत्राला ‘सायकॉलॉजिकल वॉरफेअर’ किंवा ‘ग्रेझोन वॉरफेअर’ म्हणतात. इथे नॅरेटिव्हला अनन्यसाधारण महत्व आले. भारतामध्ये सध्या अशा प्रकारचे युद्ध चालू आहे असे काही तज्ज्ञांचे मत आहे.

## गाझामधील इस्त्रायली युद्धतंत्र

गाझामध्ये पॅलेस्टिनी आणि अरबांविरुद्ध इस्त्रायल आज वापरत असलेल्या प्रकाराला युद्धतंत्राची ६ वी पिढी असे संबोधता येईल. हे लढण्यासाठी समाजमाध्यमे व मोबाइल फोनसारख्या उपकरणांचा वापर केला जात असतो. आपले बाराशेवर लोक मारले गेले आणि २६५ हमासवाल्यांनी कैदी म्हणून नेले. त्याचा सूड म्हणून इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमध्ये आजवर एकूण ४० हजार ६०० वर पॅलेस्टिनी मरण पावले तर त्याच्या कितीतरी पट जखमी झाले. आणि या सर्व क्षतिग्रस्तांमध्ये स्त्रिया व मुलांची संख्या सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त आहे. याशिवाय तेथील बेघर झालेल्यांची संख्याही २५ लाखांवर जाते, जी दिवसेंदिवस वाढतेच आहे, कारण हमास, इस्त्रायल शस्त्रसंधी होत नाही, झालीच तर तो एक दिवस काय, काही तासही टिकत नाही आणि त्यावरतीही लेबॉनन व सिरीयामधील इराणी हेजबुल्ला व इतर अतिरेकी सतत रॉकेट व क्षेपणास्त्रांचा मारा करतच असतात.

इस्त्रायलच्या माऱ्यामुळे तळघरे, शाळा किंवा बंकरमध्ये आश्रयाला गेलेली बहुसंख्य महिला, मुले असून त्यांनी आपण सुखरूप आहोत हे सांगण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी बोलायला किंवा समाजमाध्यमांवर संदेश द्यायला कधीही मोबाईलचा वापर केला की त्याचा माग घेऊन ते ठिकाण आपोआप शोधून काढणारी यंत्रणा इस्त्रायलच्या या ६ व्या पिढीच्या युद्धतंत्रात वापरली जाते. तिथे सर्व कामे ॲटोमॅटिकली होतात, असे संदेश पकडले की ते कुठून आले त्याचा ठावठिकाणा यंत्राद्वारे आपोआप शोधला जातो आणि ॲटोमॅटिक यंत्रणाच त्याचा वेध घेऊन त्या त्या लक्ष्यावर


तोफगोळे, बॉम्ब, मिसाईलचा वर्षाव घडवून आणते. साहजिकच बिनदिक्कत अशा हल्यांत हजारो लोक मरण पावतात, अपंग होता, त्यांपैकी जवळजवळ एक तृतीयांशांची आजही ओळख पटवता आलेली नाही.


अशाच प्रकारच्या तंत्राचा उपग्रहाच्या सहाय्याने उपयोग करून इस्त्रायलने हमासचा सर्वोच्च नेता इस्माइल हनियेह यांना इराणमध्ये ठार मारले तर हिजबुल्लाचा लष्करप्रमुख फुआद शुकर यांची लेबाननची राजधानी बैरूत येथे हत्या केली.

त्यानंतरच्या म्हणजे सातव्या पिढीच्या युद्धतंत्राचा विकास करण्याचे काम तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ आज करताहेत ज्यामध्ये सर्व कामे यंत्रणाच परस्पर करतील, यांत्रिकपणे, विचारशून्यतेने. माणसाला जिथे जवळजवळ काहीच काम असणार नाही. हे युद्धतंत्र किती भयानक, पाशवी आणि सर्वसंहारक असेल याची नुसती कल्पनादेखील करता येणार नाही.

## जेरूसलेमच्या वंशसंहारांची इतिवृत्ते

जेरूसलेम या शहराभोवती केंद्रीत झालेल्या येथील प्रदेश लोक आणि वंश यांच्या आक्रमणे, संघर्ष तसेच अत्याचार व हत्याकांड यांची गेली साडेतीन चार हजार वर्षांपासून ते आजपावेते व आजही चालू असलेल्या घटनांची इत्यंभूत इतिवृत्ते इतिहासकारांच्या संशोधक व धर्म तथा समाजनिरपेक्ष वृत्तीतून मांडणारे एक ग्रंथवजा पुस्तक आहे, 'जेरूसलेम द बायोग्राफी' हे फिनिक्स या संस्थेने प्रकाशित केलेले लेखक सिमॉन सेबग मॉंटफिओर यांचे पुस्तक.



'सेमाईट' या एकाच वंशाची, भाषा व चालीरिती यांमध्येही विलक्षण साम्य असणारी अरब व ज्यू ही दोन भावंडे अशी, इतकी वेगळी कशी घडली, ज्यांची ७० टक्क्यांहूनही जास्त जनुके आजही समानच आहेत (जरी ज्यू लोक युरोप, पश्चिम आशिया, मध्य आशिया वगैरे भागात हिंसाचार व निर्गमनामुळे शेकडो वर्षे विखरून राहिले तरी) तरीही या दोघांमध्ये एवढी दरी कशी, याची साद्यंत माहिती हे पुस्तक देते. ज्यूंच्या आगमनापूर्वीचा इतिहास, त्यांच्यावर युरोपियन, इजिप्शियन, ग्रीक, रोमन व नंतर ख्रिश्चन व मुस्लिमांनी घातलेली बंधने, पदोपदी होत असलेल्या कत्तली, धर्मांध निर्बंध तथा चालिरीती तसेच मुस्लिम व युरोपियन कॅथॉलिक ख्रिश्चन यांच्यामध्ये जेरूसलेम शहराच्या (तेथील धार्मिक स्थळांच्या) मालकीबद्दल कित्येक शतके चाललेली धर्मयुद्धे या सर्वांचा इत्यंभूत इतिहास हे पुस्तक फार सुंदर आणि सोप्या भाषेत वर्णन करते.

या तब्बल सव्वासातशे पानी ग्रंथाची छपाई अन सजावट तर उत्तम आहेत, परंतु त्याला सुंदर रंगीत चित्रे व छायाचित्रे, नकाशे, आराखडे व तक्त्यांची जोड दिली आहे. सोबतीला भरपूर स्पष्टीकरणात्मक टीपा, अवतरणे तसेच पूरक माहिती आहे.

## इतिहासकार नऊ भागांत विभागणी

इसपूर्व साडेतीन हजार पासून सुरु होणाऱ्या व इसपूर्व १५०० च्या आसपास सविस्तर रूप धारण करणाऱ्या या ग्रंथराजाची विभागणी ऐतिहासिक तसेच विषय व विभागवार आणि कालानुक्रमे अगदी एकविसाव्या शतकापर्यंत अशी नऊ भागांमध्ये केली आहे. त्या प्रत्येक भागात सुसंगतपणे अशी उपविषयांची मांडणी केली आहे. त्यानुसार

भाग १ – जुडाइझम : ज्यू धर्माचा इतिहास, ज्यू लोकांचे आगमन, डेव्हिड, परकीय आक्रमणे व ज्यूंचे जबरदस्तीने निर्गमन पर्शियन, ग्रीक ते रोमन साम्राज्यापयंतचा भाग येशू ख्रिस्ताचा जन्म आणि ख्रिश्चन धर्माची सुरुवात हा भाग आहे.

भाग २ – पेगॅनिझम : अनेक देव–दैवते मानणारे धर्म.

भाग ३ – ख्रिश्चॅनिटी : ख्रिस्ती धर्मप्रसार, रोमन साम्राज्याचा अस्त.

भाग ४ – इस्लामचा उदय : म. पैगंबर, अरबांची विजयमालिका

भाग ५ – क्रूसडेल (धर्मयुद्धे): पोपच्या आज्ञेने आणि प्रेरणेने जेरूसलेममधील ख्रिश्चन धर्म व धर्मस्थळे वाचविण्यासाठी ख्रिश्चन उमराव व सैनिकांनी इस्लामधर्मीयांशी केलेली युद्धे व चढउतार.

भाग ६ – मामलुक (इस्लामी) राज्यकर्ते

भाग ७ – ओटोमन (सुलेमान) चढाया व लढाया

भाग ८ – साम्राज्य – नेपोलियनच्या चढाया विविध ख्रिश्चनपंथ

भाग ९ – झिऑनिझमचा (ज्यू) फेरउदय, कैसर, महायुद्ध

अरबांचा उठाव, ब्रिटिशांच्या ताब्यात जेरूसलेम व प. आशिया, अरबांचे बंड, ज्यूंचा स्वतंत्र देश– इस्त्रायल अरबांची आक्रमणे, सहा दिवसांचे युद्ध, अरब–इस्त्रायल–पॅलेस्टिनी चकमकी, इ. पुस्तकाचे लेखक हे केंब्रिज विद्यापीठात असून अनेक ऐतिहासिक व इतर पुस्तकांचे कर्ते आहेत. त्यांच्या या ग्रंथावर बीबीसी ने मालिका केली आहे.

**पुस्तकाचे नाव – जेरूसलेम द बायोग्राफी**
**लेखक – सिमॉन सेबग मॉंटफिओर**
**प्रकाशक – फिनिक्स, लंडन, पाने – ७२०**
**किंमत – ९.९९ पौंड (सुमारे ११०२ रुपये)**

■■

लोकसभेच्या निवडणुकीत आपण आपल्या पक्षाच्या उमेदवाराला निवडून दिल्याबद्दल सर्वप्रथम मी तुमचे आभार मानतो. विरोधी भाजप उमेदवाराकडे पैसा होता. दबावतंत्र वापरत होते. प्रशासकीय अधिकारीही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्यांचा प्रचार करत होते, असं कोणीतरी मला सांगितलं. तरीही येथील जनता, मतदार, कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी निष्ठेची साथ सोडली नाही. तुम्ही स्वाभिमानाला पाठिंबा दिला. त्यासाठी पुन्हा एकदा आपल्या सगळ्यांचे आभार आणि अभिनंदन. दिल्लीत बसून रणनीती ठरवणाऱ्यांना वाटलं, की विकत घेतलं की प्रश्न संपला. पण, त्यांना इथला शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचारांचं महत्त्व माहीत नाही. इतर राज्यात तुम्ही विकत घेऊ शकता. पण, आमच्या इथल्या मराठी मतदारांना तुम्ही कधीही विकत घेऊ शकत नाही, हे या निवडणुकीनं दाखवून दिलेलं आहे.

ते घाबरलेत, म्हणून आमदारकी पुढं पुढं ढकल्याचा प्रयत्न करत आ ह े त .

विधानसभेची निवडणूक पुढं ढकलली जात आहे. ते कुणाला घाबरलेत, तर ते तुम्हाला घाबरले आहेत. इथल्या स्वाभिमानी जनतेला भाजप घाबरलंय. महाराष्ट्रात पैसा वाटला किंवा नेत्यांना जेलमध्ये टाकलं, दडपशाही केली, भीती दाखवली, तरी ही मराठी माणसं कोणालाच घाबरत नाहीत. तुम्हाला हे नेते घाबरलेत म्हणून ते महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक पुढं ढकलत आहेत असं म्हणावं लागेल. कित्येक वर्षांपासून महापालिकांच्या निवडणुका घेतल्या गेलेल्या नाहीत. कारण, भाजपला विजयाचा आत्मविश्वासच वाटत नाही. या महाराष्ट्रात तीन महिन्यांनंतर आपल्या विचारांचं म्हणजे महाविकास आघाडीचं सरकार येणार म्हणजे येणारच, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

पवार साहेबांनी आपले ३५ खासदार निवडून येणार असं सांगितलं होतं. ठीक आहे, काही ठिकाणी पिपाणीमुळं आपली मतं दुसरीकडं गेली. पण तरीही आपण ३१चा आकडा गाठला. आता पवार साहेब काय म्हणतात, तर या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला कमीत कमी २२० जागा येणार म्हणजे येणार. काही दिवसांपूर्वी केंद्रातील एका अधिकाऱ्याची भेट झाली. त्यांनी मला आकडा विचारल्यानंतर



# राज्यात महाविकास आघाडीचं सरकार येणारच

**वरूड येथे २६ ऑगस्ट रोजी झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थितांना केलेले मार्गदर्शन...**

मी १५५ जागा निवडून येतील असं सांगितलं. ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी सांगितलं, की आम्ही जो केंद्राला अंतर्गत अहवाल पाठवला आहे, त्यामध्ये महाविकास आघाडीचे १८० आमदार निवडून येतील असं म्हटलं आहे. मला वाटतं, की त्यामुळंच ही निवडणूक पुढं ढकलली आहे. राज्यातलं महायुतीचं सरकार जनतेला घाबरलंय. मराठी माणसाच्या स्वाभिमानाला घाबरलंय. कारण, मराठी माणूस दिल्लीसमोर कधीच झुकत नाही.

अमरावती शहरात येण्यापूर्वी मी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मला सांगितलं, की महाविकास आघाडीचं वातावरण लय भारी आहे. मी म्हटलं, चांगलं आहे. पण, महायुतीचे नेते काय म्हणतायंत, आमदार काय म्हणतायंत. त्याच्यामध्ये एक अपक्ष आमदार आहे. ते म्हणाले, की त्यांचं मत आहे, शंभर कोटी लागो, दोनशे लागू, तीनशे लागू, कितीही लागू, मी खर्च करायला तयार आहे. मी म्हटलं, असं का म्हणतात. तर पत्रकारांनी सांगितलं, की खासदारकी तर गेलीच. आमदारकी गेल्यानंतर सगळंच संपेल. त्यांचे व्यवसाय काय आहेत हे तुम्हालाच माहिती. कुठं कुठं जमिनी आहेत. माहिती आहे ना तुम्हाला. ते सगळंच संपेल ना. मग त्यांच्याकडची लढाई कशासाठी आहे, तर अस्तित्वासाठी. अस्तित्व कुणाचं, तर त्यांचं, व्यवसायाचं. जे काही धंदे त्यांचे असतील ते.

आणि आपली लढाई कशाची आहे? स्वाभिमानाची आणि विचारांची लढाई आहे.

या परिसरामध्ये काहीतरी व्हावं असं तुम्हाला वाटतं की नाही? अमरावतीमध्ये गेल्या काही वर्षांत काय बदल दिसतो का? किती मोठ्या कंपन्या आणल्या इथं? नाही ना. म्हणजे आपल्या काळात आपण जी



एमआयडीसी आणली होती, तेवढीच एमआयडीसी आहे काय? यांच्या काळात आलंय तरी काय? मग यांना कसं निवडून द्यायचं. काही लोकांना पाट्या लावायची सवय असते. ठीक आहे, पण त्यांना आपला मतदारसंघ कुठून चालू होतो आणि कुठं संपतो एवढं तरी माहिती पाहिजे ना. मला असं कळलं, की बच्चू कडूंच्या मतदारसंघातली एक फॅक्टरी, तिथं इथले आमदार जाऊन पाट्या लावायला लागलेत. मग आता तुमच्याकडं एक चान्स आहे पाटी बदलायचा. म्हणजे आजीवरनं काय करायचं, तर माजी आमदार.

आज तुमच्या आई-वडिलांनी कष्ट करून तुम्हाला उच्चशिक्षित बनवलं. पण हाताला काम आहे का? अहो, २०१४पासून आतापर्यंत दहा लाख कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक महाराष्ट्राच्या भाजपाच्या नेत्यांनी गुजरातचे नेते जे दिल्लीत बसतात त्यांना खूश करण्यासाठी सगळी गुंतवणूक कुठं पाठवली? आता त्यातली काही इन्व्हेस्टमेंट इथं झाली असती, का नसती? नागपूरमध्ये टाटासारखे मोठे प्रोजेक्ट येणार होते. त्यातील टाटाचा एक जरी प्रोजेक्ट आला असता, तर २५ हजार लोकांना रोजगार मिळाला असता. अमरावतीमध्ये एखादी कंपनी आली असती, तर इथल्या मुलांना काम मिळालं असतं का नसतं? त्यातून १५ ते २५ हजार पगार मिळाला असता आणि तो पंधराशे रूपयांपेक्षा नक्कीच जास्त असता. पण, सरकार काय करतंय? पंधराशे रूपये देतंय आणि म्हणतंय आता खूश राहा. आमच्या मुलांना आज नोकऱ्या नाहीत. का, तर गुजरातची तुम्ही तिथं चमचेगिरी केली.

आता ही जी योजना आणली आहे, ती कॉपी करून आणली. पूर्वी काय असायचं, तर महाराष्ट्रामध्ये ज्या कुठल्या चांगल्या योजना आहेत, पहिलं महिला धोरण आपण दिलं, त्यानंतर मनरेगा, शेतीच्या पाण्याच्या योजना, पिण्याच्या पाण्याच्या योजना, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, महिला आयोग, कृषीची काही धोरणं आपल्या राज्यातले बाकीच्या राज्यांनी कॉपी केले. हा आपला स्वाभिमान होता. विचार होता. दूरदृष्टी होती आधीच्या नेत्यांची. पण, २०१४पासून एकतर नवीन योजना आणलीच नाही, पण आता दुसऱ्या राज्यातल्या, भाजपशासित राज्यातल्या योजना महाराष्ट्रामध्ये कॉपी करतात. का? त्यांना संदेश द्यायचांय, की महाराष्ट्र आता विचारच करत नाही. महाराष्ट्राकडं दूरदृष्टीच राहिली नाही. महाराष्ट्र आता मागास व्हायला लागलांय. गुजरात, मध्य प्रदेश पुढं चाललंय आणि म्हणून इलेक्शन डोळ्यासमोर ठेवून दुसऱ्या राज्यातल्या योजना घाईगडबडीनं कॉपी करतोय.

मुख्यमंत्री, पंतप्रधानांच्या सभेला पैसे देऊन गर्दी जमवली जात आहे. त्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना टार्गेट दिलं जातं. पण आपल्या सभांना स्वाभिमानानं स्वखर्चानं लोक येत असतात. म्हणून आपल्या सभा जोशवाल्या होत असतात. आता गुलाबी गँगही इथं येणार, अधिकाऱ्यांना टार्गेट देणार. सभा इथं होणार आणि त्या सभेवरती त्यांची अपेक्षा आहे, की महिलांना पंधराशे रूपये देऊन मतं मागायची. म्हणजे पैसा कोणाचा? तुमचा. तुमचा टॅक्सचा पैसा आपल्या राज्याच्या तिजोरीत जातो आणि हे काय करतात? गुलाबी यात्रा काढतात. त्याच्यावर मतं मागतात. आज सोयाबीन, कपाशीचे भाव घसरलेत. सोयाबीनचं उत्पादन घेणाऱ्या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याचं २५ हजार कोटीचं नुकसान झालंय. कपाशीमध्ये पंधरा हजार कोटीचं नुकसान झालं. शेतकऱ्याला कशाचेच पैसे मिळाले नाहीत. छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांना तरी कुठून पैसे मिळणार आहेत? अशा परिस्थितीत शेतकऱ्यांची मुलं त्यांच्या शाळा, कॉलेजची फी कशी भरणार? स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना तिथं आंदोलन करावं लागतं. युवा, शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्गियांच्या बाबतीत सरकार काहीच करत नाही.

महिलांच्या बाबतीत काय, तर दररोज महिलांवरती अत्याचार होतोय. त्यावर सरकारमधून कुणी काही बोलायला तयार नाही. आपण जेव्हा निषेध करतो, त्यावेळी मुख्यमंत्री साहेब म्हणतात, की तुम्ही राजकीय भूमिका घेता. अरे, आमच्या लहान बहिणीवर अत्याचार होत असेल आणि त्याबद्दल आम्ही आंदोलन करत असू, तर आम्ही राजकारण करतो? मग तुम्ही आंदोलन करता तेव्हा काय? छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात तुमचे नेते बोलले तेव्हा तुम्ही आंदोलन नाही केलं, जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान झाला, तेव्हा तुम्ही नाही बोलला. महात्मा फुलेंच्यावर कुणी काही बोललं तेव्हा तुम्ही शांत बसला आणि जेव्हा सावरकरांवर बोललं जातं, तेव्हा मोठ मोठं आंदोलन तुम्ही करता. सावरकर मोठे होते. पण हे सुद्धा मोठे आहेत ना.

आज कोकणात तिथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला. म्हणजे हे पैसे कुठं कुठं खातात हे बघा. मी पन्नास हजार कोटींचा भ्रष्टाचार या राज्यात झाल्याचं सगळ्यांना दाखवून दिलं. महाराष्ट्रात हे जे काय चाललंय ना, ते आपल्याला परवडणारं नाही. त्यामुळं येत्या काळात बऱ्याच योजना आपल्याला दाखवल्या जातील. पण त्यातलं काही खरं होणार नाही. यांना फक्त एकच गोष्ट पाहिजे आहे आणि ती म्हणजे लाडकी खुर्ची पाहिजे आहे. त्यामुळं त्यांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी लढायला सज्ज व्हा. यातून नक्कीच परिवर्तन होईल, असा विश्वास माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटतो. राम कृष्ण हरी!

■■




# गद्दारांना निवडणुकीत धडा शिकवू!

**हर्षवर्धन देशमुख**

महाराष्ट्रात महायुती सरकारच्या विरोधात जनतेच्या मनात प्रचंड उद्वेग व संताप आहे. ज्या पद्धतीने भाजपाने श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि श्री. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्ष फोडला, इतकेच नव्हे तर त्या पक्षाचे नाव, चिन्ह ही चोरले हे जनतेला अजिबात आवडले नाही व मनाला रूचलेही नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत जनतेने भाजपला आणि महायुतीच्या नेत्यांना चांगला जबरदस्त धडा शिकविला. चारशेपारचा त्यांचा नारा धुळीस मिळवून टाकला आणि ३०० जागांपर्यंतही त्यांना पोहचू दिले नाही. भारताचे संविधान बदलण्याचा आणि आरक्षण बदलण्याचा व मनुस्मृती लागू करण्याचा त्यांचा डाव मतदारांनी उधळून लावला. जनता व मतदार आता या विधानसभेच्या निवडणुकीत आपल्यालाही धडा शिकवून महाविकास आघाडीला सत्तेवर आणण्याची भिती महायुतीच्या नेत्यांना असल्यामुळेच त्यांनी लाडकी बहिण, लाडका भाऊ यांसारख्या अनेक योजना सरकारच्या तिजोरीमार्फत राबविण्याचा प्रयत्न चालविला आहे. मतदारांना एक प्रकारे लालूच दाखविण्याचा, प्रलोभन देण्याचा व अप्रत्यक्षरीत्या त्यांची मते १५०० रू. देवून खरेदी करण्याचा त्यांचा डाव आहे व तसे प्रयत्न त्यांनी चालविले आहेत.

पण जनतेला सत्य पूर्णपणे माहिती आहे. निवडणुक संपल्यानंतर या लाडकी बहिण, लाडका भाऊ या कोणत्याच योजनांची अंमलबजावणी होणार नाही. कारण सरकारच्या तिजोरीत तेवढा पैसाच नाही. अनेक विकास कामांना व योजनांना या लाडकी बहिणसाठी कात्री लावण्यात आलेली आहे. त्यामुळे सत्ताधारी आमदारांनीच मोठी बोंबाबोंब करण्यास सुरूवात केली आहे. कारण त्यांचा विकास निधी कमी झाला आहे व निवडणुकीच्या तोंडावर हा निधी कमी होणे वा न मिळणे म्हणजे अप्रत्यक्षरीत्या कमिशनला चाप लागण्यासारखे आहे. त्यामुळे महायुतीच्या आमदारांमध्ये प्रचंड असंतोष आहे. केंद्र व राज्य सरकारने कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांना व संत्रा बागायतदारांना हमी किंमत न देता वाऱ्यावर सोडून देऊन संकटाच्या खाईत लोटले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग तर सरकारविरुद्ध प्रखरपणे उभा आहे. हे सगळे वातावरण लक्षात घेऊन आपण या विधानसभेला महायुतीच्या उमेदवारांना व गद्दारांना धडा शिकवू या. त्यासाठी एकजुटीने कंबर कसून आता कामाला लागू या!



# लाडकी बहीण योजना निवडणुकीपर्यंतच

**डॉ. नीरज हातेकर**
नामवंत अर्थतज्ज्ञ

मध्यमवर्गाच्या जोरावर या योजना चालविल्या जातात असं म्हणता येणार नाही. कारण, कर तर सगळेच भरतात. अप्रत्यक्ष कर तर गरीब लोकही भरतात. म्हणजे करदाते तर सगळेच आहेत. एका ढोबळ मानानं असा विचार होऊ शकतो, की जर कर गरीबांकडनं येत असेल, तर त्यातून त्यांना प्राथमिकता देणं काय चुकीचं आहे? असा प्रश्न येऊ शकतो. पण, त्याचा थोडा साकल्यानं विचार झाला पाहिजे. या योजनेसाठी आपण ४६ हजार कोटी रूपये खर्च करणार आहोत. यावर्षी या योजनेसाठी ३५ हजार कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे पैसे उभेही राहू शकतात. त्यानं महाराष्ट्राच्या बजेटवर प्रचंड ताण येईल असं काही नाही. पण एक गोष्ट नक्की झालीय, की महाराष्ट्राची जी वित्तीय तूट आहे, ती पाच टक्क्याच्या आसपास आता आलेली आहे. साधारण साडेतीन टक्क्याच्या आसपास राहावी असे संकेत आहेत. त्यामुळं महाराष्ट्राची वित्तीय तूट वाढलीय हा भाग आहे. जेव्हा वित्तीय तूट वाढते त्यावेळी काय होतं, की दोन परिणाम होतात. एकतर सरकार बाजारातनं पैसे उचलते तूट भरून काढायला आणि त्यामुळं बाजारातल्या इतर लोकांना पैशाची उपलब्धता कमी राहते. गुंतवणूक करणाऱ्यांना. कारण व्याजदर वाढतात. बाजारातनं पैसा कमी होतो. कारण, सरकारनं वापरलेला असतो. याला क्राऊंडिंग आऊट असं अर्थशास्त्रेच्या भाषेत म्हणतात. म्हणजे सरकार पैसे उचलते, त्यावेळी खासगी उद्योगधंद्यांना पैशाचा तुटवडा भासतो.

त्याच्याहीपेक्षा मला महत्त्वाचं असं वाटतं, हे जे ४६ हजार कोटी रूपये आपण वापरणार आहोत, म्हणजे गरीब, गरजू महिलांना हातात पैसे मिळतायंत ही आनंदाची गोष्ट आहे. पण अर्थशास्त्रामध्ये अपॉर्च्युनिटी कॉस्ट ही एक संकल्पना आहे. प्रत्येक संसाधनाला एक पर्यायी उपयोग असतो. ज्यावेळी तो आपण एखाद्या गोष्टीसाठी वापरतो, त्यावेळी दुसरीकडं वापरू शकत नाही. तर खरी किंमत ही दुसरीकडं वापरू शकत नाही ती असते. त्याला अपॉर्च्युनिटी कॉस्ट म्हणतात. जर या ४६ हजार कोटी रूपयांची अपॉर्च्युनिटी कॉस्ट बघायची झाली तर साधा हिशोब केला, तर भारतामध्ये जितकी सगळी केंद्र विद्यापीठं आहेत, त्या घ्या, अधिक सगळ्या आयआयटी घ्या, अधिक सगळ्या आयआयएम घ्या, अधिक सगळे एम्स घ्या, त्या सगळ्यांचा एकूण खर्च हा साधारण ४४ हजार कोटी आहे. म्हणजे आपण या ४६ हजार कोटी रूपयांची अपॉर्च्युनिटी कॉस्ट काढायची म्हटलं, तर आपण या सगळ्या संस्था राज्यात उभ्या करून चालवू शकतो. म्हणजे आपल्या राज्यामध्ये अशा अनेक संस्था निर्माण होऊ शकतात. त्यामध्ये आपल्या मुलांना नक्कीच चान्स मिळणार असतो. यातनं जी प्रगती होऊ शकली असती, ती प्रगती आता होणार नाहीये. यातून तरूण मुला-मुलींचं नुकसान होणार आहे.

अशी योजना राबवणारं आपलं राज्य काही पहिलं नाही. २०२०पासून जवळपास दहा राज्यांनी हे केलंय. आपण जो जीआर काढलांय तो मध्य प्रदेशातल्या लाडली बहीणवरून उचलला आहे. पण त्यामध्ये उद्देश असा दिलांय की महिलांमध्ये ॲनिमियाचं प्रमाण जास्त आहे. महिलांना पंधराशे रूपये देण्याचा आणि ॲनिमियाचा कोणताही थेट संबंध नाही. ॲनिमिया हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न आहे. दुसरं आपण असं म्हटलंय, की महिलांचा लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट कमी आहे. म्हणजे महिलांची श्रमशक्ती ही रोजगारामध्ये रूपांतरित होत नाहीये. महाराष्ट्रात काम करू शकणाऱ्या शंभरपैकी फक्त २४ मुलीच आज लेबर मार्केटमध्ये आहेत. बाकीच्या शिकलेल्या असूनही घरीच बसून आहेत. म्हणजे जीआरमध्ये जी कारणं दिली आहेत आणि या ज्या स्कीम्स आहेत, यांचा काही संबंध नाहीये.

राष्ट्रीय नमुना चाचणी सर्व्हेक्षण हे दरवर्षी भारतातल्या ग्रामीण आणि शहरी भागामध्ये स्त्री आणि पुरूष काय रोजगार करतात, किती पैसे कमवतात, कुठल्या स्वरूपाची कामं करतात याची आकडेवारी गोळा करते. २०२२-२३ मध्ये शेवटचे सर्व्हेक्षण झालं. यामध्ये चार कामं दिलं आहेत. जसं पगारी नोकरी असणं, स्वत:चा काहीतरी लहान मोठा उद्योग असणं, तिसरं अनपेड फॅमिली वर्क, म्हणजे मी घरातच असतो, नोकरी करत नाही. मला मोबदलाही काही मिळत नाही. पण, नवऱ्याचं हॉटेल आणि त्याला माझा हातभार लागतो आणि चौथं हे डेली वेज आहे. आम्ही हे बऱ्याच राज्यांत शोधून काढलं आणि आम्हाला लक्षात आलं, की योजना राबविणारी ही जी दहा राज्यं आहेत, ती सर्व देशपातळीवर याच्या तळाशी आहेत. यामध्ये आंध्र प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली-एनसीआर आणि महाराष्ट्राचा समावेश आहे. म्हणजे आज भारतामधल्या १६ टक्के महिला या योजनेंतर्गत लाभ घेत आहेत. काही काही राज्यांचा जवळजवळ वीस टक्के खर्च हा या योजनांवर आहे.

महाराष्ट्राची लोकसंख्या साधारण सोळा कोटी पकडूया. साडेचार ही कुटुंबाची अव्हरेज साईज आहे. म्हणजे आपल्याकडे साडेतीनी कोटींच्या आसपास कुटुंबं असायला पाहिजेत. त्यातला अडीच कोटी महिला जर अर्ज करत असतील, तर त्यातले खरे अर्ज किती असतील आणि मग त्यांना जे पैसे मिळणार आहेत ते रिकव्हर कसे करणार आहोत हे स्पष्ट नाही. निवडणुकीनंतर जेव्हा या योजनेची स्क्रूटनी होईल आणि त्यामध्ये बऱ्याचशा महिलांना अपात्र ठरवले जाईल. कारण, उत्पन्नाची जी मर्यादा आहे, त्याच्यावरचे अर्ज बरेच आहेत. ही योजना दीर्घकाळ सातत्यानं चालू ठेवणं खूप अवघड दिसतंय. महिला बाल कल्याण विभागाचं एकूण बजेट ३३ हजार कोटींचं आहे, त्याच्यापेक्षा योजनेचा खर्च अधिक आहे. अख्ख्या देशाचं नरेगाचं बजेट ७२ कोटी असतं. हे आकडे भीतीदायक आहे. याला कारण लोकसभेमध्ये जे झालं, म्हणजे मागणी आणि पुरवठ्याचा जर आपण विचार केला, तर ही जी राज्यं आम्ही तळाला आहेत असं म्हणतो, या राज्यात महिलांची मागणी काय आहे याचा विचार केला जातोय. गंमत म्हणजे यातली बहुतेक राज्यं आर्थिकदृष्ट्या पुढारलेली आहेत असं आपण म्हणतो. पंजाबच्या ग्रामीण भागातही ही स्कीम राबवली जाते. यात एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती म्हणजे या राज्यांच्या ग्रामीण भागात सुबत्ता जरी दिसत असली, तरी तेथील महिला श्रीमंत नाहीयेत. महिलांचा वेज रेट कमी दिसतो.

**लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकार कधीपर्यंत चालू ठेऊ शकते? या योजनेसाठी तरतूद करण्यात आलेल्या खर्चातून महाराष्ट्र कायमस्वरूपी काय काय करू शकला असता? योजनेच्या या आणि अशाच वेगवेगळ्या प्रश्नांबद्दल अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. नीरज हातेकर यांच्याशी पत्रकार प्रशांत कदम यांनी बातचीत केली. या मुलाखतीत डॉ. हातेकर यांनी व्यक्त केलेली मते...**

आपण चुकीच्या गोष्टींचं अनुकरण करतोय. ज्या गोष्टी परवडणाऱ्या नाहीत, ज्या अत्यंत शॉर्ट टर्म हित आपल्या राज्याचं म्हणण्यापेक्षा आपल्या राज्यकर्त्यांचं हित, आपण खरं तर काय करतोय, जे लोक सत्तेत आहेत, ती पुढे पाच वर्षे आणखीन राहावीत या एकाच गोष्टीसाठी आपण ४६ हजार कोटीत ज्या इतर गोष्टी आपण करू शकलो असतो, त्या सगळ्यांचा बळी देतोय. हा चिंतेचा विषय आहे. याला कारणं काय आहेत, तर महाराष्ट्राची ग्रामीण अर्थव्यवस्था ही चांगल्या स्थितीत नाहीये. सरकारच्या जवळचे असणारे अर्थशास्त्रज्ञ सुरजित भल्ला यांनी एका जर्नलमध्ये लेख लिहिलांय. त्यात ते असं म्हणतायंत, की भारतात पूर्वी जी आपण दारिद्र्यरेषा वापरायचो, ती कालबाह्य झालेली आहे. कारण ती इतकी खाली आहे, की त्याखाली कोणी जगणे कठीण आहे. आपला देश बदललांय. आता आपण गरीब राष्ट्र राहिलेलो नाही. मध्यम उत्पन्नाचा देश झालो आहोत. त्यानुसार आपण दारिद्र्यरेषा वापरली पाहिजे असं त्यांचं म्हणणं आहे. ती साधारण ३.६० डॉलर पर्चेसिंग जी जागतिक बँकेनं दिलेली दारिद्र्यरेषा आहे.

ही दारिद्र्यरेषा घेऊन त्यांनी देशातल्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये अशी किती लोकं आहेत याचा अभ्यास केला. त्यामध्ये भारतातली २५ टक्के ग्रामीण लोकसंख्या ही या सुधारित दारिद्र्यरेषेखाली येते. महाराष्ट्राचं प्रमाण साडेसव्वीस टक्के आहे आणि बिहारची २३ टक्के आहे. म्हणजे आपण बिहारच्याही खाली आहोत. महाराष्ट्रातल्या महिलांचा जो मजुरीचा दर आहे, त्यापेक्षा बिहारमध्ये जास्त आहे. बिहारमध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण जास्त आहे आणि या स्त्रिया काय करतात, तर यातील बहुतांश स्त्रिया या प्राथमिक शिक्षिका आहेत. कारण, बिहारमध्ये भरती झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये जर नोकरी करणाऱ्या स्त्रिया बघितल्या, तर ग्रामीण भागातल्या स्त्रिया प्रामुख्यानं घरकामाची कामं करतात. ४० टक्के महिला या अनपेड वर्क करतात. त्यांना स्वत:ला पैसे मिळत नाहीत. नवऱ्याच्या कामात मदत करतात. केरळमध्ये ४४ टक्के महिला नोकरी करतात. महाराष्ट्रात नोकरी करणाऱ्या महिलांचा सरासरी पगार ८,९०० रूपये आहे. म्हणजे ग्रामीण भागामध्ये महिलांचं नोकरी करण्याचं प्रमाण, काम करण्याचं प्रमाण, डेली वेजचं प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळं महाराष्ट्रातल्या ग्रामीण महिलांची स्थिती फार वाईट आहे आणि पुरूषांचीही याच्यापेक्षा फार वेगळी नाहीये.

सरकार महिलांना जरी पैसे देत असलं, तरी सरकार ते वेगवेगळ्या मार्गानं काढूनही घेतं. आता मुलांच्या वह्या आणायला गेलात, तर त्यावर २४ टक्के जीएसटी आहे. यामध्ये सगळ्याच गटातल्या महिला येतात. त्यामध्ये कोणतीही कॅटॅगरी नाही. मुलाच्या वाढदिवसाच्या केकवर २० टक्के जीएसटी आहे. त्यामुळे रोजच्या ज्या जीवनावश्यक गोष्टी झालेल्या आहेत, त्यावर आपण कर भरतोच आहे. शाळांचे शुल्क भरमसाठ वाढलं आहे आणि सरकार यावर नियंत्रण आणत नसेल तर हे दीड हजार रूपये आपल्याला किती पुरणार? त्यामुळं हे ४६ हजार कोटी रूपये उत्तम शाळा काढण्यासाठी वापरले असते, तिथे चांगले शिक्षक नेमले असते आणि आपल्या मुलांना तिथे कमी शुल्कात प्रवेश मिळाला असता तर महिलांचं बजेट अधिक मजबूत झालं असतं. उत्तम शिक्षण व्यवस्था, उत्तम आरोग्य व्यवस्था उपलब्ध असेल तर याचा अधिक फायदा महिलांनाच होईल. हे जे पंधराशे रूपये महिलांना मिळतायंत, त्याच्यापेक्षा एक व्यक्ती आणि व्यवस्था म्हणून जी किंमत द्यावी लागतेय, याच्याबद्दलही आपण जागरूक असलं पाहिजे.






## लोकसभेत अल्पमत पण राज्यसभेत बहुमताच्या दिशेने

राज्यसभेच्या नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये भाजपला नऊ जागांचा लाभ झाला. यामुळे त्यांची राज्यसभेतील सदस्यसंख्या ९६ झाली आणि त्यांच्या आघाडीतील इतर मित्रपक्षांचे संख्याबळ लक्षात घेता ते ११८पर्यंत पोहोचले. म्हणजेच साध्या बहुमतासाठी त्यांना केवळ एका जागेची कमी आहे.

राज्यसभेतील सध्याची सदस्यसंख्या २३७ आहे. त्यामुळेच भाजप आणि मित्रपक्षांना मिळून ११८चे संख्याबळ गाठता आल्यास त्यांचे स्पष्ट बहुमत राज्यसभेत निर्माण होईल. राज्यसभेत सध्या जम्मू-काश्मीरचे चार सदस्य तसेच राष्ट्रपतिनियुक्त सदस्यांच्या चार जागा रिक्त आहेत. तसेच अन्य जागांवरील पोटनिवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

राज्यसभेचे पूर्ण संख्याबळ किंवा सदस्यसंख्या २४५ आहे आणि ते २५० पर्यंत वाढविता येण्याची तरतूद आहे. त्यामुळे भाजपला स्वबळाचे बहुमत प्राप्त करण्यास अवधी लागणार आहे आणि तोपर्यंत त्यांना राज्यसभेतही मित्रपक्षांवर म्हणजेच त्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीत सामील घटक पक्षांच्या पाठिंब्यावरच अवलंबुन रहावे लागणार आहे. यापूर्वी बिजु जनता दल तसेच वायएसआर काँग्रेसच्या मदतीने भाजपने राज्यसभेत विरोधी पक्षांचा यशस्वीपणे मुकाबला केला. परंतु आता हे दोन्ही पक्ष दुरावले आहेत आणि विरोधात गेलेले असल्याने भाजपला नवीन मित्र शोधावे लागले आहेत. तेलगु देशम आणि नीतीशकुमार यांचा संयुक्त जनता दल यांना पुन्हा आघाडीत घेऊन त्यांनी ही कमतरता भरुन काढली आहे.




याचा अर्थ येत्या काही दिवसात भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडून आणखी चार राष्ट्रपति नियुक्त सदस्यांच्या नावांची घोषणा केली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे राज्यसभेत भाजप आघाडीला निर्णायक बहुमत प्राप्त होईल.

यामुळे राज्यसभेत आता विधेयके संमत करण्यात भाजपला फारश्या अडचणीचा सामना करावा लागणार नाही. अर्थात राज्यसभेत बहुमत प्राप्त केलेले असले तरी लोकसभेत भाजपकडे स्वतःचे बहुमत नाही आणि जे मित्रपक्ष आहेत त्यांच्या अटींशी भाजपला सामना करावा लागत आहे.

अलीकडेच अर्थसंकल्पातील काही निर्णय तसेच वक्फ बोर्डाच्या विधेयकाबाबत भाजपला माघार घ्यावी लागली होती. भारतीय प्रशासकीय सेवेत म्हणजे नोकरशाहीत बाहेरुन थेट भरती करण्याच्या योजनेलाही स्थगिती देण्याची पाळी मोदी-शहांवर आली. त्यामुळे राज्यसभेतील बहुमताचा आनंद लोकसभेत मात्र हिरावला जात आहे.

तरीही यावर मात करण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत.

यासाठी विरोधी पक्षांमध्ये फोडाफोडी करण्याच्या कारवाया भाजपने सुरु केल्या आहेत.

एवढेच नव्हे तर त्यांचे मित्रपक्ष असलेल्या लोकजनशक्ति पक्षांसारख्या पक्षांमध्ये देखील फाटाफूट करण्याच्या

हालचाली भाजपच्या स्वघोषित चाणक्यांनी सुरु केल्याचे सांगितले जात आहे.

विरोधी पक्षांपैकी समाजवादी पक्ष हा भाजपच्या डोळ्यात खुपणारा पक्ष आहे. उत्तर प्रदेशात या पक्षाकडून भाजपला जो काही मार पडला आहे त्याच्या धक्क्याने झांजरलेले भाजपनेतृत्व अद्याप सावरलेले नाही.

त्यामुळेच खुनशीपणे ते हा पक्ष कधी आणि कसा फोडता येईल याच्या योजना तयार करीत असल्याचे सांगण्यात येते. समाजवादी पक्षाला ३५ जागा मिळाल्या आहेत. त्यातले वीस खासदार फोडता आले तरी भाजपचे संख्याबळ २६० पर्यंत पोहोचू शकते. म्हणजेच साध्या बहुमतापेक्षा १३ जागा कमी पडतील.

त्या १३ जागा मग इतर पक्षात फोडाफोडी करुनही मिळविता येतील असा या कारस्थानी मंडळींचा कयास आहे. थोडक्यात लोकसभेतही स्वबळाच्या आसुरी महत्वाकांक्षेला मूर्त रूप देण्याच्या तयारीत भाजप नेतृत्व असल्याचे कानोकानी आलेल्या माहितीनुसार समजते.

## अपशकुनी तारखांत बदल ?

महाराष्ट्र आणि झारखंड मधील विधानसभा निवडणुका वगळून फक्त हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्याचा वरुन आलेला आदेश पाळून निवडणूक आयोगाने ते पाळीव असल्याचे आणखी एकदा सिध्द केले खरे. परंतु त्या आदेशानुसार जाहीर केलेल्या तारखांमध्ये देखील त्यांना बदल करावा लागण्याची पाळी आली.

खोटारडेपणा आणि राजकीय स्वार्थाने प्रेरित कारवाया करताना काहीतरपी चूक होणारच ना ? त्यामुळे व्हायचा तो गडबडगुंडा झालाच आणि जाहीर केलेल्या तारखाही बदलण्याची नामुष्की पाळीव निवडणूक आयोगावर यावी हे केवढे दुर्दैव !

महाराष्ट्र, झारखंड आणि हरयाणा





या तीन राज्यांच्या विधानसभांची मुदत साधारणपणे एकमेकांच्या आसपासच संपत असूनही पाळीव आयोगाने महाराष्ट्र व झारखंडला बाजुला काढून फक्त हरयाणा व जम्मू-काश्मीरमध्येच निवडणुका घेण्याचे जाहीर केले. हे सर्व मुद्दाम आणि जाणूनबुजून करण्यात आले आहे व सत्ताधाऱ्यांना धार्जिणा असा हा निर्णय आहे. कारण या दोन राज्यांमध्ये सत्ताधाऱ्यांना ज्या गडबडी करावयाच्या आहेत त्या त्यांना योजनाबध्द रीतीने करता याव्यात यासाठीच या निवडणुका अशा वेगवेगळ्या करण्याचा निर्णय झाला असावा. अन्यथा स्वघोषित दैवी अंश असलेले अवतारी पुरुष तर सातत्याने एक देश एक निवडणूक असा घोष करीत असतात आणि तो ढोंगी घोष करताना त्यांचे श्रीमुख कधी दमताना दिसत नाही. उक्ति आणि कृति म्हणजेच कथनी आणि करणी यांच्यात मेळ नसलेली ही मंडळी आहेत आणि ती आता कोडगेपणाच्या अशा एका अंतिम टप्प्यावर आली आहेत की कोडगेपणा हा त्यांचा स्थायी आणि मूलभूत भाव किंवा स्वभाव होऊन गेलेला आहे. जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणूक तीन टप्प्यात होणार आहे आणि सप्टेंबरच्या मध्यापासून तेथे मतदान प्रक्रिया सुरु होईल आणि १ ऑक्टोबर रोजी अखेरच्या टप्प्यातील मतदान होईल. मूळ वेळापत्रकाप्रमाणे हरयाणातही १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार होते आणि दोन्ही निवडणुकांच्या मतमोजणीसाठी म्हणजेच निकालासाठी ४ ऑक्टोबरची तारीख निश्चित केलेली होती.

आता या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. आता फक्त जम्मू काश्मीरमधील मतदानच ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे होईल आणि १ ऑक्टोबर रोजी तेथील मतदानाच्या फेऱ्या संपतील. मात्र त्यांची मतमोजणी आता ८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. म्हणजेच केंद्राचे शासन चालू असलेल्या या केंद्रशासित प्रदेशातील मतमोजणीत वाटेल त्या गोष्टी करण्यासाठी सत्ताधाऱ्यांना पूर्ण आठवडा लाभणार आहे.

हरयाणात आता १ ऑक्टोबर ऐवजी ४ ऑक्टोबरला मतदान होईल




आणि मतमोजणी नव्या तारखेला म्हणजेच ८ ऑक्टोबरला होईल. हरयाणात बिश्नोई समाज आहे आणि त्यांच्या समाजातील संत आणि गुरु जांभेश्वर यांचा स्मृतिदिन २ ऑक्टोबरला आहे. या दिवशी बिश्नोई समाजातील श्रध्दाळू मोठ्या संख्येने राजस्थानातील बिकानेर जिल्ह्यातील त्यांच्या जन्मगावी जमत असतो. असोज अमावस्येच्या दिवशी हा स्मृतिदिन पाळला जातो आणि ही अमावस्या २ ऑक्टोबरला असल्याचे या समाजातर्फे निवडणूक आयोगाच्या निदर्शनाला आणून दिल्याने त्या समाजाच्या भावनांची जपणूक करण्यासाठी मतदानाची तारीख बदलण्यात आल्याचे कारण देण्यात आले आहे.



हरयाणाची लोकसंख्या तीन कोटिंच्या आसपास आहे. त्यामध्ये बिश्नोई समाजाचे प्रमाण एक टक्क्यांहून देखील कमी आहे. परंतु भाजपने हरयाणात बिगर जाट समाजांना एकत्र करुन जाटांच्या वर्चस्वाला आव्हान देण्याचे राजकारण गेली दहा वर्षे केले आहे. मनोहरलाल खट्टर हे बिगर जाट पंजाबी मुख्यमंत्री होते आणि आताचे मुख्यमंत्री देखील नवाबसिंग सैनी हे अन्य मागासवर्गीय आहेत.

दुसरीकडे काही अंधश्रध्द मंडळींच्या म्हणण्यानुसार २ ऑक्टोबरला अमावस्या आहे म्हणजेच त्या दिवशी श्रध्दपक्ष संपतो त्यामुळे १ ऑक्टोबरचे मतदान हे श्राध्दपक्षातच झाले असते ते फारसे चांगले ठरले नसते. त्यामुळेही तारीख बदलण्यात आल्याचे सांगण्यात येते.

थोडक्यात हरयाणातील निवडणुकीला कोणत्याही प्रकारे अपशकुन होणार नाही याची धडपड सत्ताधारी करीत आहेत. याचे कारण त्यांना हरयाणात यशाची खात्री वाटेनाशी झाली आहे. त्यामुळेच अगदी अत्यल्प असलेल्या बिश्नोई समाजाच्या भावनांचीही कदर करण्याचा आव सत्ताधारी आणत आहेत.

हरयाणातील जाट समाज हा भाजपला कितपत साथ देईल याबाबत शंका आहेत. विशेषतः गेल्या दहा वर्षात जाट समाजाला दुय्यम स्थान देण्याचे



राजकारण भाजपने केले आहे ते आता त्यांच्या अंगाशी येण्याची स्थिती निर्माण झाली आहे. महिला कुस्तीगीर विनेश फोगटचे ऑलिंपिक पदक प्रकरण ताजे आहेच परंतु भाजपच्या महान नेत्या कंगना रानावत यांनी शेतकरी आंदोलनात बलात्कार, हिंसा केली जात होती आणि भाजप केंद्रीय नेतृत्व मजबूत नसते तर त्यांनी भारताचा बांगला देश केला असता असे त्यांनी म्हटले होते. हे आंदोलन प्रामुख्याने जाट शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली झाले होते आणि त्यामुळेच जाट समाज खवळलेला आहे. आता भाजप नेतृत्वाला भयाची जाणीव झाली असून पराभवापासून वाचविण्यासाठी त्यांची ही केविलवाणी धडपड सुरु आहे.

## चिराग पास्वान यांचा साहसवाद

नरेंद्र मोदी यांचा मी हनुमान आहे असे गर्वाने सांगणाऱ्या चिराग पास्वान यांनी त्यांच्या रामाच्या विरोधातच भूमिका घेतल्याने राजकीय क्षेत्रात त्याची चर्चा अजुनही आहे.

केवळ राजकीय वर्तुळातच नव्हे तर त्यांच्याबद्दल खुद्द भाजपमध्ये देखील नाराजी निर्माण झाली आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत भाजपने चिराग यांचे काका आणि दिवंगत नेते रामविलास पास्वान यांचे बंधू पशुपतिनाथ पारस यांना धक्क्याला लावले आणि चिराग यांच्याशी हातमिळवणी केली. त्याला यशही मिळाले. चिराग यांच्या गटाचे पाच खासदार लोकसभेत निवडून आले. त्यामुळे चिराग यांना कॅबिनेट मंत्रीपदही मिळाले.



परंतु अलीकडे वक्फ बोर्डाच्या जमीनींबाबतच्या प्रस्तावित कायद्याचे विधेयक, नोकरशाहीमध्ये बाहेरच्या व्यक्तींना थेट नेमण्याचा निर्णय असो किंवा अनुसूचित जातींच्या आरक्षणात पोटवर्ग किंवा उपवर्ग निर्माण करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असो यासारख्या मुद्यांवर त्यांनी जाहीरपणे विरोधाची भूमिका घेतली.

अर्थात या गोष्टींना विरोध करणारे ते एकटे नव्हते. नीतीशकुमार, चंद्रबाबू नायडू हेही होते. त्यामुळेच सरकारला यावर माघार घ्यावी लागली. वक्फ बोर्डाबाबतचे विधेयक संयुक्त समितीकडे विचारासाठी पाठविण्यात आले. नोकरशाहीमध्ये थेट बाहेरच्या व्यक्तींना प्रवेश देण्याची योजना स्थगित करण्याची पाळी सत्ताधाऱ्यांवर आली.

गेली दहा वर्षे मनमानी करणाऱ्या सत्ताधीशांना अशी माघार घेणे हे अत्यंत त्रासदायक होते कारण हुकुमशहांना माघार घेणे मानवणारे नसते. ते त्यांच्या पचनीच पडत नाही आणि मग ते काहीतरी वेगळे मार्ग शोधू लागतात.

चिराग पास्वान यांच्या या साहसवादामुळे आतल्याआत संतप्त झालेल्या सत्ताधाऱ्यांनी त्यांना डिवचण्यासाठी नवीन चाल खेळायला सुरुवात केली.

तत्काळ केंद्रीय गृहमंत्री उर्फ भाजपचे स्वघोषित चाणक्य यांनी चिराग यांचे काका पशुपतिनाथ पारस यांना भेटीसाठी बोलावले. दोघांमध्ये चर्चा झाली. पशुपतिनाथ यांनीही ते भाजपवर नाराज नसल्याचे जाहीर केले.



दुसरीकडे पाळीव माध्यमांनी चिराग पास्वान यांच्या पक्षातील खासदार (पाच) भाजपनेतृत्वाच्या संपर्कात असल्याच्या बातम्या चालविण्यास सुरुवात केली. यातून चिराग पास्वान यांच्या पक्षात फूट पडू शकते अशा आशयाच्या बातम्याही पसरविण्यात आल्या.

भाजपच्या वर्तुळातूनही चिराग यांना दूषणे देण्याचे प्रकार सुरु झाले.

केवळ पाच खासदारांच्या जिवावर चिराग फार उड्या मारु लागल्याचे भाजपचे लोक बोलू लागले. बहुमतासाठी भाजपला या पक्षांवर अवलंबुन रहावे लागत असल्यानेच ही स्थिती आल्याचे भाजपचे लोक बोलू लागले. त्यांनी नोकरशाहीतील बाहेरच्या नेमणुकांना केलेला विरोध किंवा वक्फ बोर्ड विधेयकाबाबत घेतलेली भूमिका यामुळे विरोधी पक्षांना व विशेषतः राहूल गांधी यांना आयते कोलीत मिळाले अशी भावना भाजपमध्ये व्यक्त होत आहे.

दरम्यान, चिराग यांनीही थोडीफार माघार घेत असल्याचे दाखविण्यास सुरुवात केली.

वक्फ बोर्डाचे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविणे ही सरकारचीच भूमिका आहे आणि आपण त्याचेच अनुसरण केल्याचे ते सांगू लागले. तसेच मोदी आणि आपण हे अविभक्त आहोत, आपण मोदींपासून विभक्त होऊच शकत नाही आणि जोपर्यंत मोदी पंतप्रधानपदी आहेत तोपर्यंत आपण त्यांना सोडून जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे त्यांनी सांगून टाकले.

अर्थात त्यांच्या या बोलण्याने भाजपचे फार काही समाधान झाले आहे असे नाही. परंतु चिराग हे फार उड्या मारु लागले तर त्यांना वेसण घालण्याचे अनेक उपाय भाजपच्या नेत्यांनी मनातच योजून ठेवले आहेत.

चिराग हेही काही धुतल्या तांदुळासारखे नाहीत आणि काही प्रकरणे त्यांच्याही विरोधात आहेत. ती प्रकरणे उजेडात आणण्याची कारवाई झाल्यास चिराग यांचा चिराग म्हणजेच दिवा विझण्यास वेळ लागणार नाही.

## झारखंडमध्येही भाजपची फूटनीती निकामी होणार

इतर राजकीय पक्षांमध्ये फूट पाडण्याची कूटनीती अवलंबिणाऱ्या भाजपला आतापर्यंत केवळ यश माहिती होते. परंतु या फूट आणि कूटनीतीलाही मर्यादा असते आणि हे असले प्रकार अति झाल्यास त्यांची देखील माती झाल्याखेरीज रहात नाही याचे भान भाजपला राहिलेले नाही.

देशात सर्व राज्यांमध्ये केवळ आपलीच सत्ता असावी, एकछत्री अंमल असावा या राक्षसी महत्वाकांक्षाने पछाडलेल्या भाजपने सारासार विवेक गमावलेला आहे.

त्याचीच प्रचीती आता झारखंडमध्ये त्यांना येत आहे.

झारखंडमध्ये झारखंड मुक्ति मोर्चा आणि काँग्रेसचे संयुक्त सरकार गेली पाच वर्षे आहे. महाराष्ट्र आणि हरयामाबरोबरच झारखंडमध्येही विधानसभा निवडणुका असतात. परंतु भाजपच्या फूटनीती व कुटिल संस्कृती..... नव्हे विकृतीनुसार एकत्रित निवडणुका घेण्याची त्यांना ॲलर्जी आहे. फक्त एक देश एक निवडणुकीचा ढोंगीपणा त्यांना करता येतो. तर झारखंड आणि महाराष्ट्रातील निवडणुका ते हरयाणाबरोबर न घेता नोव्हेंबरमध्ये घेण्याची शक्यता आहे.

म्हणजेच आता दोन्ही राज्यातील सरकारांसाठी केवळ दोन महिन्याचा अवधी राहिलेला आहे.

परंतु तेवढाही दम न निघालेल्या भाजपने हेमंत सोरेने यांचे काका आणि झारखंड मुक्ति मोर्च्याचे एक नेते चंपई सोरेने यांना फोडले. ते त्यांच्या पाच समर्थकांसह भाजपमध्ये सामील झाले.

हेमंत सोरेने जेव्हा कथित प्रकरणांमध्ये तुरुंगात होते तेव्हा त्यांनी रीतसर राजीनामा देऊन काका चंपई सोरेन यांच्याकडे मुख्यमंत्रीपद विश्वासाने सोपविले होते.

तुरुंगातून सुटका झाल्यानंतर आमदारांच्या मागणीवरुन हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि चंपई सोरेन यांना पायउतार व्हावे लागले.

झाले, त्यांचा पापड मोडला.

केवळ पुतण्याला राजकीय सूडबुध्दीने तुरुंगात जावे लागल्यामुळे आयत्या मिळालेल्या मुख्यमंत्रीपदाने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांची महत्वाकांक्षा गगनाला गवसणी घालू लागली. ते बिथरले आणि त्यांच्या






बिथरण्याची प्रतीक्षेत असलेल्या भाजपने बरोब्बर त्यांना गळाला लावले.

सुरुवातीला चंपई सोरेन यांनी ते स्वतःचा वेगळा पक्ष स्थापन करतील आणि मग भाजपबरोबर विधानसभेसाठी आघाडी करतील अशी घोषणा केली.

परंतु मध्येच काय आणि कोणत्या कळी फिरल्या कोण जाणे. त्यांनी एकदमच ते थेट भाजपमध्येच प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले व ३० ऑगस्टला ते भाजपमध्ये सामील झाले.

आता या कोलांट उड्या मारुन आपल्याला राजकीय लाभ मिळेल अशा सुखस्वप्नात भाजप दंग आहे. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे याचे भान त्यांना राहिलेले नाही.

एकतर ठेच लागूनही शहाणपण न येणारी सध्याची भाजपनेतृत्वाची कोडगी जमात आहे.

महाराष्ट्रात फोडाफोड करुन काय मिळाले याचे लख्ख उदाहरण लोकसभेच्या निवडणुकीत दिसून येऊनही भाजपच्या स्वघोषित चाणक्यांना शहाणपणा सुचताना दिसत नाही.

चंपई सोरेन यांनी वेगळा पक्ष स्थापन करण्याची घोषणा करेपर्यंत त्यांचे

समर्थक काही प्रमाणात शांत होते. परंतु थेट भाजपमध्ये प्रवेश करण्याने आता त्यांच्याबरोबर भाजपवासी होण्यातला उत्साह संपलेला आहे. याला काही कारणे आहेत.

भाजपने झारखंडमध्ये बिगर आदिवासी मुख्यमंत्री लादून तेथील आदिवासींना प्रचंड प्रमाणात दुखावले आहे. त्यामुळेच गेल्या विधानसभा निवडणुकीत आदिवासी भागातील २८ जागांपैकी केवळ दोन जागांवर भाजपला विजय मिळू शकला होता.

संथाल परगणा, छोटा नागपूर, कोल्हान या आदिवासी जिल्ह्यांमध्ये भाजपचा सफाया झाला होता.

आता एवढा मार खाऊनही भाजपने केवळ फोडाफोडीच्या आधारे राजकारण करायचे ठरविल्यास त्याची



आणखी वाईट प्रतिक्रिया होत असल्याचे चित्र आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ज्या भाजपने आदिवासी अस्मितेलाच नगण्य लेखून बिगर आदिवासी व्यक्तीला मुख्यमंत्री म्हणून लादले त्या भाजपमध्ये चंपई सोरेन यांनी प्रवेश करणे आदिवासींना खपलेले नाही व त्यामुळे त्यांना त्यांच्या सरायकेला मतदारसंघातही पराभवाशी सामना करावा लागू शकतो असे बोलले जात आहे.

चंपई सोरेन यांनी आदिवासी सन्मान व अस्मिता यासाठी स्वतंत्र पक्ष काढणे एकवेळ या आदिवासींनी मान्य केले असते परंतु अदिवासींशी प्रतारणा करणाऱ्या भाजपमध्ये प्रवेश करुन त्यांनी उरलीसुरली साहनुभूती देखील गमावलेली आहे असे सांगण्यात येते.

दुसरीकडे झारखंड मुक्ति मोर्च्याने आदिवासी अस्मितेचा मुद्दा प्रभावपणे मांडण्यास सुरुवात केली आहे.

हेमंत सोरेन यांच्याविरुध्दचे आरोप सिध्द होत नसल्याने त्यांची सुटका झाली ही बाब आदिवासींच्या लक्षात आली असून हेमंत सोरेने हे केवळ राजकीय सूडाचा बळी असल्याची बाबही आता सार्वत्रिक होऊ लागली आहे.

परिणामी झारखंड मध्ये देखील भाजपच्या या फूट आणि कूटनीतीचा पराभव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच्याच जोडीला बाहेरच्या राजकीय व्यक्तींना पक्षात घेऊन त्यांना प्राधान्य देण्याच्या राजकारणानेही भाजपला पक्षांतर्गत दगाबाजीचा फटका बसण्याची शक्यता असल्याचे भान राहिलेले नाही. त्यामुळेच आता भाजपचे हे फूटनीतीचे राजकारण आता फसत चालल्याचे चित्र निर्माण होताना दिसत आहे.

महाराष्ट्रात ते फसले व लोकसभेला भाजपला मार पडला.

आता झारखंडमध्येही त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे.

## स्वप्नात पाहिले जे ते होऊ देत प्रत्यक्षी

एक नाट्यगीत आहे.

स्वप्नात पाहिले जे ते राहू देत स्वप्नी, ते सत्य स्वप्नरंगी मी ऐकिले सुरांनी.......... !

नाट्यगीत अतिशय उत्कट आहे. त्यामुळे खरे तर त्याचा वापर राजकीय कहाण्यांसाठी करावा अशी इच्छा होत



नाही. परंतु राजकारणाचे रंगही विविध असतात आणि राजकारणीही बहुरुपी व बहुरंगी असतात व त्यामुळेच या सुंदर नाट्यगीताचाही वापर करण्याच मोह आवरता येत नाही.

अलीकडेच दिल्लीतले एक महानगर परिषद सदस्य राम चंदर यांनी आम आदमी पार्टीमध्ये घरवापसी केली.

काही दिवसांपूर्वीच त्यांनी





भाजपमध्ये प्रवेश केला होता परंतु त्यांना काय उपरती झाली कुणास ठाऊक त्यांनी नुकतीच घरवापसी केली.

घरवापसीचे कारण मात्र त्यांनी एकदम भन्नाट सांगितले आणि त्याने सर्वांचेच मनोरंजन झाले नसते तरच नवल.

ते म्हणाले की ते झोपले असताना त्यांच्या स्वप्नात दिल्लीचे मुख्यमंत्री अऱविंद केजरीवाल आले आणि त्यांनी त्यांना चांगले झापून काढले. उठल्यानंतर मला माझ्या चुकीचा पश्चाताप झाला आणि मी घरवापसीचा म्हणजेच पुन्हा आम आदमी पार्टीत प्रवेशाचा निर्णय केला. मुष्टियोध्दा विजेंद्रसिंग याची कहाणीही काही वेगळी नाही. त्याने अलीकडेच काँग्रेसचा त्याग करुन भाजपमध्ये प्रवेश केला.

हरयाणा विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्याने बहुधा असेल परंतु त्यालाही अशीच काहीशी उपरती झाली.

भाजपमध्ये प्रवेशाचे कारण सांगताना त्याने सांगितले की तो झोपलेला होता आणि झोपेतून जागे झाल्यानंतर अचानक त्याला अशी तीव्रतेने जाणीव झाली की त्याने भाजपमध्ये प्रवेश करणे अनिवार्य आहे आणि त्यानंतर त्याने भाजपमध्ये प्रवेश केला. ही झोपही आणि झोपेत पडणारी स्वप्नेही जादूचीच म्हणावी लागतील. झारखंडमधील आदिवासी नेते चंपई सोरेन यांनीही नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांनी अशी काही जादूची झोप लागली होती काय किंवा त्यांना असा स्वप्नातून आदेश झाला काय अशी चर्चा होऊ लागली.

परंतु त्यांनीही दिल्लीला ते खासगी कामासाठी आले होते आणि त्यांना चष्मा करुन घ्यायचा होता म्हणून ते



दिल्लीत थांबले असे सुरुवातीला सांगितले होते.

बहुधा दिल्लीतला चष्मा घासल्यानंतर त्यांना जी दिव्यदृष्टी प्राप्त झाली त्यामुळे त्यातूनच त्यांना भाजपप्रवेशाची प्रेरणा मिळाली असावी.

पक्षांतर करणार किंवा पक्षबदलू हे विलक्षण असतात.

एका काँग्रेसनेत्याने पक्ष सोडून पुन्हा काँग्रेस प्रवेश करताना सोनिया गांधी या त्यांच्या आई आहेत आणि आईपासून एकादे मूल रागावून दूर जाते परंतु पुन्हा आईकडेच येते तसेच आपण पुन्हा काँग्रेसमध्ये आलो आहोत असे सांगितले होते. धन्य ते पक्षबदलू !

## समाजवादाची आठवण

जनता दल (सेक्युलर) किंवा धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे पुत्र कुमारस्वामी हे केंद्रात मंत्री आहेत.

त्यांच्याकडे पोलाद आणि सार्वजनिक अवजड उद्योग खाते आहे.

कुमारस्वामी हे त्यांचे पिता एचडी देवेगैडा यांच्या तालमीत तयार झालेले आहेत. देवेगौडा हेजुन्या जमान्यातले राजकीय नेते आहेत.

अजुनही त्यांच्या मनावर समाजवादी विचारांचा पगडा आहे.

त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या कुमारस्वामी यांच्यावरही त्या विचारांचा प्रभाव असणे स्वभाविक आहे.

त्यांच्या वडिलांनी नेहमीच सशक्त व कार्यक्षम सार्वजनिक उद्योगांचा पुरस्कार केला होता किंवा सार्वजनिक उद्योगाचे ते समर्थक होते. त्यामुळेच कुमारस्वामी यांनी सध्याच्या





राजवटीत लयास चाललेल्या सार्वजनिक उद्योगांना कसे वाचवता येईल यासाठी धडपड चालविल्याचे चित्र दिसत आहे.

सर्वप्रथम त्यांनी सार्वजनिक उद्योगातील निर्गुंतवणुकीला विरोध करुन ती रोखण्याचे काम सुरु केले आहे.

बहुधा त्यामुळेच यंदाच्या अर्थसंकल्पात निर्गुंतवणुकीसाठीच्या प्रक्रियेला काहीसे पिछाडीवर ठेवण्यात आले आणि त्यातून महसूल मिळविण्याच्या प्रक्रियेलाही आस्तेकदम राखण्यात आले असावे.

आता कुमारस्वामी यांनी आजारी पडलेल्या सार्वजनिक उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी पावले उचलण्यासाठी तयारी केल्याचे समजते. यासंदर्भात त्यांनी मंत्री झाल्यापासून अधिकाऱ्यांबरोबर जवळपास पन्नासहून अधिक बैठका केल्याची माहिती मिळते.

आता सार्वजनिक किंवा सरकार उद्योगाची कल्पनाच ज्यांना असह्य वाटते आणि ज्यांना अमान्य आहे अशा पंतप्रधानांना कुमारस्वामी यांचे हे उद्योग कितपत पचनी पडतील किंवा रुचतील असा मोठा प्रश्न आहे.

यापूर्वी त्यांनी एका सार्वजनिक अवजड उद्योग मंत्र्याला भर मंत्रिमंडळ बेठकीत झापताना सरकारला नसत्या उद्योगात गुंतून पडण्याची गरज नाही असे सुनावले होते आणि उद्योगांच्या खासगीकरणाचे आपले उद्दिष्ट असल्याचे आणि ते पार पाडण्यास सांगितले होते.

आता सरकार पाठिंब्यावर परावलंबी असताना पंतप्रधान हा करारी बाणा दाखविणार काय असा प्रश्न आहे.

बघू काय होते ते !

## भाजपचा फुसका बार

कर्नाटकात मुख्यमंत्री सिद्रामय्या यांना पूर्वी कधीतरी एक भूखंड देण्याच्या निर्णयावरुन भाजपने रान उठविले आहे.

सिद्रामय्या यांच्या चौकशीलाही राज्यपालांनी म्हणजेच भाजपच्या कर्नाटकातील एजंटांनी परवानगी देखील देऊन टाकली आहे.

यानिमित्ताने भाजपने सिद्रामय्या आणि त्यांचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांच्यातील पूर्वापार असलेली फूट रुंदावण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

याठिकाणी हे लक्षात घ्यावे लागेल की कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीत शिवकुमार यांनी प्रदेश अध्यक्ष या नात्याने मेहनत घेतली होती आणि स्वाभाविकपणे त्यांनी मुख्यमंत्रीपदावर हक्क सांगितला होता.

त्यावेळी त्यांच्याविरुध्द काही प्रकरणे काढून त्यांना काँग्रेसमधून फोडण्याचा प्रयत्न भाजप नेतृत्वाने केला होता. पण ते यशस्वी झाला नाही.

शिवकुमार यांना उपमुख्यमंत्रीपद देऊन शांत करण्यात काँग्रेसला यश आले.

आता या नव्या प्रकरणाच्या निमित्ताने पुन्हा भाजपने सिद्रामय्या आणि शिवकुमार यांच्यात फाटाफूट होऊ शकते काय यासाठी प्रयत्न करुन पाहिले.

दुर्दैवाने भाजपचा हा प्रयत्नही फसल्यात जमा आहे. हे प्रकरण बाहेर काढल्यानंतर शिवकुमार हे सर्वप्रथम सिद्रामय्या यांच्या समर्थनासाठी धावून आले आणि त्यांनी भाजपवर टीकावर्षाव केला. हे पाहून भाजपला आपला डाव यशस्वी होत नसल्याची जाणीव झाली असावी.



तूर्तास भाजपची मंडळी शांत झाली आहेत. जित्याची खोड मेल्याखेरीज जात नाही. भाजपची ही काड्या करण्याची सवय अशीच आहे.

# वाढते बलात्कार समाजाच्या मूल्य प्रणालीतील अपयश

मनाली भिलारे



दिल्लीतील निर्भयावर झालेला अत्याचार, मणिपूरमध्ये महिलेची झालेली विटंबना, कोलकत्त्यातील वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टर युवतीची अत्याचारानंतर झालेली हत्या आणि पाठोपाठ बदलापूरमध्ये दोन चिमुरड्यांबाबत झालेला घृणास्पद प्रकार...या प्रकारांनी समाजमन विचलित झाले आहे. या घटनांबाबत निर्माण झालेला जनक्षोभ हा उत्स्फूर्त होता, हे बदलापूरमधील घटनेतही दिसून आले. गेल्या काही दिवसांत प्रगत आणि समृद्ध समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातही महिला, मुलींवरील अत्याचारांच्या घटनांत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाल्याचे प्रशासकीय आकडेवारीच सांगत आहे. एकिकडे लाडक्या बहिणीसारख्या योजनेचे गोडवे गायले जात असताना, या बहिणींच्या असुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शाळकरी मुली आणि महाविद्यालयीन युवतीचेंही पालक धास्तावले आहेत.

समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आणि विकृत, गुन्हेगारी प्रवृत्तींच्या व्यक्तिंना कायद्याने जरब बसणे समाज हितासाठी अत्यावश्यक आहे. त्यात पोलिस यंत्रणेची मोठी भूमिका आहे. पोलिसांची समाजात दहशत नव्हे तर, धाक असला पाहिजे. त्यासाठी सातत्याने प्रयत्न आवश्यक आहेत. एखादी घटना झाली की, त्यावेळी जनक्षोभ कमी करण्यासाठी होणाऱ्या उपाययोजना कुचकामी असतात, हे गेल्या काही वर्षांतील सलग घडलेल्या घटनांतून दिसून आले आहे. महिलांवरील अत्याचार थांबत नाहीत, या मागील कारणांचा आणि उपायांचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नाही तर ती खोलवर रुजलेल्या सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब आहे. या संकटाला सामोरे जाण्यासाठी सत्ताधारी पक्षाने नागरिकांना विश्वासात घेऊन पोलिस, न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजेत. महिलांना सन्मानाने, भयमुक्त जीवन जगण्याचा हक्क आहे आणि हा हक्क सुरक्षित ठेवणे हे केंद्र आणि राज्य सरकारचे कर्तव्य आहे. बलात्काराविरोधातील लढा हा केवळ न्यायासाठीचा लढा नाही; तो महिलांच्या सन्मानाचा व त्यांच्या मूळ अधिकारांचा लढा आहे, हे कायमच लक्षात ठेवले पाहिजे.

महिलांवरील अत्याचारांचे स्वरूप केवळ शारीरिक हिंसेपुरते मर्यादित नाही. मानसिक, आर्थिक, सामाजिक आणि लैंगिक अत्याचारांचाही समावेश होतो. या विषयावर अधिक आत्मचिंतन आणि समाजाच्याही जबाबदारीची चर्चा करणे आवश्यक आहे. महिला अत्याचाराची समस्या केवळ व्यक्तिगत पातळीवर न राहता, ती समाजाच्या प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. आपल्याला समाज म्हणून विचार करण्याची गरज आहे की अशा घटना का घडतात? कशामुळे या घटना पुन्हा पुन्हा घडत राहतात? आपण आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष करतो का? आपण महिलांच्या समस्यांकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? समाजाच्या सर्वच स्तरांवर, महिला अत्याचारांच्या प्रश्नांबाबत कितपत जागरूकता आहे ? आपण आपल्या मुला-मुलींना योग्य शिक्षण आणि संस्कार देतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे.

समाजातील स्त्रीविरोधी धारणा, पुरुषप्रधानता, महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक आणि अन्याय्य पद्धतीची मुळे कुटुंबातूनच

उखडून टाकण्याची गरज आहे.. बालपणापासून महिलांना जे शिकवले जाते, ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोलवर परिणाम करते. तू मुलगी आहेस, तुला असे वागायचे नाही, असे सांगून महिलांच्या स्वतंत्र विचारांच्या आणि आत्मविश्वासाच्या विकासावर मर्यादा घालून समाजाच्या चौकटीत अडकवले जाते. तर दुसरीकडे समाजाची भूमिका आणि जबाबदारी समाजाची मानसिकता बदलणे अत्यावश्यक आहे. घरात मुला-मुलींना समान वागणूक देणे, त्यांच्यात स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा विकास करणे हे अत्यावश्यक आहे. महिलांच्या शिक्षणाला आणि सक्षमीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे. स्त्रिया म्हणजे दुय्यम दर्जाच्या आहेत हा विचार बदलणे आवश्यक आहे. आपण जेव्हा एखाद्या घटनेवर तीच्या कपड्यांमुळे, रात्री उशिरा का फिरत होती? असे म्हणतो, तेव्हा आपण गुन्हेगाराला सोडून पीडितेलाच दोषी ठरवतो. हे तातडीने थांबायला हवे. समाजाच्या मानसिकतेमध्ये हा बदल व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्नांची आवश्यक आहे. त्यात सत्ताधारी पक्ष, प्रशासन आणि संबंधित घटकांचीही मोठी जबाबदारी आहे.




अस्तित्त्वात असलेल्या कायद्याचे आणि नव्याने लागू झालेल्या कायद्यांची अंमलबजावणी किती काटेकोरपणे आणि प्रभावी पद्धतीने होते, हे सातत्याने पाहणे गरजेचे आहे. न्यायव्यवस्थेतील दिरंगाई आणि भ्रष्टाचारामुळे पीडितांना न्याय मिळण्यात येणाऱ्या अडचणींवर मात कशी करता येईल, यावर केवळ विचारमंथनच नव्हे तर त्या बाबत कृतीआराखडाही हवा. याचा सत्तेवर असलेल्या राजकीय नेतृत्वाने विचार केला पाहिजे. केवळ घोषणाबाजी करणे आणि कडक कायदे करणे, यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी समाजस्वास्थ्याची चौकट भक्कम कशी होईल, या कडे लक्ष देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ ही केवळ कायद्याची समस्या नाही तर ती समाजाच्या मूल्य प्रणालीतील अपयशाचे द्योतक आहे. महिला अत्याचारावर प्रतिबंध घालण्यासाठी केवळ कायद्यांची गरज नाही, तर समाजाच्या विचारसरणीमध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. आपल्याला समाज म्हणून महिला अत्याचाराच्या समस्येवर आत्मचिंतन करणे, याचे कारण समजून घेणे, आणि या समस्येवर उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.महिलांच्या सुरक्षिततेचा विचार करताना, केवळ कायदे सुधारणा पुरेश्या नाहीत तर सामाजिक दृष्टिकोनात बदल, शिक्षणाची सुधारणा आणि प्रभावी कायद्याची अंमलबजावणी हाच या समस्येवर कायमस्वरूपी उपाय असू शकतो. महाराष्ट्राने या समस्येवर ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे. महिलांना समाजात बरोबरीचे स्थान मिळावे, यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांत ५० टक्के आणि प्रशासकीय सेवेत महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. त्यातून पुढे येणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी समाजाबरोबरच प्रशासकीय यंत्रणेची आणि त्यावर अंकुश ठेवणाऱ्या राजकीय व्यवस्थेचीही आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी आपल्याला तत्पर राहावे लागेल, आणि त्यांच्यासाठी एक सुरक्षित, सन्माननीय आणि भयमुक्त जीवन निर्माण करणे हे आपल्या समाजाचे सर्वोच्च कर्तव्य आहे.

महिला बलात्कार, अत्याचार आणि हिंसाचार हा केवळ महिलांच्या समस्या नसून, तो समाजाच्या एकूण आरोग्याचा आणि संस्कृतीचा परावर्तक आहे. आपण या समस्येकडे गांभीर्याने पाहून, त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत स्तरावर बदल घडवून आणणे आवश्यक आहे, जेणेकरून आपल्याला एक सुरक्षित आणि संवेदनशील समाज निर्माण करता येईल.

**- मनाली भिलारे, ९८२३५४३४१०**
bhilaremanali@gmail.com

गेल्या अनेक वर्षामध्ये अनेक वेळेला बार्शीला मी येऊन गेलो असेन. काही गावांच्या सवयी असतात. काही ठिकाणी सभा ही दुपारीच होते. काही ठिकाणी ही सभा दिवस मावळल्याच्यानंतर होते. काही ठिकाणी सभा ही रात्री आठ वाजल्याच्यानंतर होत असते. बार्शी आणि पंढरपूर ही दोन गावं अशी आहेत, की ज्याठिकाणी सायंकाळी सभा होत असतात आणि ती चांगली गोष्ट आहे. आज भर उन्हामध्ये आपण याठिकाणी उपस्थित आहात याचा अर्थ एकच आहे, की आज राज्यामध्ये, देशामध्ये जी स्थिती आहे, ती स्थिती बदलायच्या दृष्टिकोनातून प्रयत्न कुठं चालू असतील तर त्याच्यामध्ये सहभागी व्हावं म्हणून तुम्ही याठिकाणी यावेळीसुद्धा उपस्थित आहात.

नावं सांगता येतील, की त्यांनी चांगल्या प्रकारचं काम या तालुक्यात केलं. त्यामुळं हा तालुका एक वेगळ्या प्रकारचा कार्यक्रम करणारा तालुका होतोय आणि या तालुक्यामध्ये याठिकाणी येता आलं याचा मला मनापासूनचा आनंद आहे.

आज शेतीच्यासंबंधीची अवस्था गंभीर आहे. आज आपण बघतो आहोत, की शेतकरी संकटात आहे. देशाच्या प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलं, की शेतकऱ्याचं उत्पन्न आम्ही दुप्पट करणार. उत्पन्न दुप्पट करण्याच्यासंबंधीची भूमिका केंद्र सरकारनं जाहीर केली आणि आज चित्र हे बघायला मिळतंय, की या देशामध्ये काही महिन्याच्यापूर्वी शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होत होत्या, त्या आत्महत्या दुप्पट वाढलेल्या आहेत. शेतकऱ्यांचं उत्पन्न नाही



ही नगरी महाराष्ट्रामध्ये भगवंतनगरी म्हणून ओळखली जाते. डाळीचा व्यापार असो, तुरीची डाळ असो, सोयाबीन असो या सगळ्याच्या व्यापाराचं केंद्र हा तालुका आहे. एक काळ असा होता, की आजूबाजूला मराठवाड्यातला कापूस तो याठिकाणी यायचा आणि टेक्स्टाईल मील कापड घेणाऱ्या जशा सोलापूरला होत्या, त्यानंतर या कापड गिरण्या या बार्शीला होत्या. आज चित्र बदललेलं आहे. या तालुक्याला अनेकांनी नेतृत्व दिलं. माझ्याबरोबर महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये प्रभाताई झाडबुके होत्या. अतिशय उत्तम वक्तृत्व करणाऱ्या, लोकांच्या प्रश्नांची मांडणी करणाऱ्या आमदार म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख होती. माझ्याबरोबर याच तालुक्यामधून शैलजाताई शितोळे होत्या. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अतिशय आस्था असणाऱ्या या भगिनींनी याठिकाणचं नेतृत्व केलं. अनेक चांगली नेतृत्वं होती. मामासाहेब जगदाळेंच्या शिक्षण संस्थेच्यामार्फत एक शैक्षणिक क्रांती या तालुक्यामध्ये झाली आणि त्याच्यानंतर अनेक चांगल्या लोकांची

वाढलं, शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुप्पट झाल्या. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्या शेतकऱ्याला त्याच्या घामाची किंमत त्याला देण्यासंबंधीची जबाबदारी ही या राज्य आणि केंद्र सरकारची आहे, त्यांनी त्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची खबरदारी गेल्या काही वर्षांमध्ये घेतली नाही आणि त्यामुळं शेतकरी कर्जबाजारी झाला.

मला आठवतंय, माझ्याकडं देशाच्या शेती खात्याचं काम होतं आणि शपथ घेतल्याच्यानंतर थोड्या दिवसामध्ये पहिली बातमी ही आली, की नागपूरच्याजवळ काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यावेळेला देशाचे प्रधानमंत्री मनमोहनसिंग होते. मी त्यांना विनंती केली, की शेतकरी आत्महत्या करतोय ही काही साधीसुधी गोष्ट नाही. त्याच्यामध्ये आपल्याला लक्ष घालावं लागेल आणि त्या प्रश्नाची सोडवणूक करावी लागेल आणि ते समजून घ्यायचं असेल, तर ज्याच्या घरात आज आत्महत्या झाली, त्यांच्या घरामध्ये जाऊन त्यांच्याशी संपर्क साधला पाहिजे. प्रधानमंत्र्यांनी मान्य केलं आणि आम्ही दोघंही दिल्लीवरनं नागपूरला आलो. यवतमाळ जिल्ह्यामध्ये

गेलो. ज्यांच्या घरात आत्महत्या झाली होती, त्या आसपासच्या कुटुंबीयांना भेटलो. कर्त्या माणसानं आत्महत्या केली. आम्ही त्यांच्या घरी गेलो. माऊली होती. लहान मुलं होती. डोळ्यातलं पाणी थांबत नव्हतं. तिला मी विचारलं, की का तुझ्या माणसानं आत्महत्या याठिकाणी केली. तिनं सांगितलं, डोक्यावर कर्जाचं ओझं होतं. सावकार आला, घरातली भांडी-कुंडी बाहेर काढली, अब्रूचा पंचनामा झाला, कुटुंबात, गावात माझी किंमत राहिली नाही, हे सगळं मालकाला, नवऱ्याला सहन झालं नाही. असं झाल्याच्यानंतर तो गेला आणि विष प्यायला.

आज या देशातल्या शेतकऱ्यांना त्याच्या कष्टाची किंमत योग्यरितीनं मिळत नाही म्हणून विष घेण्याची वेळ आलेली आहे.

# राज्यातलं सरकार बदलून टाका

**सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे ११ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचा मेळावा आणि खासदारांच्या सत्काराचा कार्यक्रम झाला. त्यावेळी पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेले भाषण...**

ही जर स्थिती असेल, तर त्याच्यामध्ये बदल करण्याची भूमिका घ्यायची हाच निकाल घ्यावा लागेल आणि तो करायचा असेल तर दुसरा पर्याय नाही. पर्याय काय आहे? शेतकऱ्याच्या डोक्यावरचं ओझं कमी केलं पाहिजे. कर्ज कमी केलं पाहिजे. जसं आज इथं उल्लेख केला गेला. माझ्याकडं शेती खात्याची जबाबदारी होती. एका निकालामध्ये ८० हजार कोटींचं कर्ज माफ केलं आणि शेतकऱ्याला कर्जमुक्त करून त्याला सन्मानानं जगण्याची संधी दिली. एवढंच करून थांबलो नाही. उत्पादन खर्चाचा विचार करून त्याला शेतीमालाची किंमत कशी मिळेल याबद्दलची काळजी घेतली. इथे अधिक उत्पादन झाल्याच्यानंतर जगाच्या बाजारपेठेमध्ये इथल्या शेतीचा माल जाईल कसा आणि शेतकऱ्याच्या पदरामध्ये दोन पैसे अधिक कसे येतील याची काळजी आम्ही त्या काळामध्ये घेतली.

फळबागांची योजना, ज्या फळबागांमुळं सबंध देशामध्ये आज एक काळ असा होता, कुटुंबामध्ये माणूस आजारी पडला तर लोक फळं घ्यायची. आज देशाच्या कानाकोपऱ्यात कुठंही तुम्ही जा, एसटी स्टँडवर जा, रेल्वे स्टेशनवर जा, रस्त्यानी जा, तुम्हाला ठिकठिकाणी फळं विकायला त्याठिकाणी लोक बसलेत हे चित्र दिसतं आणि त्याचं महत्त्वाचं कारण शेतीच्या क्षेत्रामध्ये जी क्रांती आम्ही लोकांनी करून दाखवली, त्याच्यामध्ये फळबाग योजना हीसुद्धा अत्यंत महत्त्वाची बाब होती. हे सगळं काम पूर्वीचं सरकार करत होतं.

आज काय दिसतंय? आज मोदी साहेबांचं राज्य आहे. राज्यामध्ये त्यांचंच राज्य. अनेक राज्यांमध्ये त्यांची सत्ता. या सत्तेचा उपयोग कष्टकरी शेतकऱ्याच्यासाठी केला गेला पाहिजे. या सत्तेचा उपयोग जो तरूण शिकलाय आणि त्याच्या हाताला काम मिळत नाही, त्याला रोजंदारी देण्याच्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला जात नाही. त्यामुळं अनेक ठिकाणी आम्ही बघतो आहोत, एक प्रकारचा निराश झालेला तरूण या देशामध्ये बघायला मिळतोय. ज्या देशातली तरूण पिढी निराश होते, त्या देशाचं भवितव्य हे नैराश्यानं भरलं जातं. आणि आज या देशाचं भवितव्य नैराश्यात गुंतलं ही स्थिती तयार व्हायला लागली आहे. ही स्थिती घालवायची असेल, तर रोजंदारी वाढवली पाहिजे, बंद कारखाने चालू झाले पाहिजेत. नवीन कारखाने झाले पाहिजेत. हे सगळं करून तरूण पिढीच्या हाताला काम याप्रकारची धोरणं राबवली पाहिजेत. आज त्याची खऱ्या अर्थानं गरज आहे आणि ते काम आजचं सरकार करत नाही. त्यामुळं सरकारमध्ये बदल करण्याची काळजी आपण घेतली पाहिजे.

कालची लोकसभेची निवडणूक झाली. या महाराष्ट्रामध्ये ४८ खासदारांच्या जागा आहेत. पाच वर्षाच्यापूर्वी आमच्या चार जागा निवडून आल्या होत्या. पण यावेळेला तुमच्यासारख्या लोकांनी जादू जी दाखवली, तरूण पिढीनी पुढाकार घेतला आणि त्याचा परिणाम जे मोदी नेहमी सांगत होते, ४००पेक्षा जास्त जागा आम्ही जिंकू, त्यांना ३००पर्यंत सुद्धा जाता आलं नाही. त्यांना सरकार बनवायला दुसऱ्याची मदत घ्यावी लागली. ही अवस्था या सरकारच्या धोरणांमुळं झालेली आहे आणि ही धोरणं बदलायची असतील तर सरकार बदललं पाहिजे.

मागच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मी तुम्हा लोकांना अंत:करणापासून धन्यवाद देईन, की ओमराजे इथनं निवडणूक लढवत होते. त्यांना ५० हजारपेक्षा जास्त लीड एकट्या बार्शी तालुक्यानं दिला या प्रकारचा इतिहास या बार्शीनं केला. आज हा इतिहास तुम्ही कालच्या निवडणुकीमध्ये केला, त्याच प्रकारचा इतिहासाची निर्मिती आणखी दीड ते दोन महिन्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक येईल त्यावेळेला करायची आहे आणि महाराष्ट्राचं चित्र बदलायचं आहे. इथं तुमच्या हिताची जपणूक करणारं एक उत्तम सरकार आणायचंय. सगळ्यांनी एकजुटीनं पावलं टाकली तर राज्य बदलू शकतो. शेतकरी, तरूण, आया-बहिणी असोत या सगळ्यांच्यावर अन्याय करणारं हे सरकार खड्ड्यासारखं बाजूला काढणं हे काम तुम्हा लोकांना करायचंय, त्यासाठी तुम्ही तयार राहा, एवढीच विनंती याठिकाणी करतो आणि माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

# शेवटचे पान



# बुद्धी देवतेला साजेसे होईल असेच वागा!

श्रावण महिना सुरू झाला की लगेच आपल्या सर्वांना भाद्रपद महिन्यात येणाऱ्या श्री गणेशाचे वेध लागतात. गणपतीबाप्पा घरी येणार त्यासाठी यंदा आरास, सजावट काय करायची, त्याचे स्वागत कशा प्रकारे करायचे याची घराघरात आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये तर खूप आधीपासूनच चर्चा सुरू होते. ज्याच्या नामामध्ये विघ्नसमुद्राचे अगस्तीप्रमाणे शोषण करण्याचे सामर्थ्य आहे आणि वेदान्ताचे ज्ञानही जो करून देतो असे मानिले जाते, त्या गणपतीचा वार्षिक महोत्सव प्रत्येक भाद्रपद शु. चतुर्थीस साजरा केला जातो. प्रत्येक हिंदु महिन्याची शुक्ल पक्षातील चवथी तिथी सिद्धिविनायकी या नावाने प्रसिद्ध असून भाद्रपद शुक्लचतुर्थी ही महासिद्धीविनायकी होय. गणपतीच्या उपपत्तीसंबंधाने अनेक कथा पुराणात सापडतात. मुद्गलपुराण, गणेशपुराण व गणेश भागवत हे तीन संस्कृत ग्रंथ उपपुराणात्मक असून त्यांच्यात आलेल्या कथाभागात एकवाक्यता नाही. गणेशपुराणाच्या १२ व्या अध्यायात गणपति हा मूळचा गणेश नसून गुणेश आहे; अर्थात सत्व, रज व तम या त्रिगुणांचा तो अधिपती होय. सृष्टीला व्यापून असणारा परमेश्वर ओम प्रणववाच्य असल्याचे सांगून गणपति हा त्याचेच रूपांतर होय असे दर्शविले आहे. गणपतीचे वाहन जो उंदीर तो कालरूप मानला असून उंदीर ज्याप्रमाणे अहर्निश पदार्थमात्र कुरतडीत असतो, तद्वत कालही सृष्ट पदार्थांचा सारखा नाश करीत आहे. या कालालाच ज्याने जिंकून आपले वाहन बनविले तो भूतमात्रांचा गणराज श्रेष्ठ होय, असे या देवतेचे तात्विक वर्णन आहे. गणपतीचे विसर्जन दीड, पाच, सात, दहा किंवा एकवीस दिवसांनी करावे. विसर्जन होईपर्यंत उत्सव चालू ठेवावा. उत्तरपूजेनंतर प्रतिमा अथवा मूर्ती पाण्यात विसर्जित करावी, असा हा वार्षिक गणपतिपूजेचा शास्त्रोक्त विधी आहे.



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी शंभर वर्षांपूर्वी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यास जो प्रारंभ केला त्यामागे काही उदात्त व भरभक्कम अशा विचारांची तात्त्विक बैठक होती. ब्रिटिशांचे साम्राज्य भारतातून उलथवून टाकायचे आणि त्यासाठी जनतेमध्ये एकजिनसीपणा आणून व जाणीव जागृती वाढवून त्यांचे संघटन करायचे हा मूळ उद्देश व गर्भित हेतू होता. त्यासाठी किर्तन, प्रवचने, भारूड, व्याख्याने, नाटके, संगीत, होमहवन, पठन, खेळांच्या स्पर्धा असे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जायचे. ज्यामागील मुख्य हेतू लोकांनी एकत्र यावे हाच होता. हळूहळू या उत्सवाचे स्वरूप बदलत गेले. स्वातंत्र्यप्राप्तिनंतर या सणाचा मूळ उद्देशच मावळला आणि आजकाल तर या गणेशोत्सवाला आणि एकंदरीत दहीहंडी, गोपाळकाला, रामनवमी, दिवाळी या व इतर सणांना अत्यंत विकृत, हिडीस व समाजविघातक अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. अनेक सार्वजनिक गणेश मंडळे ज्या बीभत्स पद्धतीने हा उत्सव साजरा करतात ते पाहिल्यावर गणपती देवतेला किती त्रास होत असेल याचा विचार देखील करवत नाही. मोठमोठ्याने स्पीकरवरून अश्लिल गाणी लावून मुलांचे व तरूणांचे थवेच्या थवे जे अंगविक्षेप करीत वेडीवाकडी नृत्ये करीत राहतात ते पाहिल्यावर व प्रचंड मोठ्या आवाजाने कर्णबधीर होण्याची जी वेळ लोकांवर आणि विशेषतः वृद्धांवर, रुग्णांवर, अभ्यास करणाऱ्या मुलांवर येते ते पाहिल्यावर लोकमान्यांचा हा सण सुरू करण्याचा उद्देश आज कोणत्या दिशेला चालला आहे आणि त्याला कसे विकृत वळण लागले आहे हे दृष्टोत्पत्तीस पडल्याशिवाय राहात नाही. सण आपण सार्वजनिकरित्या जरूर साजरा करूया. पण त्याचे मूळ स्वरूप व हेतू लक्षात घेऊन त्या प्रमाणे बदल घडवून आणण्याचा विचार निदान सुजाण व जाणकार मंडळांनी तरी सुरू करून त्या दिशेने पाऊले टाकावीत एवढीच अपेक्षा आहे. गणपती ही बुद्धीची देवता आहे. तेव्हा आपण आपली बुद्धी शाबूत ठेवून त्याला साजेसे होईल असे वागायला काय हरकत आहे?